अक्षय जाधव

गुप्तहेर सत्यवीर आणि कुटीरोवांचं शस्त्र



गुप्तहेर सत्यवीर आणि कुटीरोवांचं शस्त्र

अक्षय जाधव

ई साहित्य प्रतिष्ठान

गुप्तहेर सत्यवीर आणि कुटीरोवांचं शस्त्र

(कादंबरी)

लेखक: अक्षय जाधव

९२ क, सोपाननगर, हडको.

मु. पो. सासवड, जि. पुणे,

४१२३०१

फोन : +९१ ७३५०९३३६९०

ब्लॉग – https://jadhavlibrary.blogspot.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत

400604

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २ फ़ेब्रुवारी २०२६

©esahity Pratishthan®2026

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

अक्षय नंदकुमार जाधव,

शिक्षण: पदव्युतर पदवी,

सध्या मेडिकल इन्शुरन्स क्षेत्रात कार्यरत.

लहानपणापासूनच घरात वाचनाची आवड सगळयांनाच असल्याने आपसूकच ती गोडी मला देखील लागली. आई वडील शिक्षण क्षेत्रात असल्याने साहित्य विषयावर घरात चर्चाविमर्श घडायचेच तसचं घरात पुस्तकाचं वेगळं कपाट देखील असायचं. त्याच अनुषंगाने मराठी साहित्यातील बाललेखकांपासून ते दिग्गज लेखकांच्या साहित्याचा सहवास लहानपणापासूनच मिळत गेला. अगदी तीन डोक्यांचा राक्षस या बालकथांपासून वाचायला सुरुवात केलेल्या पुस्तक वाचनाचा प्रवास मृत्युंजय आणि पानिपतसारख्या थोर कादंबर्यांपर्यंत कधी आला कळेलच नाही.

पण खरी मोहिनी घातली ती वपु काळे, सुहास शिरवळकर, नारायण धारप या सारख्या लेखकांनी. त्यांच्या कथा वाचल्यानेच आपण देखील लिहावं का हा

विचार मनात पेरला गेला. रहस्य आणि भयकथा यात मला विशेष रुची असल्याने सुरुवातीला त्या प्रकारातच ब्लॉग लिहायला सुरुवात केली.

दरम्यान ई साहित्यच्या अनेक उपक्रमांपैकी पुस्तक प्रकाशन उपक्रमाबद्दल कळल. माझी "आफ्रिकेतील अतर्क्य" हि कथा ई साहित्यच्या टीमने या आधीच प्रकाशित केलेली आहे. गुप्तहेरकथा आणि रहस्यकथा यात विशेष रुची असल्याने मी "गुप्तहेर सत्यवीर" हे पात्र निर्माण करून बऱ्याच गुप्तहेरकथा लिहिल्या आहेत. ज्यामधे गुप्तहेर सत्यवीरने सोडवलेल्या अनेक रहस्यमयी आणि गुन्हेगारी प्रकरणांचा समावेश होतो. गुप्तहेर सत्यवीरच्या अनेक थरारक प्रकरणातील पहिली कादंबरी ई-साहित्य मार्फत प्रकाशित होत आहे.

वाचकांना ती आवडेल यात शंका वाटत नाही. वाचक हाच लेखकांना बनवतो आणि घडवतो म्हणूनच वाचकांसाठी गुप्तहेर सत्यवीरच्या अजून बऱ्याच कथा ई-साहित्यामार्फत प्रकाशित होतीलच. इंटरनेटवरील मराठी साहित्य जगतात ई साहित्यसारखी लोकं साहित्यप्रेमींना प्रेरणादायीच ठरतात. त्यामुळे त्यांच्याच सहयोगाने मराठी वाचकांची वाचनतृष्णा भागवण्याचे भाग्य मला मिळत राहो हीच प्रार्थना....

धन्यवाद.

आपलाच लेखक,

अक्षय नंदकुमार जाधव,

सासवड, पुणे

शहरात पुस्तकप्रदर्शन भरल्यानंतर तिथे भेट देऊन
विविध लेखकांची पुस्तके विकत घेणाऱ्या
आणि त्यांचं साहित्य आम्हा भावंडांना वाचायला लावून
वाचनासाठी उद्युक्त करणारी माझी आई

“सुरेखा नंदकुमार जाधव”

हीस अर्पण...

गुप्तहेर सत्यवीर आणि कुटीरोवांचं शस्त्र

(प्रस्तुत कथा काल्पनिक असून कोणत्याही वास्तव घटनेशी किंवा जिवंत अथवा मृत व्यक्तीशी संबंध नाही)

रटाळ दिवस

आढ्याला करकर आवाज करत फिरणाऱ्या पंख्याकडे पाहत आपल्या दोन्हीही तंगड्या टेबलावर ठेवून सत्यवीर आपल्या खुर्चीमध्ये रेलून बसला होता. दोन्ही हात डोक्यामागे बांधून शून्यात पाहत असल्याप्रमाणे तो वर फिरणाऱ्या पंख्याकडे मलूलपणे पाहत होता. त्याच्या समोरच्या टेबलावर टेलीफोन, चहाचा कळकट कप आणि सिगरेटची काही थोटके सत्यवीरप्रमाणेच मलूल पडलेली होती. तसं पाहायला गेलं तर या छोट्याशा घरात सत्यवीर एकटाच राहत होता. मागे झोपायची एक खोली होती. तिथे एक बेड, कपाट, त्याला चिटकुनच न्हाणीघर. पुढे हॉलमध्ये एक टेबल आणि २ खुर्च्या तसेच काही लोखंडी पेट्या एवढाच काय तो ऐवज होता. सत्यवीर हा पेशाने एक गुप्तहेर होता. शहरातील बरीच किचकट आणि पोलिसांच्या डोक्याला ताण किंबहुना ताप देणारी गुन्हेगारी प्रकरणे सत्यवीरने त्याच्या बुद्धीकौशल्याने सोडवलेली होती. शहरातील पोलीस सत्यवीरला खूप मानत असत. असं जरी असलं तरी मागच्या काही दिवसापासून या हुशार गुप्तहेरावर माशा मारायची वेळ आलेली होती. बऱ्याच दिवसापासून एकही प्रकरण सत्यवीरकडे आलेलं नव्हतं. त्यामुळेच दिवसभर पंख्याची होणारी घरघर पाहत दिवस काढायची वेळ त्याच्यावर आलेली होती आणि त्याला त्या गोष्टीचा उबग आलेला होता. नाही म्हणायला काही दिवसांपूर्वी एका माणसाने सत्यवीरला फोन करून आपली

पत्नी अचानक गायब झालीय तिचा शोध घेऊ शकाल काय? अस विचारलं होतं. असलं क्षुल्लक प्रकरण आपण हाताळत नाही तुम्ही पोलिसात तक्रार करा असं म्हणून सत्यवीर फोन ठेवणारच होता, पण बरेच दिवस कोणतंच प्रकरण हाताशी नसल्याने आणि कामाशिवाय नुसतंच बसून कंटाळल्याने डोक्याला काहीतरी चालना मिळावी या उद्देशाने सत्यवीरने त्या माणसाला नाईलाजास्तव होकार दिलेला होता. त्यानुसार दुसऱ्याच दिवशी मस्तपैकी जॅकेट, बूट आणि इतर आवश्यक गोष्टी घेऊन सत्यवीर त्या माणसाला भेटायला निघालाच होता. एवढ्यात त्या माणसाचा फोन आला आणि त्याने सांगितल कि त्याची पत्नी परत घरी आलीय. नवरा बायकोमध्ये भांडण झाल्यामुळे त्याची पत्नी रुसून तिच्या मैत्रिणीकडे आपल्या नवऱ्याला न सांगता राहायला गेली होती. पण आत्ता मी माघारी आलीय. तिचा रुसवा पण गेलाय आणि आत्ताच तिला मी चहा पण टाकायला सांगितलाय. तेव्हा तुम्ही आता तिला शोधायला जायची तसदी घेऊ नका. त्याने असं सांगताच काहीही नं बोलता चिडून सत्यवीरने फोन ठेवला होता.

शीट.. या बायका अशा कशा न सांगता गायब होतात आणि होतात त्या होतात वर अचानक माघारी घरी पण येतात. सत्यवीर चिडून मनातच म्हणाला होता.

बऱ्याच दिवसांनी एक क्षुल्लक का होईना काम हाती आलेलं होतं आणि ते पण असं निसटून गेलं. क्षुल्लक का होईना वेळ घालवायला उपयुक्त असलेलं प्रकरण हातचं गेल्याने त्याची चिडचिड झालेली होती. आज त्याला परत तो प्रसंग आठवला आणि उगाचच तो स्वतःवर चिडला. त्याने रागातच हाताची

मुठ टेबलावर आपटली. काही वेळाने त्याने पटकन वरच्या खिशात ठेवलेल्या सिगारेटच्या पाकिटातून एक सिगारेट काढली.

ती सिगारेट तो पेटवणारच होता तेवढ्यात त्याला कसलीतरी आठवण झाली आणि तो खुर्चीवरून उठला. दाराजवळ जात त्याने समोरच्या घरात कामाला असलेल्या कामवाल्या पोराला हाक मारली. समोर कामाला असलेला तो पोरगा सत्यवीरच्या दारात आला न आला तोच सत्यवीरने त्याला कोपऱ्यावरच्या चहाच्या टपरीवरून एक चहा आणायला सांगितला. तो पोरगा आला तसा शांतपणे निघून गेला. काही वेळातच कामवाल्या पोराने चहा आणला आणि सत्यवीरच्या पुढ्यात टेबलावर ठेवला. चहा आल्यानंतर सत्यवीरने सिगरेट पेटवली. सिगरेटचे काही झुरके आणि चहाचे दोन घोट घेतल्यानंतर त्याला जरा बऱ़ वाटलं. शांतपणे तो आपल्या खुर्चीत बसलेला होता. इन्स्पेक्टर देशमुखांना फोन लावून काही जबरदस्त गुन्हेगारी प्रकरण आलेलं आहे का? असा विचार पुढ्यात असलेल्या फोनकडे पाहून त्याच्या मनात आला. पण नंतर त्याने तो विचार मनात आला तसा झटकला. कारण सारखीसारखी अश्या प्रकारची चौकशी करून त्याला कंटाळा आलेला होता. कारण इन्स्पेक्टर देशमुख फोनवर त्याला एकच उत्तर देत होते कि "सत्या, सध्यातरी तुझं बुद्धिकौशल्य पणाला लावायची गरज असलेलं एकही प्रकरण माझ्याकडे आलेलं नाहीये आणि आलंच तर नक्कीच आम्ही तुला बोलावू".

पोलीस खात्यातील इन्स्पेक्टर देशमुख आणि सत्यवीरचं खूप चांगलं जमायचं. बऱ्याचश्या क्लिष्ट गुन्हेगारी प्रकरणात इन्स्पेक्टर देशमुखांना सत्यवीरने मदत केलेली होती. शहरातील सोन्याच्या दुकानांमधील रात्री पडणारे दरोडे

म्हणा वा शहरातील प्रसिद्ध उद्योगपतींचा त्यांच्याच कार्यालयात झालेला मृत्यू म्हणा. बऱ्याच गुन्हेगारी घटना जिथे पोलिसांची मती सुद्धा कुंठीत झालेली होती तिथे सत्यवीरने आपल्या असामान्य बुद्धीमत्तेच्या जोरावर त्या प्रकरणांचा उलगडा केलेला होता. काही वेळा खाजगी प्रकरणात देखील लोक सत्यवीरला बोलावत असतं. एका जमीनदाराच्या घरात दिवसाढवळ्या झालेली २२ तोळे सोन्याची चोरी जी त्याच्याच मेहुण्याने केलेली होती. हे पुराव्यानिशी सत्यवीरने सिद्ध केलं होतं आणि त्यावर खुश होऊन जमीनदाराने सत्यवीरला त्यातले २ तोळे सोने बक्षीस म्हणून देऊ केले होते. त्या नंतर नलगेकर कुटुंबात झालेल्या दुहेरी हत्याकांडाचे दोषीसुद्धा सत्यवीरमुळेच गजाआड गेले होते. त्यामुळेच फक्त इन्स्पेक्टर देशमुखांचाच न्हवे तर संपूर्ण पोलीस खात्याचाच सत्यवीरच्या बुद्धिमत्तेवर विश्वास होता. आत्ता सत्यवीर राहत असलेलं घरदेखील सत्यवीरला देशमुखांच्या ओळखीमुळेच मिळालं होतं. एकंदरीतच दोघांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध होते.

सत्यवीरच्या पूर्वइतिहासाबद्दल बोलायचं झालं तर सत्यवीरला कोणताच आगापीछा नव्हता. सत्यवीर अनाथालयात वाढलेला एक मुलगा नंतर तो ६ वर्षाचा झाला असताना एका मुल नसलेल्या मध्यमवर्गीय ख्रिश्चन दाम्पत्याने सत्यवीरला दत्तक घेतलं. लहानपणापासूनच सत्यवीर हुशार आणि कुशाग्र बुद्धिमत्ता असलेला मुलगा होता. सत्यवीरला बुद्धीकौश्ल्याचे खेळ खेळण्यात विशेष रस असायचा. त्याची बुद्धिमत्ता पाहून त्याच्या मानलेल्या वडिलांनी त्याला बुद्धीबळ खेळायला शिकवलं होतं. काही दिवसातच त्या खेळात सत्यवीरने प्राविण्य मिळवले होते. विलक्षण बुद्धिमत्ता असलेल्या सत्यवीरची

त्या दाम्पत्याने खूप काळजी घेतली, त्याच्यावर माया केली. यशस्वीपणे त्याचं शिक्षण पूर्ण केलं. सत्यवीरला विविध गोष्टी शिकण्याची आवड होती. कॉलेजला असतानाच सत्यवीरने इंग्लिश, हिंदी, मराठी, तेलुगु, गुजराथी तसेच जर्मन आणि फ्रेंच या भाषा अभ्यासल्या. काही कालावधीतच त्या भाषा तो अस्खलितपणे बोलायला आणि लिहायला शिकला. त्या भाषांचे साहित्य वाचले. नाटक आणि अक्टिंगमध्येसुद्धा त्याला रस होता. बौध्दिक गणिते आणि कोडी सोडवणे ह्या गोष्टी तर सत्यवीरच्या हातचा मळ होता. सत्यवीरच्या मानलेल्या आई वडिलांना त्याचा खूप अभिमान होता. पण काळाच्या मनात काय होते काय माहित. एका दुर्दैवी अपघातात त्या ख्रिश्चन दाम्पत्याचा मृत्यू झाला आणि सत्यवीर परत एकदा पोरका झाला. त्या दाम्पत्याची मागे संपत्ती अशी काहीच नव्हतीच. नातेवाईक सुद्धा नव्हते. जी होती नव्हती ती संपत्ती म्हणजे बँकेमधील काही रक्कम आणि राहतं घर विकून मिळालेली रक्कम सत्यवीरने अनाथालयात दान केली कारण आपल्या मानलेल्या आईवडिलांच्या उर्वरित संपत्तीवर त्याला हक्क दाखवायचा नव्हता. म्हणूनच स्वतःच नशीब आजमावायला एकटाच आयुष्याच्या मार्गावर चालायला त्याने सुरुवात केलेली होती.

असा हा हुशार गुप्तहेर सत्यवीर दिवसेंदिवस कामाव्यतिरिक्त घरी बसून कंटाळलेला होता. रात्रीनंतर दिवस उजाडला कि तो दिवस अक्षरशः खायला उठायचा. दिवस निरस पद्धतीने चाललेले होते. आकाशातील उंच उडणारा पतंग दुसऱ्या पतंगाच्या मांजाने कापल्यानंतर तुटून भरकटत जमिनीकडे येऊ लागतो तशी काहीशी अवस्था सत्यवीरची झालेली होती आणि तशा अवस्थेतच

सत्यवीर आत्ता त्याच्या खुर्चीवर कलंडलेला होता. आज वेळ घालवायला काय करावे? असा प्रश्न त्याला भेडसावत होता. आज कोठेतरी बाहेर फेरफटका मारून येउयात जेणेकरून आजचा दिवस अगदीच निरस जाणार नाही असा त्याचा विचार चाललेला होता. संध्याकाळ उलटून गेली होती. सत्यवीर बाहेर जाण्याचा विचार करत बसलेला असतानाच समोरच्या घरात काम करणारा तो पोरगा ज्याने मगाशी सत्यवीरला चहा आणून दिला होता सत्यवीरच्या घरात हॉलमध्ये आला. सत्यवीर डोळे मिटून हात डोक्यामागे घेऊन शांतपणे खुर्चीवर बसलेला असल्याचे पाहून तो पोरगा हळू आवाजात म्हणाला.

"दादा हॉटेलमालक उधारी मागत होता."

त्याच्या आवाजासरशी सत्यवीरने डोळे उघडले आणि हम्म असं आवाज काढून परत डोळे मिटून आपल्या विचारात गढून गेला.

सत्यवीरचं अस बेफिकीर वर्तन पाहून तो पोऱ्या जरा मोठ्याने म्हणाला.

"दादा, चहाची उधारी मागत होता तो, ती फेडल्याशिवाय परत चहा देणार नाही असं म्हणाला". एवढ बोलून तो पोरगा सत्यवीरच्या उत्तराची वाट पाहू लागला.

त्याचा असा मोठ्या आवाजातला स्वर पाहून सत्यवीरने डोळे उघडले आणि चरफडतच तो म्हणाला "हो रे.. ऐकू आलं मला. देईन त्याची उधारी... आधी काम येउदेत एखादं. साला इथे हाताशी काम नाहीये अजून आणि आले हे लोक उधारी मागायला." असं म्हणून सत्यवीर चरफडतच खुर्चीवरून उठला आणि आतमधल्या खोलीत गेला.

“माझ्यावर का ओरडतोयस.. मी काय करू दादा....मला त्याने जे सांगितलय तेच मी तुला सांगतोय” सत्यवीरसारखाच बेफिकिरीचा स्वर काढून तो पोऱ्या म्हणाला.

“हो..हो.. कळले मला...” असं म्हणत मान डोलवत पाण्याने भरलेला ग्लास घेऊन सत्यवीर बाहेर आला आणि ग्लासातील पाणी गटागटा संपवत ग्लास टेबलावर ठेवून सावकाशपणे खुर्चीवर बसला.

तो पोरगा सत्यवीरकडे पाहत तसाच उभा असलेला पाहू सत्यवीरने हातानेच “आता काय झालं” अशी खुण केली.

तेव्हा तो पोरगा म्हणाला “दादा... मला बुध्दीबळ कधी शिकवणार आहेस तू?”

“शिकवीन लवकरच..” सत्यवीर खुर्चीवर जरा आरामात बसत म्हणाला.

“शिकवेन लवकरच.. मागचे काही दिवस एवढचं म्हणतोयस पण कधी शिकवणार आहेस” तो पोरगा तोंडाचा चंबू करून सत्यवीरच्या अंगचटीला येऊन म्हणाला.

सत्यवीर चेहऱ्यावर वेडेवाकडे भाव आणत आणि सुस्त चेहऱ्याने म्हणाला “हे बघ सध्या दिवस खूप वाईट चाललेले आहेत. हाताशी काम नाही आणि माझ्याजवळ जो बुद्धिबळाचा सेट आहे त्यामधील एक उंट, दोन घोडे, दोन प्यादे त्यांचे सैन्य सोडून कोठेतरी फरार झालेले आहेत. त्यामुळे उरलेला अर्धवट सेट काही कामाचा नाही. मला काम मिळालं कि पैसे हाताशी येतील. तेव्हा नवीन सेट आणून तुला त्या नवीन बुध्दीबळाच्या पटावर मला छान शिकवता येईल.”

सत्यवीरच्या बोलण्यावर नाराज होत पोरगा म्हणाला "म्हणजे अजून वेळ लागणार तुला..." असं म्हणून तो पोऱ्या सत्यवीरला अजून काहीतरी म्हणणार..

एवढ्यात.. टेबलावरचा टेलीफोन खणाणला. त्या टेलीफोनकडे पाहत कोणाचा फोन असेल असा विचार करतच सत्यवीरने चपळाईने फोनचा रिसिवर उचलला.

"हॅलो सत्यवीर..." समोरून आलेला चितपरिचित आवाज ऐकून सत्यवीर जरासा मनातून सुखावला.

"हॅलो देशमुख बोला.." असं म्हणत स्मितहास्य करत सत्यवीरने समोर उभा असलेल्या पोऱ्याला हातानेच खुण करून बाहेर जाण्यास सांगितले. कारण फोन इन्स्पेक्टर देशमुखांचा असल्याने कामदेखील तितकंच महत्वाचं असणार होतं. त्याशिवाय देशमुख स्वताहून फोन करणार नाहीत. हे ओळखून सत्यवीरने त्या पोराला बाहेर जाण्यास सांगितलं. सत्यवीरचा इशारा पाहून ते पोर देखील मनातून काहीसं खट्टू होऊन काहीतरी पुटपुटत बाहेर निघून गेलं. तो पोरगा जाताच सत्यवीरने आपलं लक्ष टेलीफोनवर केंद्रित केलं

"सत्यवीर वेळ आहे ना तुला आत्ता... म्हणजे कामात तर नाहीस ना?" इन्स्पेक्टर देशमुख फोनवर घाईघाईत म्हणाले.

"मस्त चेष्टा करताय तुम्ही देशमुख.. अहो सकाळपासून निवांतच आहे मी. किंबहुना कित्येक दिवसांपासून निवांतपणाच चालू आहे..." सत्यवीर हसत हसत म्हणाला.

पण सत्यवीरच्या या उत्तरावर त्याला पुढे अजून काहीही न बोलू देता लगेचच देशमुख त्याला म्हणाले "मग ऐक आत्ता जसा आहेस तसाच सांगतोय त्या पत्त्यावर लगेचच ये..."

देशमुखांची बोलण्याची गडबड ऐकून सत्यवीरने कान टवकारले आणि त्यांनी सांगितलेला पत्ता लिहून घेतला. नक्की काय झालंय? हे विचारले असता..

"एक गुंतागुंतीच प्रकरण आहे. लवकर ये..." एवढच सांगून इंस्पेक्टर देशमुखांनी फोन ठेवला.

फोन ठेवून सत्यवीर विचारमग्न झाला. गुंतागुंतीच प्रकरण आहे एवढच सांगून देशमुख यांनी फोन ठेवला असला तरी सत्यवीरचं कुतूहल जागृत झालेलं होतं. नक्की काय बऱ घडलं असेल? विचार करतच त्याने बाहेर जायच्या तयारीला सुरुवात केली. अंगावर जॅकेट, खाली जीन्स, पायात जाड बूट, जॅकेटच्या आतल्या खिशात महत्वाच्या नोंदी करण्यासाठी लागणारी डायरी आणि छोटंसं पेन व्यवस्थित ठेवल्याची खात्री करून बऱ्याच दिवसांनी व्यवस्थित केसं विंचरून तो निघण्यास तयार झाला.

घराबाहेर पडल्यावर घराजवळ उभ्या केलेल्या आपल्या दुचाकीला त्याने किक मारली. काही वेळातच दुचाकीवरून सत्यवीर देशमुखांनी दिलेल्या पत्त्यावर पोहोचला. समोर एक दुमजली इमारत होती. ती इमारत कोणती आहे हे ओळखायला सत्यवीरला वेळ नाही लागला. ती इमारत शव विच्छेदन करण्याचं ठिकाण होतं. कोणाचा संशयास्पदरित्या मृत्यू आढळून आल्यास विशेषतः खुनासारख्या प्रकरणात ते शव इस्पितळातून या विभागात आणलं

जायचं. इथेच शवविच्छेदन आणि इतर रासायनिक चाचण्या पार पडायच्या. तशा रासायनिक चाचण्या करणारी विशेष प्रयोगशाळादेखील इथे होती. रात्रीचे ८ वाजले होते. सत्यवीरने आपली दुचाकी पार्किंगमध्ये लावली आणि मुख्य दरवाजातून आत आला. रात्र झाल्यामुळे आणि कार्यालयीन कामकाज संपल्याने स्टाफ जास्त असा नव्हताच. मुख्य दरवाजाच्या आतमध्ये जिन्यापाशी एक हवालदार सत्यवीरचीच वाट होता. सत्यवीर आतमध्ये आल्याचं त्या हवालदाराने पाहिलं आणि आपल्यामागे येण्यास त्याने खुणावले. सत्यवीर शांतपणे त्या हवालदाराच्या मागे चालू लागला. तो हवालदार बाजूचा जिना चढून वर जाऊ लागला. सत्यवीर देखील त्याच्यामागे जिना चढू लागला. वर पोहोचल्यावर एक मोठा लांबरुंद व्हरंडा लागला तिथून पुढे तो हवालदार चालू लागला. त्यामागोमाग सत्यवीर आजूबाजूचं निरीक्षण करत शांतपणे चालत होता. इथे इतर कोणीही कर्मचारी नव्हते. आजूबाजूला काही खोल्या होत्या. जिथून कसलेतरी विचित्र रासायनिक वास येत होते. त्या खोल्यांजवळून जात ते दोघेही पुढे आले. काही वेळातच हवालदाराने सत्यवीरला त्या व्हरंड्याच्या दुसऱ्या टोकाला एका खोलीपाशी आणले आणि ते दोघे त्या खोलीच्या आतमध्ये गेले. आतमध्ये काही पावले टाकताच बाजूला त्यांना एका टेबलाजवळ खुर्चीत इन्स्पेक्टर देशमुख बसलेले दिसले. वयाने ते सत्यवीर पेक्षा काही वर्षांनी मोठे होते. चेहरा रुबाबदार आणि खांदे रुंद, ओठांवर काळ्याभोर मिशा असून डोक्यावर पोलिसी टोपी होती. त्यांच्या बाजूला एक हेड कॉन्स्टेबल चेहरा मक्ख करून जबरदस्तीने बांधल्यासारखा उभा होता. टेबलाच्या दुसऱ्या बाजूला खुर्चीत एक पांढऱ्या रंगाच्या एप्रनमध्ये पुरुष डॉक्टर हाताच्या मुठीवर

हनुवटी ठेवून बसला होता. त्याच्या जवळ तशाच पांढऱ्या एप्रनमध्ये एक लेडी डॉक्टर एप्रनच्या खिशात हात घालून उभी होती. बाजूला २-३ उभी कपाटे होती. त्या उभट कपाटांचे कप्पे उघडून आतमध्ये काहीतरी शोधाशोध करत असलेला डॉक्टरांचा एक मदतनीस होता. असा सगळा लवाजमा तिथे उपस्थित होता. सत्यवीर आणि हवालदार आतमध्ये येताच सगळयांच्या नजरा त्यांच्याकडे वळल्या.

"ये सत्यवीर बसं..." जवळच्या रिकाम्या खुर्चीकडे निर्देश करत इन्स्पेक्टर देशमुख म्हणाले.

"बसायचं राहूद्यात. आधी त्या स्त्रीचा मृतदेह कुठेय तो दाखवा मला" सत्यवीर आजूबाजूला पाहत निर्विकार चेह्याने म्हणाला.

सत्यवीरच्या या वाक्याने उपस्थित सगळेजण चाटच पडले. समोर बसलेले डॉक्टर्स पण आश्चर्यवजा कुतूहलाने त्याच्याकडे पाहत होते. कपाटाच्या कप्प्यांमध्ये शोधाशोध करणारा मदतनीस सुद्धा काम सोडून तोंड वासून सत्यवीरकडे पाहू लागला. मक्ख चेहऱ्याच्या कॉन्स्टेबलने मात्र तशाच मक्खपणे सत्यवीरकडे पाहिलं. काही क्षण असेच शांततेत गेले.

"सत्या, तुला कसं कळल कि आम्ही तुला एका स्त्रीचा मृतदेह दाखवण्यासाठी इथे बोलावलं आहे? अर्थात या इमारतीमध्ये येतानाच तुला कळल असेलच कि हि इमारत शवविच्छेदन करण्याचं ठिकाण आहे. पण मृतदेह स्त्रीचाच आहे हे एवढं खात्रीपूर्वक कस कळलं तुला? अजून कोणालाही या बाबत माहिती नाही कारण या डॉक्टरांच्या समक्षच या इमारतीमधून मी तुला मगाशी फोन केला होता." इन्स्पेक्टर देशमुख करत म्हणाले.

"एवढं काही विशेष नाही. फक्त काही तर्क लावले आणि ते तर्क बरोबर बसतायत का हे पडताळत गेलो" सत्यवीरने शांतपणे इकडे तिकडे पाहत उत्तर दिलं.

"हो सत्यवीर तुझी काम करण्याची पध्दत मला माहित आहेच. पण तू हे तर्क कसे लावलेस हे जाणून घेण्याची मला इच्छा आहे अर्थात डॉक्टर्सना सुद्धा असेलच." देशमुख समोरच्या डॉक्टर्स जोडीकडे पाहत म्हणाले. ते दोन्ही डॉक्टर्स अजूनही आश्चर्याने सत्यवीरकडे पाहतच होते. त्यांचे चेहरे पाहून सत्यवीरला वाटलं कि यांना आपण हे तर्क कसे लावले हे सांगितल्याशिवाय ते काही मृतदेह पाहू देणार नाहीत. म्हणून सत्यवीर म्हणाला

"ठीक आहे, सांगतो- मी जसा हवालदारसाहेबांसोबत मुख्य दरवाज्यातून जिन्याने वर आलो तसं पाहिलं कि आजूबाजूला कर्मचारी कोणीच दिसत नव्हते म्हणजे निश्चितपणे त्यांचा ड्यूटीचा वेळ संपला असल्याने ते निघून गेले होते. व्हरंड्याच्या आजूबाजूला प्रयोगशाळांच्या खोल्या ओलांडून पुढे आलं कि डावीकडे आतमध्ये एका बाजूला पुरुष शवगृहांचे आणि उजवीकडे स्त्री शवगृहांचे कप्पे अशा पाट्या तिथे आहेत. समोर येताच आपण इथे आहोत ती शव विच्छेदनाची खोली. या खोलीच्या दरवाजाबाहेर उजव्या भिंतीजवळ एक स्ट्रेचर उभा आहे जो शवकप्प्यांमधून शव नेण्या आणण्यासाठी वापरला जातो. स्त्री शव कप्प्यांच्या बाजूने शव आणून ते शव आत ठेवून तो स्ट्रेचर बरोबर खोलीबाहेर उजव्या बाजूलाच ठेवला आहे ज्या बाजूला स्त्री शव कप्पे जवळ आहेत."

सत्यवीरकडे पाहत सगळेजण शांतपणे ऐकू लागले.

सत्यवीर पुढे बोलू लागला – आतमध्ये येताच मला पुरुष डॉक्टर्स सोबत एक लेडी डॉक्टर पण दिसली. ज्यातून मी असा अंदाज बांधला कि नियमाप्रमाणे स्त्रीच्या शवविच्छेदनासाठी लेडी डॉक्टर सोबत असणे गरजेचे आहे. त्यामुळे इथे महिला डॉक्टर असावी. हवालदारासोबत जेव्हा खोलीत प्रवेश केला तेव्हा दरवाजाच्या जवळ कचऱ्याची एक टोपली आहे. ज्यात लांबच लांब केसांचे पुंजके दिसले. ते केस स्त्रीचे असावेत असं दिसतं. कारण एवढे मोठे केसांचे पुंजके पुरुषांचे नसतात. अर्थात काही पुरुष मोठे केस ठेवतात. पण स्ट्रेचरची जागा आणि लेडी डॉक्टरची उपस्थिती या दोन गोष्टी शव हे स्त्रीचं असण्याकडे निर्देश करत होत्या. त्यामुळे केसांचे पुंजके स्त्रीचे असण्याबाबत खात्री देता येते.

सत्यवीरच्या स्पष्टीकरणाने डॉक्टर्ससकट सगळेच चकित झाले. सत्यवीरची काम करण्याची पद्धत पाहूनच सत्यवीर खरच एक हुशार गुप्तहेर आहे अशी त्यांची खात्रीच पटली.

"तर आता मला त्या स्त्रीचं शव दाखवाल का? माझ्या अंदाजानुसार शवाच्या डोक्यामागे कानाजवळ कुठेतरी तुम्ही शवाचे निरीक्षण करत होतात. कारण कचऱ्याच्या पेटीतील केसांचे मोठाले पुंजके पाहता तिथे नक्कीच एखादी जखम किंवा घाव असण्याची शक्यात आहे. ते व्यवस्थित पाहण्यासाठीच आसपासचे केसं तुम्ही कापले असणार यात शंकाच नाही." सत्यवीर अगदी शांतपणे म्हणाला.

काही क्षण परत शांततेत गेले. कोणीही एक अक्षरही बोललं नाही.

"हॅलो मिस्टर सत्यवीर.. पोलिसांकडून तुमचं नाव ऐकून होते. आज तुमच्या भेटीचा प्रत्यक्ष योग अशा प्रकारे आला याचा खरंच आनंद झाला" एप्रन

घातलेला डॉक्टर शांततेचा भंग करत खुर्चीतून उठला आणि त्याने सत्यवीरशी हात मिळवला.

सत्यवीरने देखील हसून हस्तांदोलन केलं.

त्या डॉक्टरने आता जास्त वेळ न दवडता बाजूच्या लेडी डॉक्टरला सत्यवीरला घेऊन आतल्या बाजूला जिथे शव होतं तिथे घेऊन जायला सांगितलं. त्याप्रमाणे ती लेडी डॉक्टर सत्यवीरसोबत आत वळाली. तिच्या मागोमाग पुरुष डॉक्टर आणि देशमुख आतमध्ये जात असताना देशमुखांनी त्या पुरुष डॉक्टरच्या दंडाला स्पर्श करून त्याच्या कानाजवळ तोंड नेलं आणि म्हणले "सांगितलं होतं नं मी. एकवेळ आम्हा पोलिसांच्या नजरेतून काही गोष्टी निसटतील पण सत्यवीरच्या नजरेतून गोष्टी निसटण अवघड आहे. त्याच्या नजरेतून सावज एवढ्या सहजासहजी निसटत नाही"

देशमुखांच्या या खुसपूसण्यावर तो डॉक्टर फक्त मान डोलावून त्यांच्याकडे पाहत हसला. सगळेजण आतमध्ये जिथे शवविच्छेदन करतात त्या भागात आले. एका दगडी टेबलासारख्या आकाराच्या कट्ट्यावर एक शव पांढरे कापड टाकून ठेवण्यात आलेले होते. बाजूला एक बेसिन आणि स्टेनलेस स्टीलच्या प्लेटमध्ये काही वैद्यकीय हत्यारे होती. आजूबाजूला हिरव्या रंगाचे पडद्यांचे आवरण होते. सगळेजण त्या शवाजवळ आले. लेडी डॉक्टरने शवावरचा तोंडाजवळचा भाग दूर केला. मानेच्या उजव्याबाजूला निर्देश करत ती म्हणाली

"हिच ती जागा आहे. जिथे मृत व्यक्तीला इजा पोहोचली आहे" लेडी डॉक्टर एवढ बोलून बाजूला झाली.

सत्यवीरने स्वतः पुढे होऊन ती जागा न्याहाळायला सुरुवात केली. सत्यवीरने ज्याप्रमाणे तर्क लावला होता अगदी तसचं मृत व्यक्तीच्या उजव्या कानाच्या मागच्या बाजूला काळसर पडलेला भाग होता. डॉक्टर्सनी डोक्याच्या त्या बाजूचे काही केसं त्या भागाच्या निरीक्षणासाठी कापून काढलेले होते. सत्यवीर अगदी बारकाईने ती जागा न्याहाळत होता. मानेच्या बाजूला आणि कानामागे जवळपास चांगलाच मोठा काळा चट्टा पडलेला होता. जणू काही कोणी जड वस्तूने मारले असता त्या जागेवर मुकामार बसून सूज आल्यावर जसा दिसेल तसा काहीसा हा भाग दिसत होता. सत्यवीरने मानेजवळचा तो भाग व्यवस्थित निरखून पाहिला. परत जरासा २ पाऊले मागे लांब जाऊन उभा राहिला तिथून त्याने निरीक्षण केले आणि परत शवाच्या जवळ आला.

"शव प्रथम इथे आणलेलं असताना हा चट्टा एवढा मोठा नव्हता. नंतर तो एवढा मोठा दिसू लागला" पुरुष डॉक्टरने बोलायला सुरुवात केली. सत्यवीर आपलं निरीक्षण करतच डॉक्टरांच म्हणण ऐकत होता.

डॉक्टर पुढे बोलू लागले –"मृत व्यक्तीला काल जेव्हा शव विच्छेदनासाठी आणलं तेव्हा हा चट्टा दिसून पण येत नव्हता. जेव्हा आज सकाळी विच्छेदनासाठी शव तपासायला सुरुवात केली तर तो चट्टा चांगलाच मोठा झालेला दिसत होता. सगळ्या तपासण्या आणि शव विच्छेदनासाठी लागणाऱ्या सगळ्या चाचण्या पूर्ण केल्यानंतर आम्हाला एवढचं समजतंय कि मृत व्यक्तीच्या शारीरिक क्रिया बंद पडून त्यांचा मृत्यू झालेला आहे. इतर

कोणत्याही ठिकाणी कसलाही घाव किंवा झटापटीच्या खुणा दिसत नाहीयेत. याच घावामुळे जो आपल्याला कानामागे दिसतोय. या महिलेचा मृत्यू झालेला आहे" एवढ बोलून डॉक्टर शांत झाला आणि सत्यवीरकडे पाहू लागला.

"ओह्ह.. असं आहे तर..." सत्यवीर त्या मृत महिलेच्या शवाकडे पाहत कुजबुजला.

"तुला काय वाटतंय सत्यवीर" देशमुखांनी सत्यवीरला विचारलं.

"मला एक सांगा डॉक्टर मृत्यूची वेळ काय होती" सत्यवीरने देशमुखांकडे न पाहता डॉक्टरांना विचारलं.

"साधारण संध्याकाळचे साडेसहा ते साडेसात हि वेळ असावी" डॉक्टर उत्तरले.

"ओके.. आणि शव इथे कधी आणण्यात आले?" सत्यवीर परत प्रश्न विचरला.

"साधारण रात्री ९ च्या सुमारास" डॉक्टर म्हणाले.

"म्हणजे त्यावेळी तुम्ही हजर न्हावतात. कारण तुमच्या ड्यूटीची वेळ संपलेली असेल बरोबर" सत्यवीर म्हणाला.

"अं...हो मी सहाच्या दरम्यानच इथून निघतो" डॉक्टरांनी माहिती दिली.

"हा डाग जो आत्ता दिसतोय तुम्हाला किती वाजता दिसला ?

"सकाळी इथे आलो तेव्हा साधारण १० वाजता"

"म्हणजे रात्रीमध्ये हा डाग प्रकट झाला म्हणायचा?" सत्यवीर शंकेच्या सुरात स्वतःशीच पुटपुटला.

नंतर सत्यवीर इन्स्पेक्टर देशमुखांकडे वळत म्हणाला.

"देशमुख आता मला सविस्तरपणे प्रकरण काय आहे ते सांगा."

त्यावर देशमुखांनी सांगायला सुरुवात केली. –

"आम्हाला काल रात्री ८ वाजण्याचा सुमारास एक फोन आला कि आगरकर रस्त्यावर देसाईंच्या वाड्यावर एका महिलेचा मृत्यू झालाय. त्या महिला म्हणजेच मालती सरदेसाई त्या वाड्याच्या मालकीण. घटनास्थळी मी दोन हवालदार आणि एक सिनिअर पोलीस घेऊन गेलो होतो. वाड्यामध्ये आत जिथे मृतदेह होता तिथे जाऊन पाहिलं तर मालतीताईंचा मृतदेह त्यांच्याच खोलीमध्ये जमिनीवर निष्प्राण पडलेला होता. खोलीतील आजूबाजूच सामान अगदी आहे तसचं होतं. कसलीही चोरी किंवा मरतेवेळी केलेली झटापट जाणवत नव्हती. वरवर पाहता हृदयविकाराच्या झटक्याने हा मृत्यू आलेला असावा असं वाटत होतं. पोलिसांनी दखल देण्याइतपत काही हा मामला वाटत नव्हता." देशमुख पुढे काही सांगणार एवढ्यात सत्यवीरने त्यांना मधेच तोडले.

"तुम्हाला या घटनेसंदर्भात माहिती देण्यासाठी कोणी फोन केला होता?" सत्यवीरने शांतपणे खाली मान घालून ऐकत असतानाच देशमुखांना सवाल केला.

"आम्हाला फोन डॉक्टर पाटील यांनी केला होता. जे देसाई यांचे फॅमिली डॉक्टर आहेत. वाड्याच्या जवळच ते राहतात. मालतीताईंच्या घरातला आरडाओरडा ऐकून ते वाड्यात आले. त्यांनी मृतदेह तपासला तर त्यांना मालतीताईंच्या नाड्या बंद लागल्या आणि श्वाससुद्धा बंदच जाणावला.

मालतीताईंना जागेवर उठवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्या प्रयत्नांत डॉक्टरांना मालतीताईंच्या मानेमागे एक छोटासा रक्ताचा थेंब दिसला. जो जखमेतून नुकताच वर आलेला असल्यासारखा वाटत होता. तो थेंब पाटलांच्या निदर्शनास आला आणि त्यांना काहीतरी वेगळीच शंका आली. त्यांनीच मग पोलिसांना फोन करून बोलावून घेतलं. सगळा पंचनामा केल्यावर मृतदेह शवविच्छेदनासाठी न्यायचं ठरवलं" देशमुखांनी सगळा वृतांत सांगितला.

"साधारण रात्री ९ च्या आसपास मृतदेह या इमारतीत विच्छेदनासाठी आला, आणि तोपर्यंत हा काळसर डाग मानेवर जणू नव्हताच" सत्यवीर मान खाली घालून कसल्यातरी विचारात असतानाच बोलला.

"अगदी बरोबर" डॉक्टरांनी दुजोरा दिला.

"दुसऱ्या दिवशी सकाळी तुम्ही ड्युटीवर आलात. तेव्हा तो डाग तुम्ही पहिला" सत्यवीर म्हणाला

"सकाळी देशमुख इथे आल्यावर मी त्यांना मानेच्या डागाबाबत माहिती दिली. तेव्हा ते म्हणाले कि रात्री तर असा कोणताहि डाग तिथे नव्हता. अचानक रात्रीतून हा डाग कसा काय दृश्मान झाला काही कळेना." डॉक्टर भुवया उडवत म्हणाले.

"अगदी बरोबर मी पाहिलं तेव्हा तो भाग आत्ता जसा काळसर दिसतोय तसा दिसत नव्हता. अचानक या काळ्या डागाचे गौडबंगाल मला काही कळेना म्हणूनच मग मी तुला इथे बोलावण्याचा निर्णय घेतला." इन्स्पेक्टर देशमुख म्हणाले

"तुमचा काय अंदाज आहे डॉक्टर" सत्यवीरने डॉक्टर्सकडे बघत विचारले. पुरुष डॉक्टर हाताची घडी घालून शांतपणे उभा होता.

"आमचं विचारालं तर, आम्ही असा निष्कर्ष काढलाय कि कोणत्यातरी विशिष्ट अशा रासायनिक पदार्थाचा शरीरात प्रवेश झाला आणि तो पदार्थ रक्तात शरीरभर मिसळला गेला. त्यामुळेच शरीरक्रिया बंद पडल्या" डॉक्टरने सांगितलं.

"इंजेक्शनच्या सिरींजने काहीतरी टोचण्यात आलं असावं, बहुधा विष." देशमुखांनी आपली शंका व्यक्त केली

"ते रसायन बहुधा विषसदृशचं असावं. कारण रासायनिक तपासणीत रक्ताचा नमुना घेऊन चाचण्या करताना ते विष नक्की कोणतं आहे किंवा कोणत्या प्रकारचं आहे याचा तपास लागला नाही. उलटपक्षी काही वेगळ्याच प्रकारचे रासायनिक घटक शरीरात आढळले आहेत. ज्याची रसायन शास्त्रातील पारंगत फोरेन्सिक अधिकाऱ्यांना सुद्धा माहिती नाहीये. म्हणजे शरीरात आढळलेले ते घटक पदार्थच त्यांच्यासाठी नवीन आहेत" डॉक्टरांनी माहिती दिली

यावर सगळेच शांतपणे बसले.

"म्हणजे ते असं विष असू शकत ज्याची माहिती सध्या तरी रसायनशास्त्राला उपलब्ध नाहीये आणि त्याच रसायनाच्या शरीरातील प्रवेशामुळे मालती देसाई यांचा मृत्यू झाला आहे. त्याच रसायनामुळे मानेमागचा भाग काळसर पडला. सत्यवीरने देशमुख आणि डॉक्टर्स यांच्याकडे पाहत विचारलं

त्यावर दोघांनीही माना डोलावल्या.

"बर ते विष कशामार्फत देण्यात आलं असावं डॉक्टर." सत्यवीरने डॉक्टर्स जोडीला प्रश्न केला

"ते निश्चित सांगता येणार नाही. पण जिथे तो डाग दिसतोय नक्कीच तिथे असं काहीतरी टोचल गेलंय ज्यामुळे कोणतातरी विशिष्ट पदार्थ शरीरात गेला आणि तो काळसर डाग निर्माण झाला. कारण मानेच्या त्या टोचलेल्या भागाजवळच्या पेशी विषप्रभावाने जळून गेल्या आहेत. तिथे त्या डागाशिवाय अन्य कोणतीच खुण नाहीये फक्त एक छोटंसं होल आहे. ज्या मार्फत ते विषसदृश रसायन शरीरात प्रविष्ट झालं असेल. पण सिरींजमुळे असं होल पडत नाही म्हणून ते विष कोणत्या गोष्टीच्या सहाय्याने आत गेलं ते सांगता येत नाही." डॉक्टर्स पटापट बोलले.

काही वेळ असाच चर्चाविमर्श करण्यात गेला. पण अन्य कोणताच खुलासा झाला नाही. तूर्तास तरी एका महिलेचा मृत्यू एका विशिष्ट प्रकारच्या घातक पदार्थाने झालाय एवढचं निष्पन्न होत होतं. सत्यवीरने आपल्या जवळील नोंदवहीत काही नोंदी लिहिल्या आणि देशमुखांसोबत तो इमारतीखाली आला.

"काय सत्यवीर.. काय वाटतंय तुला या प्रकरणाविषयी? असा कोणता रासायनिक पदार्थ असावा ज्याने मालती देसाई यांना संपवण्यात आलं." इन्स्पेक्टर देशमुख आपल्या गाडीजवळ जवळ उभे राहत म्हणाले.

"सध्या तरी एवढचं दिसतंय कि कोणत्यातरी विचित्र विषप्रयोगामुळे मालतीताईंचा मृत्यू झालाय. आता तो मृत्यू कसा झाला ते शोधावं लागणार." सत्यवीर खालच्या आवाजात सुस्कारा टाकत म्हणाला.

"तुला हि केस महत्वपूर्ण वाटतेय ना? म्हणजे हे प्रकरण निश्चितच खुनाच आहे आणि तुला हे प्रकरण माझ्यासोबत सोडवण्यात रस आहे कि नाही हे मला जाणून घ्यायचंय? देशमुखांनी साशंकतेने विचारलं.

"हो देशमुख, निश्चितच मला रस वाटतोय या प्रकरणात. खून करण्याची खुन्याची हि विशिष्ट पद्धत मला जरा जास्तच रसपूर्ण वाटतेय. मला आवडेल हे खून प्रकरण तुमच्यासोबत सोडवायला." सत्यवीरने हसतच सांगितलं.

"हे उत्तम झालं कारण खरं सांगायचं तर मला हे प्रकरण वाटत तेवढं सोप्पं वाटत नाहीये. कारण बघ ना खुन्याने हा खून खूपच अनोख्या पद्धतीने केलाय आणि खुन्याने खून करण्यासाठी कोणतं हत्यार वापरलं असेल हे देखील समजत नाहीये. माझं डोकं जरा चक्रावून गेलं होतं म्हणूनच तुला फोन करून बोलावून घेतलं. आणखी एक गोष्ट सांगतो. मालतीताई या शहराच्या माजी नगरसेविका होत्या तेव्हा त्यांच्या मृत्यूची बातमी लोकांमध्ये पसरलेली आहेच. राजकारणाशी संलग्न असलेल्या त्या व्यक्ती होत्या त्यामुळे मला जरा प्रेशरच आलं होतं. मी कमिशनर साहेबांना सांगितलं आहे कि मी सत्यवीरची मदत घेईन आणि त्यांनी सुद्धा आनंदाने होकार दिला आहे. आता तू सुद्धा हि केस सोडवायला माझ्यासोबत आहेस म्हटल्यावर माझा अर्धा ताण गेला बघ" देशमुख स्मितहास्य करत म्हणाले.

देशमुखांच्या या वाक्यावर सत्यवीरने देखील स्मितहास्य केलं.

"बर मग आता हे प्रकरण कस हाताळायचं आहे आपण" देशमुखांनी सत्यवीरला प्रश्न केला.

"तुम्हाला खुनाची खबर द्यायला फोन देसाई यांचे फॅमिली डॉक्टर पाटील यांनी केला होता ना? तर सुरुवात त्यांच्यापासूनच करूयात. उद्या मी त्यांची भेट माझ्या पद्धतीने घेतो आणि तपासाला सुरुवात करतो. शवविच्छेदनाचा रीतसर अहवाल आला कि मालतीताईंचं शव त्यांच्या कुटुंबाकडे सुपूर्त केलं जाईल. मग दहन संस्कार झाल्यानंतरच आपण देसाई वाड्यावर जाऊयात. अर्थात तत्पूर्वी तुम्हाला मी टेलीफोन करेनच. पोलिसांची सोबत मला लागेल कारण देसाई कुटुंबीय मला ओळखत असतील वा नसतील माहित नाही. एकदा तिथे पोहोचलो कि मग मी इतर तपास करेन " सत्यवीर म्हणाला.

"ठीक आहे तुझ्या पद्धतीने हवं ते कर. मी तुला शक्य ती सगळी कायदेशीर मदत करेनच. बऱ चल आता. रात्र बरीच झालीय. तू आता घरी जा. आपण उद्या भेटूयात" असं म्हणत देशमुख पोलिसांच्या गाडीत बसले.

त्यांची गाडी रस्त्याच्या चौकातून वळल्यावर सत्यवीरदेखील आपल्या घराकडे जाण्यासाठी आपल्या दुचाकीकडे वळला. बऱ्याच दिवसांनी असं रंजक प्रकरण हाती आल्याने सत्यवीरला जरा बर वाटलं. नाहीतर दिवस कसे नुसते रटाळ जात होते. उद्यापासून कामाला लागायला हवं. कारण हे देसाई वाड्याच प्रकरण पोलिसांना सुद्धा लवकरात लवकर सोडवायचं आहे. सत्यवीर स्वतःच्याच मनाशी म्हणाला. विचार करतच त्याने आपली दुचाकी चालू केली आणि आपल्या घराकडे निघाला.

वेषांतर

उन्हाचा तडाखा चांगलाच जाणवू लागला होता. रस्त्यावरून चाकरमान्यांची कामाच्या ठिकाणी जायची लगबग चालू होती. सकाळी अगदी नऊच्या सुमारास या बागेमध्ये लहान मुले आणि बिनकामाचे म्हातारेकोतारे लोक फेरफटका मारायला येत. त्यातले काही आपल्या नातवंडांना घेऊन येत तर काही पाय मोकळे करायच्या नावाखाली मुलांच्या किंवा मुलींच्या संसारातील कागाळ्या एकमेकांना सांगायला येत असत. बाग तशी चांगलीच मोठी होती. दुपारी १-४ बंद असायची. आजसुद्धा बागेमध्ये बऱ्यापैकी लहान मुले आणि म्हातारी माणसे यांची गर्दी होती. सकाळचे कोवळे उन जाऊन आता त्याची जागा कडक उन्हाने घेतली होती. बागेमध्ये फिरणारे वयोवृद्ध आता फिरायचे सोडून झाडाखालच्या बाकांकडे जाऊन विसावू लागले होते. अशाच एका बाकावर डॉक्टर पाटील हाताच्या बोटांचा चाळा करत समोरच्या घसरगुंडीवर खेळत असलेल्या लहान मुलांकडे बघत बसलेले होते. त्याचं वय साधारण ४० असावं. डोळ्यावरचा चष्मा सारखा करत डॉक्टर पाटील समोर पाहत कसल्यातरी विचारात गढलेले दिसत होते.

तेवढ्यात खाकखाख असं खाकरत एक वयोवृद्ध म्हातारा पाटील डॉक्टरांच्या जवळ येऊन उभा राहिला. पाटील अजूनही समोरच्या लहान मुलांकडे एकटक पाहत बसलेले होते.

"आरं हित कुनी बसलंय का बाळा...?" घसा खाकरत तो म्हातारा पाटलांच्या शेजारील रिकाम्या जागेकडे निर्देश करत म्हणाला.

त्या वाक्यासरशी पाटील डॉक्टर भानावर आले.

"अं...क.. काय म्हणालात आजोबा.." काही न कळून भानावर येत पाटील त्या म्हाताऱ्याकडे पाहत म्हणाले.

चेहऱ्यावर सुरकुत्या, डोक्यावर पिकलेले केस, अंगात एक पांढरा सदरा आणि खाली एक कळकट्ट धोतरं अशा वेशातील त्या म्हाताऱ्याकडे पाहून पाटलांनी आपल्या चेहऱ्यावरचा चष्मा सारखा करत एक कटाक्ष टाकला.

"आर तुज्या बाजूला कुनी बसलं हाय काय. हे इचारत होतो म्या" असं म्हणत आणि पाटलांच्या उत्तराची वाटही न पाहता तो म्हातारा पाटलांच्या शेजारी जाऊन बसला. पाटील काही बोलणार एवढ्यात त्या म्हाताऱ्याने एक पाय खाली सोडून आणि दुसरा पाय दुमडून घेऊन त्या बाकावर बस्तान मांडले.

सदरा थोडा वर करून आतल्या चोर कप्प्यातून कसलीतरी मळकट पुडी बाहेर काढून त्यातली तंबाखू हातावर घेत नंतर डबीतून चुना काढत त्या म्हाताऱ्याने तंबाखू मळायला सुरुवात केली. डॉक्टर पाटील त्या म्हाताऱ्याकडे पाहतच राहिले. असं अगदी शेजारी बसून तंबाखू मळत बसलेल्या म्हाताऱ्याला पाहून त्यांना जरा चिडच आली पण त्या म्हाताऱ्याचं वयं पाहता पाटलांनी राग

आवरत नाकावर येणारा चष्मा सरळ करत विचारलं "अहो आजोबा शेजारी कोणी बसलं आहे कि नाही हे मी नं सांगताच बसला तुम्ही"

"असुदे रे कोणी नव्हतं बसलं इथे. मी पायल होतं दुरून. मी आपलं उगा इचारायचं म्हणून बोललो. तुम्हा शहरातल्या माणसांना असं इचारून बसावं लागतं असं माझ्या पोराने मला सांगितलं होतं" म्हातारा तंबाखू मळत पाटलांकडे न पाहताच बोलला.

"ओह्ह अच्छा... म्हणजे या शहरात नवीन आहात तर तुम्ही" पाटील जरा सावरत म्हणाले.

"हा तसं हायेच. मागच्याच हप्त्यात माझ्या पोराकडे आलोय मी. हे काय पलीकडच्या दोन बिल्डिंगा सोडून घर आहे माझ्या पोराचं. नातवाचा वाढदिवस आहे म्हणून आलो. नायतर आमी काय गावाकडे असतो..." बोलता बोलता म्हाताऱ्याने तंबाखू मळून व्यवस्थितपणे तोंडात ठेवली आणि हात झटकू लागला.

"अच्छा..." एवढच बोलून पाटील जरा सावरून बसले. खरतर या म्हाताऱ्याच्या येण्याने त्यांची तंद्री भंग पावली होती.

"तू काय करतो रे पोरा" म्हाताऱ्याने तंबाखू चघळत पाटलांना विचारलं. आता म्हातारा काही स्वस्थ बसू देणार नाही असं पाटलांना वाटलं कारण गावाकडून आलेले म्हातारे हे एकदा बोलू लागले कि थांबता थांबत नसत. आता या गपिष्ट म्हाताऱ्याशी बोलण्यावाचून गत्यंतर नाही असं वाटून पाटील बोलू लागले.

“मी डॉक्टर आहे आजोबा “

“अरा बापरे म्हणजे मोठा माणूस हाय रे तू” म्हातारा डोळे मोठे करत म्हणाला.

“तसं काही नाही इतर डॉक्टर लोकांसारखाच आहे” शक्य तितक्या हळू आवाजात पाटील म्हणाले.

“नाई म्हणजे आप्रेशन बिप्रेषन करन म्हणजे काय सोप्पं काम नाही गड्या. ते तुम्हा लोकांना जमतं म्हणजे मोठच कि तुम्ही” म्हातारा डोळे मिचमिच करत बोलला.

“नाही नाही आजोबा.. सर्जन नाहीये मी. जनरल फ्यिजिशिअन आहे.” डॉक्टर पाटील स्पष्ट शब्दात आणि काहीशा मोठ्या आवाजात म्हणाले.

“ऑ.. काई ते..” पाटलांच्या इंग्रजीत उच्चारलेल्या त्या शब्दांच्या उलगडा न झाल्याने म्हातारा कडू तोंड करत म्हणाला.

“अ.. म्हणजे ऑपरेशन करणार डॉक्टर नाही. आजाराची लक्षण पाहून औषध गोळ्या देणारा डॉक्टर आहे मी” पाटील स्मितहास्य करत म्हणाले. हि आपली ओळख सांगताना आपण स्मितहास्य करत आहोत हे पाटलांच्या लक्षात येताच पाटील दुसऱ्या क्षणाला शांत बसून समोर पाहू लागले.

“हम्म...म्हंजे साधा डाक्टर आहेस तर...” असं म्हणून ओठ एकमेकांवर दाबत म्हातारा आपल्या सदऱ्याच्या आत काहीतरी शोधू लागला. अतिशय कुत्सितपणे आपला साधा डॉक्टर म्हणून केलेला उल्लेख पाटलांना मुळीच

आवडला नाही. थोडक्यात म्हाताऱ्याचे ते 'साधा डॉक्टर' हे वापरलेले शब्द त्यांच्या वर्मी घाव करून गेले आणि न राहवून पाटील त्या म्हाताऱ्याला म्हणाले.

"एक मिनिट आजोबा.. अहो फक्त क्रिडेन्शिअल पाहून तुम्ही अमुक डॉक्टर साधा कि भारी असं नाही ठरवू शकत" नाकावर सरकणारा चष्मा सरळ करत पाटील जराश्या घुश्यातच म्हणाले. तो म्हातारा अजूनही सदऱ्यात हात घालून काहीतरी शोधतच होता. पाटील अजूनही त्या म्हाताऱ्याकडे पाहत उत्तराच्या अपेक्षेने तोंड अर्धवट उघडे ठेवून पाहत होते. शेवटी त्या म्हाताऱ्याला सदऱ्याच्या आतमधे जे पाहिजे होते ते सापडले.

पाटलांकडे बघत तो म्हातारा म्हणाला "हे बघ पोरा ते किडे बिडे का काय ते तू जे म्हणालास ते मला काय कळत नाय बघ. आम्हा गावाकडच्या लोकांचं कसं असतंय आप्रेशन करणारा डाक्टर म्हणजे भारी माणूस एवढचं गणित असतंय आमचं"

म्हाताऱ्याच्या या उत्तरावर आता मात्र पाटील डोक्याला हात लावून बसले. हा म्हातारा चांगलाच डोकं खाणारा आहे हे त्यांना कळून चुकलं. साला काय कटकट आहे. बागेत नेहमीप्रमाणे फेरफटका मारून शांतपणे बाकावर बसायचो. आज काय हि ब्याद उपटली असं वाटून पाटील डोकं खाजवत समोर पाहत शांत बसले. म्हाताऱ्याने पाटलांकडे पाहिलं आणि त्याला जाणवलं कि पाटील दुखावले गेले आहेत. तसं तो समजुतीच्या स्वरात म्हणाला

"अरे पोरा आमच्यासारख्या म्हाताऱ्या माणसाचं बोलण काय मनाला लाऊन घेतोस रे... आम्हाला काय कळतय त्यातलं बाबा तू सुद्धा मोठाच असचील "

म्हाताऱ्याच्या या सावरासावरीने पाटलांच काही समाधान झालं नाही उलट डॉक्टर पाटील बसल्या जागीच पाय हलवत जरा रागातच समोर पाहू लागले. पाटलांची शांतता म्हाताऱ्याला काही रुचली नाही तेव्हा तो म्हातारा अजून पुढे म्हणाला. "अरे बाबा माणसांना जीवदान देणारं समदं डाक्टर सारखेच. फक्त त्यातल्या त्यात जाणारा जीव वाचवा म्हणून धडपड करणारा डाक्टर. हा खरा मोठा डाक्टर" म्हातारा उगाचच दात दाखवत म्हणाला.

"मी सुद्धा तसाच डॉक्टर आहे आजोबा. या भागातला एक प्रतिष्ठित, नावाजलेला आणि कित्येकांचा फॅमिली डॉक्टर आहे मी. माझ्या उपचारांचा गुण बऱ्याच जणांना येतो." पाटील त्या म्हाताऱ्यावर नजर रोखून म्हणाले.

"अस्स काय.. असेल हो.. काई सांगू बाबा.. आजकाल जीवाचा काई भरवसा नाही. खूप स्वस्त झालाय बग. कालच्याला आमच्या शेजारचा बोबडे नावाचा एक माणूस सांगत होता कि एक बाई मेली खालच्या गल्लीतील" म्हातारा जरा आठवल्यासारख करत म्हणाला.

म्हाताऱ्याच्या तोंडून बाई मेली असा उल्लेख ऐकून पाटील जरा गंभीर झाले. त्या बाईचा मृतदेह मीच तपासला असं सांगून या म्हाताऱ्याला गप्प करावं अशा उद्देशाने पाटील म्हणाले – "हो त्या बाईंचा मृतदेह मीच तपासला होता आणि मृत झाल्याचं घोषित केलं होतं. कारण मी त्यांच्या जवळच राहतो आणि त्यांच्या घरात कोणालाही आजारपण आल्यास मलाच बोलावतात." डॉक्टर पाटील आपली मान ताठ करत म्हणाले.

"काई सांगतो काय" जरा मोठ्याने बोलत तोंडातून एक पिचकारी बाजूला मारत म्हातारा आता पाय सरळ करून बाकावर बसला. "माणूस मेलाय हे तुला समजलं लेका.. म्हणजे तू तर मोठा डाक्टर असला पाईजे रे..."

म्हाताऱ्याने आपला या वेळी मोठा डॉक्टर असा उल्लेख केलेला ऐकून पाटील मनातून सुखावले पण त्यांनी चेहऱ्यावर तसं दाखवलं नाही. म्हातारा उगाच काहीतरी खोचक बोलेल म्हणून पाटील यावेळी शांतच बसले. पण म्हातारा काही शांत बसायच्या मूड मध्ये नव्हता.

"अरे मग काय झालं काय हुत तिथे नक्की, तुला कस कळल ती बाई मेलिय ते. तुला त्यांनी बोलावलं म्हंजी नक्कीच तू हुशार असला पाईजे बाबा" म्हातारा आ वासून पाटलांकडे बघत म्हणाला. परत एकदा हुशार असा उल्लेख झालेला पाहून पाटील मनोमन सुखावले आणि देसाई कुटुंबीयांकडे त्यांनाच कसं बोलावलं गेलं याबद्दल सांगू लागले.

"काही नाही आजोबा.. मी आधीच तुम्हाला सागितलं आहे कि मी इथला खूप नावाजलेला आणि प्रतिष्ठित डॉक्टर आहे. तसाच अनेकांचा फॅमिली डॉक्टर आहे. त्या मेलेल्या बाईंच्या घरच्यांचासुद्धा फॅमिली डॉक्टर होतो. मी आपल्या क्लिनिकमध्ये बसलो होतो आणि बाहेर अचानक मला आरडाओरडा ऐकू आला. तसा मी बाहेर आलो. बाजूच्या कोणीतरी मला सांगितले कि समोरच्या वाड्यातील मालतीताई यांना भोवळ आलीय आणि त्या खाली जमिनीवर पडल्यात तर तुम्ही चला. आजूबाजूला इतर कोणीही माझ्या इतका नावाजलेला डॉक्टर नव्हता त्यामुळे ते कदाचित माझ्याकडे आले असावेत म्हणून मी तडक त्यांच्या वाड्यात गेलो. तर ती बाई जमिनीवर तिच्या खोलीत

पडली होती. तिचे ठोके लागत नव्हते आणि नाडीसुद्धा बंद होती. मी स्टेथेस्कोपने तपासलं तर जिवंत असण्याचा एकही पुरावा दिसत नव्हता"

"मंग काय केलं तू..." पाटलांच वाक्य मधेच तोडत म्हातारा बोलला.

"मग काय? मला जरा शंका आली. मग मीच हॉस्पिटलमध्ये हलवा असं सांगितलं" पाटील हाताची घडी घालत समोर पाहत गंभीरपणे म्हणाले.

"अरर.. बिचारीला अटाक आला असणार बघ... मी म्हणालो ना रे डाक्टर आजकाल जीवाचा भरवसा नाहीच बघ. आमचा शेजारी बोबडे थेरडा उगाचच काहीही उठवतो कि खून झाला म्हणून" म्हातारा उगाचच कसनुस तोंड करत म्हणाला.

"अहो आजोबा खुनच झालेला होता आणि बिचारी वगैरे कसली हो, चांगलीच पाताळयंत्री बाई होती ती" पाटील त्रासिक सुरात समोर पाहत म्हणाले.

"अह...अस्स होय..." तोंडावरचा घाम धोत्र्याच्या सोग्याने पुसत विचित्र चेहरा करत म्हातारा खाली पाहू लागला.

म्हाताऱ्याला खून हा शब्द ऐकून धडकी भरली असावी. म्हणूनच घाबरून शांत झाला असावा असं वाटल्याने पाटलांना जरा आवेश चढला. आणि ते म्हणाले

"अहो आजोबा घाबरू नका. इथे काय दिवसाढवळ्या खून दरोडे घडत नाहीत आणि माझ्यासारख्या नावाजलेल्या डॉक्टरसोबत तुम्ही या बागेत मध्ये

बसलेले असताना तुम्हाला कोण काय करणार" नाटकी हसत हसत पाटील म्हणाले.

म्हातारा अजूनही जमिनीकडे पाहतच होता. पाटील त्याच्याकडे पाहत होते. त्यांना वाटलं, काय पण म्हातारा आहे राव खून म्हटलं कि घाबरतो.

थोड्या वेळाने तो म्हातारा खाली पाहतच म्हणाला "अरे पोरा मी घाबरलो नाही. फक्त ईचार करतोय कि तू एवढ्या खात्रीने कसं काई बोलला कि खूनच झाला होता म्हनून कारण तुला तर बाईला भोवळ आलीय आन ती जमिनीवर पडलीय म्हणून बोलावलं होतं ना?" एवढ बोलून म्हाताऱ्याने पाटलांकडे साशंक नजरेने पहिले. त्या म्हाताऱ्याची ती नजर पाहून पाटील अवाकच झाले. म्हणजे हा म्हातारा आपल्यावर संशय घेतोय. याची हिम्मतच कशी काय झाली. असं वाटून पाटील पुढे बोलले.

"हे बघा आजोबा मी एक डॉक्टर आहे आणि डॉक्टरांना शरीरशास्त्रातील सगळं कळत. त्या बाईचं शरीर पूर्णपणे आखडल होतं. हृदयक्रिया बंद पडल्याने असं लक्षण दिसत नाही आणि तिच्या मानेवर सुद्धा रक्ताचा थेंब होता जणू काही कोणीतरी जबरदस्तीने इंजेक्शन देऊन मारलं असावं असा. अर्थात त्यावेळी मी कोणालाच काही सांगितल नाही. तसंही ती काय साधीसुधी बाई वाटली काय तुम्हाला. अहो मोठी पोचलेली राजकारणी बाई होती ती. बऱ्याच लोकांचं नुकसान केलं होत तिने. घेतला असेल कोणीतरी तिचा बदला. तुम्हाला काय माहिती? नवीन आहात तुम्ही इथे" रागारागात एवढ बोलून पाटलांनी आपल्या मनगटावरच्या घड्याळात पहिले. १० वाजून गेले होते. आज सकाळ सकाळ म्हाताऱ्याने डोक्याला ताप दिला होता.

"तुमचं पन चांगलंच नुकसान केलेलं हुतं वाटतं त्या बाईने, एवढं तावातावाने बोलताय ते" म्हाताऱ्याने तोंडातून एक पिचकारी बाजूला मारून धोतराने तोंड पुसलं आणि उगाचच नजर रोखून पाटलांकडे बघू लागला. पाटलांनी त्या म्हाताऱ्याकडे पहिले त्यांना त्या म्हाताऱ्याची नजर विचित्र वाटली. बोलता बोलता आपण बरंच काही बोलून गेलो याची खंत त्यांना वाटून हाताच्या मुठी आवळून ते जरा आखडून बसले. काही वेळातच या म्हाताऱ्याच्या टकळीपासून सुटका करून घ्यावी म्हणून ते जागेवरून उठले आणि उगाचच मनगटावरच्या घड्याळात पाहत म्हणाले "चला मी निघतो माझी दवाखान्यात जायची वेळ झाली" आणि त्या म्हाताऱ्याकडे न पाहतच चालू लागले.

बागेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोचल्यावर पाटलांना जरा हायसं वाटलं. बाहेर पडताना उगाचच त्यांनी आपण मगाशी बसलेल्या बाकड्याकडे नजर वळवली. तर तो म्हातारा एक पाय बाकावर ठेवून बागेच्या मुख्य प्रवेशद्वाराकडेच नजर रोखून एकटक त्यांच्याचकडे पाहत होता. पाटलांनी तिथून लागलीच काढता पाय घेतला.

आता संध्याकाळ होत आली होती. इन्स्पेक्टर देशमुखांची गाडी पोलीस स्टेशन पासून निघाली. त्यांना तडक सत्यवीरला भेटण्यासाठी त्याच्या घरी जायचं होतं. मालती देसाई खून प्रकारणाच कामकाज म्हणावं तसं वेग घेत नव्हते. कोणतीच महत्वाची माहिती पुढे येत नव्हती. पण आता सत्यवीरने तपासकार्यात हातभार लावायचं ठरवल्यामुळे तपास करण सोप्पं पडणार होतं. काही वेळाने पोलिसांची गाडी सत्यवीरच्या घरापुढे थांबली आणि त्यामधून

देशमुख रुबाबात खाली उतरले. सोबतच्या हवालदाराला त्यांनी गाडीजवळच उभं राहायला सांगितलं आणि ते एकटेच सत्यवीरच्या घराच्या दरवाजाजवळ आले. दार अर्धवट उघडच असल्याने ते सरळ आत लोटून देशमुख आत आले आणि समोरचे दृश्य पाहून जरा चपापलेच. आतमध्ये एक म्हातारा खुर्चीत बसून त्याच्या दोन्ही तंगड्या टेबलावर पसरून आरामात सिगारेट ओढत बसला होता.

"अ...आपण कोण आणि सत्यवीरच्या घरात काय करताय..." इन्स्पेक्टर देशमुखांनी आश्चर्याने विचारलं.

देशमुखांनी असं बोलताच समोरचा म्हातारा खळाळून हसला आणि त्याने डोक्यावरचा पांढऱ्या केसांचा विग आणि नकली पांढऱ्या मिशा समोर टेबलावर काढून ठेवल्या. आपले केसं तो एका हाताने व्यवस्थित करू लागला.

"ओह्ह.. सत्या तू.. अरे मी ओळखलंच नाही तुला" देशमुख चेहऱ्यावर हास्य आणत म्हणाले. तसं देशमुखांना माहित होतं कि काही विशेष कारण असल्यास सत्यवीर वेषांतर करून तपास करतो. तरीपण आत्ता त्याला हे सोंग आणावयाची काय गरज पडली ते समजेना.

"चला तुम्ही मला ओळखलं नाही म्हणजे म्हाताऱ्याचे सोंग झकास जमले होते तर" अस म्हणत सत्यवीरने आपल्या नकली मिशा बाजूला सरकवून ठेवल्या.

"पण मला एक सांग सत्या हे अचानक असं सोंग का घेतलस बाबा?" देशमुखांना आपलं कुतूहल लपवता आलं नाही.

"काही नाही हो इन्स्पेक्टर साहेब. मला वाटलं कि मालतीताई यांच्या खुनाची चौकशी आधी बाहेरून करावी" सत्यवीर म्हणाला.

"पण असं वाटण्यामागे काही विशेष कारण?" देशमुखांनी विचारलं.

"हा.. म्हणजे मला असं वाटलं कि मृत व्यक्ती स्वभावाने किंवा व्यक्तिमत्वाने कशी होती याची विचारणा बाहेरून करून घ्यावी अर्थात ती नेहमीप्रमाणे सरळ मार्गाने न करता या विशिष्ट पद्धतीने. तसंही या प्रकरणात प्रतिष्ठित व्यक्तीचा समावेश असल्याने त्याबद्दलच्या ना ना प्रकारच्या वावड्याच जास्त उठतात. केसचा तपास सुरु करण्यापूर्वी या वावड्या काय असू शकतात त्यात तथ्यांश किती याची चाचपणी करणे गरजेचे होते. लोक पोलिसांना किंवा कोणत्याही खाजगी गुप्तहेराला अशा गोष्टी सरळ सांगत नाही म्हणूनच त्या जाणून घेण्यासाठी हा खटाटोप." टेबलावरील नकली केसांच्या विगकडे निर्देश करत सत्यवीरने सिगरेटचा एक दिर्घ झुरका घेतला.

"ओह्ह... असं आहे तर.. मग तुझ्या हाती काय लागलं. तसं पोलीस खात्याने सुद्धा त्यांच्या परीने बाहेर चौकशी केली होती. पण आता तू म्हणतोयस कि लोक सगळ्याच गोष्टी पोलिसांना स्पष्ट सांगत नाहीत तर तुला नक्की काहीतरी सापडलं असेलच" देशमुखांनी विचारणा केली.

"काही गोष्टी समजल्या. ठरल्याप्रमाणे मी डॉक्टर पाटलांना म्हाताऱ्याच्या वेशात बागेत सकाळ सकाळ भेटलो. मी या भागात एक नवखा नागरिक आहे असं भासवून शेजारच्या भागात खून झालाय असं कळल्याचे सांगून झालेल्या खुनाची चौकशी केली." सत्यवीर सांगत असतानाच देशमुख मधेच म्हणाले.

"अरे वाह.. म्हणजे पाटील डॉक्टरांनी तुला ओळखले नसेलच. तुला त्यांच्याकडून काय माहिती मिळाली." देशमुख स्मित करत म्हणाले.

"मालतीताई ज्यावेळी जमिनीवर कोसळलेल्या होत्या त्यावेळी डॉक्टर पाटलांना वाड्यावर बोलावलं होतं आणि त्याचवेळी त्यांना असा संशय आला होता कि मालतीताईंचा खून झाल्याची शक्यता आहे. इतर माहितीच म्हणाल तर मालतीताईंची समाजात चांगली प्रतिमा नाही. त्यांनी बऱ्याच लोकांचं आर्थिक वा सामाजिक स्तरावर नुकसान केलेलं आहे. किंबहुना डॉक्टर पाटील सुद्धा याचे बळी ठरलेत असा मला दाट संशय आहे" सत्यवीरने सिगारेटचे थोटूक विझवत बाजूला ठेवले.

"हम्म.. आम्हाला सुद्धा लोक बऱ्यापैकी हेच सांगत होते कि बाई जरा खाष्टच होती. तिच्या फायद्याच्या आणि जवळच्या लोकांनाच कामे मिळवून द्यायची. पण डॉक्टर पाटलांनासुद्धा मालतीताईंबद्दल आकस असावा हे विशेष आहे. कारण पोलीस चौकशीत तर डॉक्टर पाटील तसं काही असल्याचं दाखवत नव्हते" देशमुख विचारमग्न होत म्हणाले.

"खुनासारख्या प्रकरणात पोलिसांना अशा माहित्या देऊन कोण कशाला आफत ओढवून घेईन देशमुख साहेब. डॉक्टर पाटील यांच्या चौकशी नंतर मी त्या भागातल्या बऱ्याच लोकांना जसे कि दुकानदार, स्थानिक भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या क्लब मधील मेंबर यांना भेटलो. सगळ्याचं ऐकून मला हे वाटतंय कि मृत मालतीताईंबद्दल लोकांच मत चागलं नाहीये." सत्यवीर हाताची घडी घालत टेबलाकडे एकटक पाहत म्हणाला.

"हम्म.. म्हणजे मालतीताईंना मारून बऱ्याच जणांना फायदा होऊ शकतो असं दिसतंय. मालतीताईंना पाण्यात पाहणारा कोणीतरी असेल ज्याचं मालतीताईंनी नुकसान केलं असेल किंवा त्यांचा कोणी राजकारणातील शत्रू हे कृत्य करू शकतो." देशमुख म्हणाले.

"शक्यता नाकारता येत नाही देशमुख साहेब, पण मालतीताईंचा मृत्यू घरात झालाय. त्यांचा खून करणाऱ्याला त्यांच्या घरात जाऊन मारण्यासाठी कोणा ना कोणाची मदत घ्यावी लागलेली असू शकते. तो व्यक्ती घरात आला तसा खून करून बाहेर गेला असं सहजासहजी शक्य होणार नाही. कोणीतरी त्याला नक्कीच मदत केलेली असेल" सत्यवीर हात डोक्यामागे घेत वर आढ्याकडे पाहत म्हणाला.

"शिवाय मालतीताईंचा मृत्यू सुद्धा विशिष्ट पद्धतीने झालाय. खुन्याने कोणताही मागमूस न सोडता हे काम कोणाच्या मदतीशिवाय करण शक्य वाटत नाहीये." देशमुखांनी सत्यवीरच्या म्हणण्याला जोड दिली.

"पण काही प्रश्न हे उरतातच देशमुख. मालतीताईंचा काटा खुन्याने विशिष्ट पद्धतीनेच का काढला असेल? असं कोणतं विष त्याने वापरलं असेल ज्याने मालतीताई तत्क्षणी मृत्युमुखी पडल्या? चाकू भोसकून किंवा रस्त्यावर अपघात करून मालतीताईंना मारणे शक्य असताना हि विशिष्ट पद्धतच का वापरली असावी? शिवाय खुन्याने ते विष मालतीताईंना कस दिलं असेल?" एकामागोमाग एक प्रश्न उपस्थित करत सत्यवीर आपल्या खुर्चीत डोळे मिटून शांत बसला. यावर काहीही उत्तर नसल्याने देशमुखसुद्धा शांत बसले

काही वेळ असाच शांततेत गेला. नंतर त्या शांततेचा भंग करत सत्यवीर म्हणाला

"चला देशमुख, मला वाटत आता आपण देसाई वाड्यावर जाऊन प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी आणि घरातील लोकांची चौकशी करायला हवी. उर्वरित प्रश्नांनी उत्तरं आपल्याला कदाचित तिथे मिळू शकतात" सत्यवीर लगबगीने म्हणाला.

"हो खरतर त्यासाठीचं मी इथे आलो होतो. मालतीताईंच्या देहावर दहन संस्कार होऊन बरेच दिवस झाले आहेत. त्यामुळे तुला टेलिफोन न करता लगोलग तुला घेऊनच देसाई वाड्यावर जावे असा विचार होता" देशमुख जागेवरून उठत म्हणाले.

"हे एक बरे केलेत. मला तुमची सुद्धा मदत लागेलच" सत्यवीर म्हणाला.

पुढच्याच क्षणी सत्यवीर आणि इन्स्पेक्टर देशमुख घरातून बाहेर पडले. देशमुखांनी खाली उभ्या केलेल्या पोलिसांच्या गाडीत येऊन दोघेही बसले. गाडीत बसताच देशमुखांनी हवालदाराला आदेश दिला "चला म्हस्के गाडी आता तडक देसाई वाड्याकडे न्या"

इंस्पेक्टर देशमुखांच्या आदेशासरशी हवालदार म्हस्केनी गाडी चालू केली आणि गाडी देसाई वाड्याकडे जाऊ लागली.

काही वेळातच पोलिसांच्या गाडीमधून सत्यवीर देसाई वाड्याच्या जवळ पोहोचला. देसाई वाडा तसा प्रशस्त आणि आकाराने सुद्धा मोठा वाटत होता. वाडा दुमजली असून मोठ्या दगडाचं बांधकाम जुन्या काळातील होतं. मात्र वाडा अजूनही भक्कम असल्याप्रमाणे उभा होता. आजूबाजूला काही अंतरावर देसाई वाड्यासारखेच काही प्रशस्त वाडे होते. तिथे काही म्हातारी जोडपी राहायची त्यांची मुले इतर ठिकाणी कामाला असल्याने ती दांपत्य इथे एकटेच राहत असत अशी माहिती देशमुखांनी पुरवली. वाड्याच्या मुख्य दरवाजाजवळ एक पाटी होती "देसाई वाडा". गाडीतून उतरून सत्यवीर त्या पाटीजवळ उभा राहून ती पाटी न्याहाळू लागला. मागून देशमुख आणि म्हस्के हवालदार त्याच्याजवळ येऊन उभे राहिले आणि सत्यवीर नक्की काय पाहतोय हे बघू लागले.

"खूपच जुना आहे वाटतं हा वाडा" दारावरील पाटीकडे पाहतच सत्यवीर म्हणाला.

"हो खूपच जुना.. खरंतर मालतीताई यांच्या पूर्वजांचा हा वाडा वडिलांच्या पश्चात मालतीताई यांना मिळाला. मग त्या आपल्या नवऱ्यासोबत इथेच राहत होत्या" देशमुखांनी माहिती पुरवली.

"चला आत जाऊ" सत्यवीर अचानक मुख्य दरवाजाकडे वळला.

सत्यवीर आणि देशमुख आतमध्ये आले. देशमुखांनी हवालदार म्हस्के यांना मुख्य दारातच उभे राहायला सांगितले. जेणे करून इतर चौकशीदरम्यान इतर कोणाचा त्रास नको. सत्यवीर आणि देशमुख वाड्यात प्रविष्ट झाले. वाड्यात आल्यावर सत्यवीर चौफेर पाहू लागला. मुख्य प्रवेशद्वारातून आतमध्ये आल्यावर काही पावलांवर तुळशीवृंदावन होतं. तिथे लावलेल्या अगरबत्तीचा सुवास वातावरणात दरवळत होता. तुळशीच्या आसपास मोठी मोकळी जागा आणि आजूबाजूला काही खोल्या होत्या. वाडा दुमजली असून वरच्या मजल्यावर सुद्धा काही खोल्या होत्या. सत्यवीर शांतपणे वाड्याच्या आतला भाग निरखत होता. सत्यवीर आणि देशमुख इथे आल्याची कुणकुण बहुतेक आतल्या लोकांना लागलेली नसल्यामुळे बाहेर कोणीच आलेले नव्हते. इंस्पेक्टर देशमुखांनी पुढे जाऊन मोठ्याने हाका मारल्या.

"अविनाश.. आहेस का घरात?" देशमुख इकडे तिकडे पाहत म्हणाले.

तेवढ्यात बाजूच्या खोलीमधून अविनाश नावाचा एक इसम बाहेर आला. तो दिसायला उंचपुरा, साधारण पस्तिशीचा आणि शांत चेहऱ्याचा असा होता.

"अरे इन्स्पेक्टर साहेब तुम्ही..." काहीशा प्रश्नार्थक मुद्रेत अविनाशने देशमुखांना विचारलं.

"हो, मी टेलिफोन वरून सांगितलं होतं ना, कि गुप्तहेर सत्यवीरसुद्धा या तपासात सामील होतायत.. ते हेच." देशमुखांनी सत्यवीरकडे निर्देश करत म्हटलं.

तशी अविनाशची नजर सत्यवीरकडे गेली.

सत्यवीरने हात जोडून नमस्कार केला. अविनाशने सुद्धा हसून नमस्कार केला.

"सत्यवीर, हे अविनाश देसाई. मालती देसाई यांचे ज्येष्ठ सुपुत्र. देशमुख यांनी सत्यवीरची ओळख करून दिली आणि ते पुढे अविनाशकडे पाहत बोलू लागले.

"आमच्या खात्यातील वरिष्ठ लोकांनीच सत्यवीरला या प्रकरणात लक्ष घालायला सांगितलं आहे. म्हणूनच घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी करावी म्हणून ते आलेत. तुमची हरकत नसेल तर...." एवढ बोलून देशमुख अविनाशच्या प्रतिक्रियेची वाट पाहू लागले.

"अहो त्यात हरकत कसली. ते तुमची मदत करणार असतील तर माझी काय हरकत असणार" अविनाश हसून देशमुखांना बोलला.

"बऱ तुम्ही या बाजूच्या खोलीत बसा मी पाणी घेऊन लगेचच येतो" एवढ बोलून अविनाश स्वयंपाक घराकडे वळणार इतक्यात सत्यवीरने अविनाशला अडवले आणि म्हणाला "तुम्ही जर कुठे बाहेर जाण्याच्या तयारीत असाल तर जाऊ शकता, पण तत्पूर्वी मी तुम्हाला काही प्रश्न विचारेन नंतर तुम्ही जाऊ शकता."

सत्यवीरच्या या वाक्यावर अविनाशने देशमुखांकडे आश्चर्याने पहिले आणि म्हणाला "हो.. मी नेहमीप्रमाणे आबांना म्हणजेच माझ्या वडिलांना

बाहेरून फिरवून आणायला निघालेलो होतो. पण काही हरकत नाही मी थोडावेळ थांबेन तुमच्या प्रश्नांची उत्तरं देईन आणि मग आबांना घेऊन जाईन.''

''ठीक आहे'' एवढं बोलून सत्यवीर शांतपणे आजूबाजूला पाहू लागला. अविनाश पाणी आणायला स्वयंपाक घरात वळला

देशमुख आणि सत्यवीर अविनाशने सांगितलेल्या खोलीत बसले. ती खोली देसाई कुटुंबीय मिटिंग रूम म्हणून वापरायचे. खोलीत आजूबाजूला २-३ खुर्च्या, एक सोफा, छोटा टेबल आणि त्यामागे एक मोठी खुर्ची. कदाचित मालतीताई यांच्या ओळखीतील राजकारणी लोकं त्यांना कामानिमित्त भेटायला आल्यावर इथेच बसवत असतील.

''अविनाश बाहेर कुठेतरी निघालाय हे तू कस ओळखलंस'' देशमुखांनी सत्यवीरला विचारलं.

''तुम्ही त्याला मगाशी हाक मारली तेव्हा तो ज्या खोलीतून बाहेर आला त्याच्या दरवाजाबाहेर त्याचे स्पोर्ट्स शूज होते आणि बाजूलाच मोजे पडलेले होते जसे काही कोणीतरी ते पायात घालायला बाहेर काढतो आणि अविनाशने जो फुल शर्ट घातला होता गडबडीत त्याच्या शर्टच्या बाहीची बटने लावलेली नव्हती. त्यावरून एक तर्क काढला बस'' सत्यवीरने सांगितलं.

देशमुख पुढे काही बोलणार इतक्यात अविनाश पाणी घेऊन आत आला. सत्यवीर आणि देशमुखांनी पाणी घेतल. अविनाश बाजूच्याच खुर्चीत बसला.

''मिस्टर अविनाश, मला खरतर खूप खेद आहे. तुमच्या आईंच्या बाबतीत जे घडलं दुर्दैवी होतं. पण घडलेल्या गोष्टींची उकल व्हावी एवढाच हेतू आहे

आणि त्यासंदर्भातच मी तुम्हाला आणि घरातील इतर सदस्यांना काही प्रश्न विचारू इच्छितो अर्थात तुमच्या परवानगीने'' सत्यवीर पाणी पिऊन झाल्यावर पाण्याचा ग्लास बाजूला ठेवत म्हणाला.

"माझी काहीही हरकत नाहीये सत्यवीर. तुम्ही फक्त तुमचं काम करताय याची कल्पना आहे मला. आमच्या बाजूने आम्ही तुम्हाला पूर्णपणे सहकार्य करू. अविनाशने अगदी शांतपणे सत्यवीरकडे पाहत त्याला सांगितल. सत्यवीरला त्याच्या नजरेत एकप्रकारचा ठामपणा दिसला. आईच्या निधनानंतर सुद्धा तो खचून न जाता घरचा भार खंबीरपणे सांभाळत असल्याचे पाहून सत्यवीरला त्याचे कौतुक वाटले.

"अविनाश तुम्ही काय काम करता" सत्यवीरने अविनाशला विचारलं.

"माझी शहराबाहेर बागायती रोपे विकायची नर्सरी आहे" अविनाश म्हणाला

"अच्छा..अविनाश खरतर तुमच्या आईंच्या बाबतीत जी दुर्दैवी घटना झाली त्यानंतर चौकशीत तुम्ही पोलिसांना अगोदरच तुमचा कौटुंबिक तपशील आणि घटनेसंदर्भात सांगितल असेल. पण मला तो तपशील तुमच्याकडून ऐकायचा आहे तेव्हा मला सांगा कि तुमच्या घरात वा वाड्यात कोण कोण राहत? एवढ बोलून हाताची बोट एकमेकांमध्ये गुंतवून सत्यवीर अविनाशच्या उत्तराची वाट पाहू लागला.

सत्यवीरच्या प्रश्नानंतर अविनाश खुर्चीत सरळ बसला. "या वाड्यात मी, माझे बाबा, माझी बायको नंदिनी आणि माझा धाकटा भाऊ आशुतोष राहतो.

“घटना झाली तेव्हा तुम्ही कुठे होता” सत्यवीरने पुढचा प्रश्न केला.

“घटना घडली तेव्हा मी डॉक्टर पटवर्धन यांच्या हॉस्पिटलमध्ये होतो. माझ्या वडिलांचे उपचार तिथे चालू आहेत त्यासंदर्भातच त्यांना भेटायला गेलो होतो” अविनाश उत्तरला.

अविनाश बोलत असताना सत्यवीरने आपल्या जॅकेटच्या आतल्या कप्प्यातून एक छोटी डायरी आणि पेन बाहेर काढले. अविनाशशी बोलतच तो त्या डायरीमधे काहीतरी लिहू लागला.

“काय झालंय तुमच्या वडिलांना” सत्यवीरने डोळे बारीक करत डायरीमधून नजर न काढताच विचारले.

“त्यांना स्मृतीभ्रन्शाचा आजार आहे. मागच्या वर्षी ते एके ठिकाणी त्यांच्या मित्रासमवेत फिरायला गेले असताना तिथे त्यांचा एक छोटासा अपघात झाला त्या अपघातात डोक्याला मार लागला. तिथून आल्यावर त्यांना जास्त काहीच आठवेना आणि ते जास्त बोलत देखील नव्हते. नंतर तर आम्हा घरातल्या लोकांना सुद्धा ओळखेनासे झाले. म्हणूनच मग मागच्या काही महिन्यांपासून शहरातील डॉक्टर पटवर्धन यांच्याकडे त्यांचे उपचार चालू आहेत.”

अविनाश हे सांगत असताना सत्यवीर आपल्या डायरीमध्ये पटापट काही नोंदी घेत होता.

“बर मग घटना घडली तेव्हा तुमचे वडील कुठे होते आणि घरात कोण कोण होते “सत्यवीरने विचारलं.

"घरात आबा हे त्यांच्या खोलीत आराम करत होते. माझी बायको आणि आमची कामवाली बाई कमला वाड्याच्या मागच्या बाजूला विहिरीतून पाणी काढत होत्या. आमची कामवाली बाई कमला काही तरी आणायला म्हणून मागच्या बाजूने आत वाड्यात आली तेव्हा आईच्या खोलीसमोरून जाताना तिला दिसलं कि आई जमिनीवर पडली होती. कमलाला वाटलं कि आई बेशुद्ध वगैरे पडली कि काय म्हणून तिने आईला हाका मारल्या. पण तरीही ती काही हालचाल करेना. मग तिनेच आरडाओरड करून सगळ्यांना गोळा केलं." अविनाश म्हणाला.

"ओह्ह.. म्हणजे मालतीताई यांना जमिनीवर पडलेलं तुमची कामवाली बाई कमला हिने आधी पाहिलं तर.. बर तुमचे वडील म्हणजेच आबा कुठे होते तेव्हा.." सत्यवीरने ओठ मुडपत विचारलं. बाजूलाच बसलेले देशमुख लक्षपूर्वक दोघांची प्रश्नोत्तरे ऐकत होते.

"आबा त्यांच्या खोलीतच होते. त्यांना काही ऐकू आलं असेलं असं वाटत नाही. तसंही ते बाहेर आलेच नाही कारण त्यांना चटकन हलता येत नाही आणि त्यांच्या खोलीला आम्ही बाहेरून कडी लावत असतो. कारण आमच्या अपरोक्ष ते चुकून वाड्याबाहेर जाऊ नये म्हणून." अविनाशने माहिती दिली.

"ह्म्म्म.. तर एकंदरीत अशी घटना घडली. मग त्यानंतर तुम्ही हॉस्पिटलमधून माघारी आलात. वाड्याजवळ राहणाऱ्या पाटील डॉक्टरांना कोणी बोलावलं?" सत्यवीरने हातातील छोटं पेन हनुवटीला टेकवत विचारलं.

"कमलाचा आरडाओरडा ऐकून शेजारचे काही लोक बाहेर जमा झाले होते. त्या गर्दीमधीलच कोणीतरी डॉक्टरांना झालेल्या घटनेची खबर दिली

आणि ती मिळताच ते तडक आले होते. ते आमचे फॅमिली डॉक्टर पण आहेत आणि आमचे त्यांच्याशी घरगुती संबंध पण आहेत. त्यांनीच आमच्या आईला तपासलं. आईची नाडी लागत नव्हती म्हणून त्यांनी हॉस्पिटलमध्ये हलवायला सांगितलं. पोलिसांना पण फोन करून सांगितलं. त्यानंतर मी घरी आल्यावर डॉक्टर पाटलांनी मला हि माहिती दिली" अविनाशने सांगितलं.

"मालतीताईंचा कोणी घातपात केलाय असा संशय कोणाला आला होता का? म्हणजे त्या अचानक अशा त्यांच्या खोलीत कशा काय पडल्या. कोणती शारीरिक व्याधि होती का मालतीताईना?" सत्यवीरने प्रश्न केला.

"नाही.. कोणती व्याधि अशी नव्हती. तिची प्रकृती अगदी ठणठणीत होती. म्हणूनच तर आम्हाला कळेना कि ती अचानक अशी कशी काय जमिनीवर पडली. घातपात झाल्यासारखं काही वाटत नव्हतं. प्रथम आम्हाला संशय आला कि हदयविकाराचा झटका वगैरे आला कि काय. पण हॉस्पिटलमध्ये आईला नेल्यानंतर त्यांनी आईचा मृत्यू झाल्याचं सांगितल आणि असं पण सांगितलं कि मृत्यूचं कारण स्पष्ट होत नाहीये तर पोस्टमार्टेम करावं लागेल." अविनाशला हे सगळं सांगताना खरंतर भरून आलं होतं.

सत्यवीरने त्याचे प्रश्न थोडेसे थांबवले आणि देशमुखांकडे सूचक नजरेने पहिले तसं देशमुखांनी अविनाशच्या खांद्याला स्पर्श करत बाजूचा पाण्याचा भरलेला ग्लास अविनाशला देऊ केला. अविनाशने देशमुखांच्या हातातून पाण्याचा ग्लास घेतला आणि तो पाणी पिऊ लागला. तोपर्यंत सत्यवीरने आपल्या छोट्या डायरीमध्ये लिहिलेल्या नोंदी परत न्याहाळल्या. अविनाश पाणी पिऊन जरासा स्थिर झाल्यावर सत्यवीरने विचारलं "अविनाश तुम्हाला

शेवटचा एकंच प्रश्न विचारतो. मालतीताई यांचा कोणी शत्रू होता काय? ज्याने त्यांचा असा घातपात घडवून आणला. कोणाला मागमूस न लागता तो वाड्यात शिरला आणि आपलं काम उरकून निघून गेला असेल?

सत्यवीरच्या या प्रश्नाने अविनाश विचारात पडला. त्याच्या कपाळावर किंचित आठ्यांच जाळ आलं आणि त्याची नजर जमिनीकडे वळली. सत्यवीर अविनाश कडेच निरखून पाहत होता. त्याच्या नजरेतून अविनाशचे हे बदल सुटले नाहीत.

"नाही.. तसं शत्रू वगैरे कोणी असेल असं मला वाटत नाही. राजकारणातील काही व्यक्तींशी तिचे राजकीय मतभेद जरूर होते. पण तेव्हाच ज्यावेळी ती राजकारणात सक्रीय होती. सध्या आई राजकारणात तितकी सक्रीय नसायची तेव्हा मला काही निश्चित सांगता येणार नाही. अविनाशजे जरा अवघडूनच उत्तर दिल. मुळात त्याला सत्यवीरचा प्रश्न तितकासा रुचला नव्हता. सत्यवीरने देखील हे ओळखून त्यावर जास्त काही विचारलं नाही.

"ठीक आहे अविनाश, आम्हाला तुमच्या आईची खोली दाखवा जिथे हा सगळा प्रकार घडला आणि त्यानंतर मी तुमच्या कुटुंबातील इतर सदस्यांची ओळख करून घेतो" आपल्या जागेवरून उठत सत्यवीर म्हणाला.

"हो चला" असं म्हणून अविनाश उठून खोलीच्या बाहेर पडला. मागोमाग सत्यवीर आणि देशमुख चालू लागले.

खोलीबाहेर पडताच त्या वाड्याच्या दुसऱ्या टोकाला एक खोली होती अविनाश तिकडे जाऊ लागला.

वाडा आतून दिसायला "C" या इंग्रजी अक्षराप्रमाणे होता. वाड्याच्या मुख्य दरवाजाच्या उजव्या बाजूला पहिली खोली जिथून आत्ताच सत्यवीर आणि देशमुख निघाले होते. तिथून पुढच्या दोन खोल्या या घरगुती सामानानी भरलेल्या होत्या. पुढे वर जाण्यासाठी जिना आणि त्याच्याच बाजूला थोडा व्हरांडा जेथून वाड्याच्या मागच्या बाजूला सुद्धा जाता येत होतं. मुख्य दरवाजापासून डाव्या बाजूला प्रथम स्वयंपाकघर, पुढची खोली अविनाशचे वडील आबा यांची आणि त्यानंतरची तिसरी खोली मालतीताईंची. त्याच्या बाजूलाच जरा आतमध्ये न्हाणीघर होतं. अविनाशने सत्यवीर आणि देशमुखांना मालतीताईंच्या खोलीबाहेर आणले. खोलीचं दार उघडून सत्यवीर आणि देशमुखांनी आतमध्ये प्रवेश केला.

मालतीताईंची खोली जरा मोठी होती. साधारण दोन माणसांना पुरेल एवढी. खोलीत प्रवेश केल्याकेल्या डाव्या एका बाजूला बेड, मोठं कपाट, पुढच्या भिंतीवर एक मोठा आरसा आणि त्याच्या बाजूला बंद खिडकी. तिच्या अगदी बाजूला एक टेबल ज्यावर रात्री काम करताना लागेल तसा दिवा आणि काही लिखापडीच्या वह्या पडलेल्या होत्या. जमिनीवर जिथे मालतीताई गतप्राण झालेल्या होत्या त्या जागी पोलिसांनी पांढऱ्या रंगाने रेखांकन केलं होतं जेणे करून बॉडी जमिनीवर कशी पडलेली होती हे समजायला मदत होत होती. सत्यवीरने आतमध्ये सगळ्या गोष्टी बारकाईने पाहायला सुरुवात केली. भिंतींना रंग नवीन पद्धतीने दिलेला असला तरी खिडकी आणि दरवाजाची लाडकी कलाकुसरीची कामे जुन्या पद्धतीची होती. सत्यवीरने खिडकी जी बंद होती तिची खुंटी काढली आणि उघडली. खिडकीला गज नव्हते ती पूर्ण उघडी झाली.

सत्यवीरने बाहेर पाहिलं तर बाहेर ऊन उतरून बऱ्यापैकी संध्याकाळ झालेली होती. मालतीताईंच्या खोलीबाहेरून वाड्याचा बाहेरचा डावीकडील भाग दिसत होता. थोडीशी जागा सोडली कि पुढे पुरुषभर उंचीचं वाड्याच दगडी कंपाउंड होतं. शेजारी कोणी राहत नव्हतं पण थोडी जागा सोडून पलीकडे जरा लांब देसाई वाड्यासारखाच एक वाडा होता. जिथे एक वृद्ध दाम्पत्य राहायचे अशी माहिती देशमुखांनी मगाशी दिलेली होती. सत्यवीरने बाहेरच सगळं निरीक्षण करून खिडकी परत लावली. खिडकीच्या शेजारच्या भिंतीवरील लावलेल्या आरशाकडे तो पाहू लागला. आरसा चांगलाच मोठा होता. तिथून त्याने खिडकीकडे कटाक्ष टाकला तर ते अंतर जास्त नव्हतं. काहीसा विचार करत त्याने खाली वाकून इकडे तिकडे पाहिलं. परत उठला आणि दरवाजाकडे पाहिलं. देशमुख आणि अविनाश फक्त त्याच्या हालचाली पाहत उभे होते. सत्यवीरने खिशातून परत आपली डायरी काढून त्यात काही नोंदी केल्या आणि डायरी परत ठेऊन दिली. थोडा वेळ सगळ्या खोलीचं निरीक्षण करून सत्यवीर म्हणाला "चला आता तुमच्या वडिलांच्या खोलीमध्ये जाऊन पाहूयात"

अविनाश शांतपणे मालतीताईंच्या खोलीतून बाहेर पडला आणि बाजूच्या असणाऱ्या त्याच्या वडिलांच्या खोलीकडे निघाला मागोमाग सत्यवीर आणि देशमुख होतेच. खोलीला बाहेरून कडी होती. अविनाशनी कडी उघडली आणि सगळे आतमध्ये गेले.

आबांची हि खोली मालतीताईंच्या खोलीपेक्षा लहान होती. आतमध्ये एका कोपऱ्यात एक बेड होता आणि त्यावर चादर पांघरून आबा पाठमोरे झोपलेले दिसत होते. अविनाश आबांच्या बेडजवळ जाऊन त्यांना उठवणार

पण सत्यवीरने अविनाशला हातानेच खुण करून त्यांना न उठवण्याविषयी खुणावलं. तसं अविनाश जागीच थांबला. बाजूला कपाट आणि टेबल होतं. टेबलवर बरीचशी पुस्तकं होती. बेडच्या विरुद्ध बाजूला एक खिडकी उघडी होती. सत्यवीर खिडकीपाशी आला आणि बाहेर पाहू लागला खिडकीला गज न्ह्व्तेच त्यामुळे बाहेर डोकावून पाहता आलं. बाहेर फक्त वाड्याच कंपाउंड दिसतं होतं. दिवसाउजेडी वाड्याच्या बाहेरचा भाग परत एकदा पाहावा असं सत्यवीरला वाटलं आणि त्याने खिडकी लाऊन टाकली. खिडकीतून सत्यवीर बाजूच्या टेबलाकडे वळला. टेबलावर वेगवेगळ्या प्रकारची पुस्तकं होती. त्यातली काही पुस्तकं घेऊन सत्यवीर चाळू लागला. विविध प्रकारची प्रवासवर्णन असलेली ती पुस्तके होती. पुस्तकं आलटून पालटून पाहत सत्यवीरने परत ती टेबलावर खाली ठेवली पण ती खाली ठेवत असताना पुस्तकांचा आवाज झाला आणि त्या आवाजासरशी बेडवर झोपलेल्या आबांनी चळवळ केली. त्यांची कदाचित झोपमोड झाली असावी. सत्यवीर जागीच थांबला आणि त्यांच्या बेडकडे पाहू लागला. अंगावरची चादर दूर करून आबा पुढच्या कुशीवर वळले आणि डोळे उघडून किलकिल्या नजरेने पाहू लागले. आपल्या खोली एवढी माणसं पाहताच ते तसेच किलकिले डोळे करत बेडवर उठून बसले.

तसा अविनाश त्यांच्या जवळ गेला. आबा उठून एकदा सत्यवीरकडे आणि एकदा देशमुखांकडे पाहू लागले. अविनाशने बाजूच्या टेबलावरील पाण्याचा तांब्या घेऊन त्यातून पाणी काढून आबांना दिले. पण आबांचं लक्षच नव्हतं. ते आपले एकसारखे सत्यवीर आणि देशमुखांकडे पाहत होते.

"आबा, अहो पोलीस आहेत. तपास करायला आलेत" अविनाश आबांना म्हणाला

"त्यांना चटकन गोष्टी लक्षात येत नाहीत" असं अविनाश सत्यवीरकडे वळून पाहत म्हणाला.

आबा आता अविनाशने पुढे केलेल्या फुलपात्राकडे पाहू लागले आणि नंतर अविनाशकडे. पण बोलले काहीच नाहीत. सत्यवीरने सगळी खोली व्यवस्थित न्याहाळली. खोलीत सामान असे काहीच नव्हते. आबांची तब्येत ठीक नसते म्हणून त्यांना हि स्वतंत्र खोली राहायला केली होती. त्यामुळे जास्त समान असे काहीच नव्हते.

"आबांना कधी बऱ वाटेल असं त्यांचे डॉक्टर म्हणाले. म्हणजे त्यांची स्मृती कधी परत येईल?" सत्यवीर भिंतीला टेकून उभं राहत आबा आणि अविनाशकडे पाहत म्हणाला.

अविनाशने दिलेलं पाणी आबांनी संपवलं आणि ते सत्यवीरकडे एकटक पण निर्विकार चेहऱ्याने पाहू लागले. अविनाशने आबांच्या हातातून फुलपात्र घेऊन ते टेबलावर ठेवलं आणि म्हणाला "डॉक्टरांचे औषधउपचार चालू आहेत. त्याचं म्हणण आहे कि काही वेळ लागेल पण लवकरच त्यांना सगळं आठवू लागेल आणि गोष्टींच आकलन सुद्धा होऊ लागेल. तोपर्यंत त्यांना विश्रांती घेत राहू देत आणि रोज बाहेर फिरवून आणत जावा"

"अच्छा... अविनाश आता तुम्ही घरातल्या इतर सदस्यांना बोलावून घ्या त्यांची पण ओळख करून घेतो आणि तुम्हाला जास्त तसदी देत नाही. तुम्ही

असंही आबांना बाहेर घेऊन जाणार होतात त्यात व्यत्यय नको" असं बोलून सत्यवीर आबांच्या खोलीबाहेर आला.

आबांना काही विचारण्यात अर्थच नव्हता. एकतर त्यांची स्मृती गेलेली होती आणि त्यांना काही नीट बोलता येईल असं वाटत पण नव्हते. देशमुखसुद्धा सत्यवीरच्या शेजारी उभे राहिले. अविनाश थोड्या वेळाने बाहेर आला आणि व्हरंड्यातून सरळ गेला. मधला भाग ओलांडून तो आता विरुद्ध बाजूला असलेल्या जिन्याकडे गेला. अविनाश वरच्या खोल्यांकडे इतर लोकांना बोलायला गेला हे पाहून देशमुख सत्यवीरच्या कानाजवळ येऊन म्हणाले "सत्यवीर काही सुगावा मिळाला का तुला?

"अं..सध्या तरी नाही, उलटपक्षी बरेच नवीन प्रश्न मला पडलेत" सत्यवीर हात मागे बांधून दरवाज्याबाहेर समोर दिसणाऱ्या तुळशी वृन्दावनाकडे पाहत म्हणाला.

"म्हणजे नक्की म्हणायचं काय तुला?" देशमुखांनी न समजून विचारलं.

"म्हणजे वाड्याच्या आसपास जास्त कोणाचीच घर नाहीयेत. मुख्य रस्त्यापासून वाडा जरा आतमध्ये आहे. ज्या कोणी व्यक्तीने मालतीताईंचा खून केला असेल. त्या व्यक्तीला कोणी पाहिलं असेल याची शक्यता खूप कमी वाटतेय आणि दुसरं असं कि..." सत्यवीर पुढे काही बोलणारच त्याआधीच जीन्याकडून पावलांचा आवाज आला. सत्यवीर आणि देशमुखांची मान तिकडे वळली.

अविनाश, त्याची बायको नंदिनी, एक चष्मा घातलेला मुलगा आणि मागे एक काष्टा घातलेली बाई येत होती. सत्यवीर आणि इंस्पेक्टर देशमुखांचा संवाद तिथेच थांबला. अविनाश त्यांना घेऊन सत्यवीर जवळ आला.

"हि माझी बायको नंदिनी ती घरीच असते. माझा भाऊ आशुतोष पदवीच शिक्षण घेतोय आणि ह्या आमच्या कामवाल्या काकू कमलाबाई" अविनाशने सगळ्यांची ओळख करून दिली. तसे सत्यवीरने हात जोडून सगळ्यांना नमस्कार केला.

अविनाशच्या शेजारी त्याचा भाऊ उभा होता. वयाने तसा तरुण दिसत होता त्याच्या चेहऱ्यावर चष्मा होता. अविनाश आणि त्याच्या भावाच्या वयात बरेच अंतर असल्याची जाणीव सत्यवीरला झाली. अविनाशची बायको नंदिनी अविनाशच्या मागे उभी होती. ती दिसायला विलक्षण सुंदर होती. क्षणभर सत्यवीरची नजर अनावधानाने तीच्यावरच खिळली. सत्यवीरशी तिची नजरानजर होताच तिने पटकन जमिनीकडे पहिले. नंदिनी मध्यम बांध्याची असून तिने एक साधी साडी घातलेली होती. कपाळावर बारीक टिकली आणि गळ्यात मंगळसूत्र. स्वभावाने शांत असावी अशी दिसत होती. नंदिनी जवळच एक खेडूत दिसणारी एक बाई जिने पदर डोक्यावरून घेतला होता. ती देसाई यांची घरची कामवाली कमला होती आणि जवळपास नजर रोखूनच सत्यवीरकडे पाहत उभी होती.

"मी या वाड्याच्या मालकीण मालतीताई यांच्या खुनाच्या संदर्भात तपास करणार आहे आणि पोलिसांची मदत करणार आहे. तर तुम्हा सगळ्यांची ओळख करून घ्यायला आज आलो आहे. तपासकार्यात तुमचं सहकार्य

मिळाव अशी अपेक्षा आहे जेणेकरून लवकरच खुन्यापर्यंत आम्हाला पोहोचता येईल.'' सत्यवीरने असं बोलल्यावर कोणीच काही बोललं नाही.

''तुम्हाला आमचे पूर्ण सहकार्य राहिलं आणि चौकशीसाठी तुम्ही कधीही वाड्यात येऊ शकता'' अविनाश सगळ्यांच्या वतीने बोलला.

तेवढ्यात दारावर उभा असलेला हवालदार म्हस्के आत आला आणि देशमुखांकडे पाहत म्हणाला ''साहेब, बाहेर पाटील डॉक्टर आले आहेत. आत यायचं म्हणत आहेत. आबांची तब्बेत बघायला आलोय असं म्हणतायत.''

''ठीक आहे, सोड त्यांना आत आणि तुम्ही बाहेरच थांबा'' देशमुखांनी म्हस्के हवालदाराला सांगितलं.

पाटील डॉक्टर यावेळी वाड्यावर येण्यामागे काहीतरी कारण नक्कीच असणार असं सत्यवीर वाटलं. सत्यवीरने अविनाशला सगळ्यांना घेऊन परत वर जायला सांगितलं कारण सगळ्यांची ओळख झालेली होती आणि तो अविनाश सोबत वरील मजल्यावर खोल्या पाहायला त्याच्या मागे जाऊ लागला. सगळ्यात पुढे आशुतोष घाईघाईत गेला.

अविनाशने कमलाला घरी जायला सांगितलं कारण सत्यवीर आल्यामुळे त्याने तिला चौकशीसाठी थांबवलं होतं. अविनाशच ऐकून कमला लगबगीने वाड्याच्या बाहेर गेली. सत्यवीरने देशमुखांना खालीच उभं राहून डॉक्टर पाटील यांच्यासोबत बोलायला सांगितल. जेणेकरून ते नक्की कशासाठी आले आहेत हे समजेल. बाकीचे सगळे म्हणजे सत्यवीर, अविनाश आणि इतर जिन्याने वर जाऊ लागले. जिन्याने वर गेल्यावर समोर एक व्हरंडा होता. डावीकडेच

अविनाश आणि नंदिनी यांची झोपण्याची खोली होती. त्याच्या पुढे एक बंद खोली होती आणि त्यानंतर पुढे आशुतोषची खोली जी खालच्या गेस्ट रूमच्या बरोबर वर होती. सगळ्यात आधी वर जाऊन आशुतोष लगबगीने खोलीत गेला आणि आतून दाराची कडी लावली. नंदिनी तिच्या खोलीत जाऊ लागली.

सत्यवीर अविनाशला वर खोल्या किती आहेत असं विचारत होता आणि अविनाश त्याला ते सांगत असतानाच सत्यवीरची नजर खोलीमध्ये जाणाऱ्या पाठमोऱ्या नंदिनीवर गेली. नंदिनी हि खरोखरच एक सुंदर स्त्री असल्याच त्याच्या लक्षात आलं. तिचा बांधा कमनीय असून तिची चाल सुद्धा मोहक होती. त्यामुळेच ती खोलीत जाऊन दार लावत असताना तिच्याकडे ओझरती नजर टाकायचा क्षणभर मोह सत्यवीरला आवरला नाही. सत्यवीरने सुंदर स्त्रिया कधी पहिल्या नाही अशातला भाग नव्हता पण नंदिनीचं सौंदर्य काही वेगळंच होते. साधी राहणी असून पण दिसायला मोहक अशी ती भासत होती. अविनाश पुढे चालत होता. चालता चालता तो एका खोलिपाशी येऊन थबकला.

"इथे आम्ही अडगळीच सामान ठेवतो" असं म्हणून सत्यवीरकडे पाहू लागला. त्याच्या आवाजासरशी सत्यवीरची तंद्री भंग पावली आणि ओशाळत तो म्हणाला "अं..काय.. सॉरी, मी जरा विचारांमध्ये होतो. काय म्हणत होतात तुम्ही".

"मी सांगत होतो कि हि अडगळीच सामान ठेवायची खोली." हाताने निर्देश करत अविनाश म्हणाला.

"अच्छा... तिकडे विरुद्ध बाजूला ज्या खोल्या आहेत तिथे काय आहे" सत्यवीरने विचारलं.

“चला तिकडे” असं म्हणून अविनाश पुढे होऊन आता विरुद्ध बाजूच्या खोल्यांकडे जाऊ लागला आणि सत्यवीर त्याच्या मागोमागे चालू लागला. काही वेळातच ते दुसऱ्या बाजूला जाऊन पोहोचले.

“हि खोली माझ्या कामाची आहे. म्हणजेच विविध प्रकारची माती आणि नर्सरीच काही किरकोळ सामान या खोलीत ठेवत असतो” अविनाशने असं सांगितलं आणि खोलीचं दार उघडल. सत्यवीरने आतमध्ये बाहेरूनच डोकावून पाहिलं तर आतमध्ये मातीची बरीच पोती एकमेकांवर ठेवलेली दिसत होती. बाजूला काठ्यांचे जुडगे जे कुंपण करायला लागतात ते ठेवलेले होते. त्याला बांधायची रस्सी बाजूला पडलेली होती आणि इतर काही बांधकामाचे किरकोळ साहित्य. सत्यवीरने आत न जाताच बाहेरूनच निरीक्षण केलं.

“हि बाजूची खोली” समोर निर्देश करत सत्यवीर बोलला आणि त्या खोलीच्या पुढे जाऊन उभा राहिला.

“ती माझी अभ्यासाची खोली आहे असं म्हणू शकता कामाच्या सामानाची यादी वगैरे करण्यासाठी किंवा नंदिनी सोबत जरा निवांत गप्पा मारत बसण्यासाठी मी ती वापरत असतो.” अविनाश सत्यवीरच्या जवळ येत म्हणाला.

नंदिनीच नाव ऐकताच सत्यवीरच्या नजरेपुढे नंदिनीचा चेहरा आला आणि नंतर तिचा कमनीय बांधा. पण डोक्यातले ते विचार झटकून सत्यवीर म्हणाला “हि तुमची अभ्यासाची खोली बरोबर आबांच्या खोलीच्या वर आहे नाही का आणि ती पलीकडली मातीची पोती आणि इतर समान ठेवलेली खोली हि मालतीताईच्या खोलीच्या वर आहे. “

"हो.. अगदी बरोबर" अविनाश असं म्हणून शांत बसला.

सत्यवीरने तो व्हरंडा पूर्ण इकडून तिकडे न्याहाळला. व्हरंड्याच्या कठड्यावरून वरून त्याने खाली डोकावून पाहिलं. त्याला खालच तुळशी वृंदावन दिसत होतं. खालचा भाग पूर्णपणे दिसत नव्हता कारण या वरच्या व्हरंड्याच्या पुढे मधल्या भागामध्ये छत थोडे पुढे काढलेले होते त्यामुळे खालचा जास्त भाग दिसत नव्हता. त्यातल्या त्यात तुळशी वृंदावन दिसत होते. खाली देशमुख आणि पाटील डॉक्टर बोलत असल्याचा आवाज देखील त्याला ऐकू आला.

"ठीक आहे. आता आणखी काही बघायची गरज आहे, असं मला वाटत नाही. आपण आता खाली जाऊयात. वाड्यामधील ज्या गोष्टी पाहण्याची आवश्यकता मला वाटत होती तेवढ पाहून झालंय. नंतर गरज पडलीच तर इतर गोष्टींची छाननी करेनच. पण सध्या तरी मला वाटत मी खूपच जास्त वेळ घेतला तुमचा. माझ्यामुळे तुम्हाला आबांना आज फिरायला सुद्धा घेऊन जाता आलं नाही" सत्यवीर हलकेच स्मित करत बाजूच्या भिंतींकडे पाहत म्हणाला.

"ठीक आहे. मी त्यांना उद्या फिरायला घेऊन जाईन" अविनाशसुद्धा स्मितहास्य करत म्हणाला.

"ओके, चला आता खाली जाऊयात. आम्ही पण निघतो आता बराच उशीर झालाय" असं म्हणून सत्यवीर खाली जाण्यासाठी वळला. काही वेळात जिना उतरून सत्यवीर आणि अविनाश खाली आले. खाली येताच व्हरंड्यात आबांच्या खोलीपुढे त्यांना देशमुख आणि डॉक्टर पाटील बोलत उभे असलेले

दिसले. सत्यवीर आणि अविनाश त्यांच्याजवळ येताच आपलं बोलणं थांबवून त्यांनी त्यांच्या माना सत्यवीरकडे वळवल्या.

"काय देशमुख साहेब काय गप्पा मारत आहात" सत्यवीर देशमुखांच्या जवळ जात पाटील डॉक्टरांकडे पाहत म्हणाला.

"हे डॉक्टर पाटील आहेत. तपास कसा चालू आहे विचारत होते" डॉक्टर पाटलांकडे इशारा करत हलकेच गालात हसत देशमुख म्हणाले. कारण सकाळीच वेषांतर करून सत्यवीरने डॉक्टर पाटलांची भेट घेतल्याचं त्यांना आठवलं.

"मी डॉक्टर पाटील, आत्ताच तुमच्याबद्दल देशमुखांकडून कळल कि गुप्तहेर साहेबपण आले आहेत चौकशीसाठी" अगदीच फॉर्मल पद्धतीने पाटलांनी आपली ओळख सांगत हस्तांदोलन करण्यासाठी सत्यवीरपुढे हात केला" त्यासरशी सत्यवीरने हसून त्यांचा हात हातात घेऊन हस्तांदोलन केलं.

त्यामुळे एक गोष्ट तरी स्पष्ट झाली कि डॉक्टर पाटलांना आज सकाळी भेटलेला अतरंगी म्हातारा हा वेषांतर केलेला सत्यवीरच होता हे कळालेल नव्हतं आणि तसंही सत्यवीरने वेषांतर सुद्धा अगदी चोख केलं असल्याने पाटलांना सत्यवीर हाच सकाळचा म्हातारा होता हे ओळखणे अशक्य होतं.

"काय मग डॉक्टर, भेटलात का आबांना. कशी आहे त्यांची तब्बेत आता?" सत्यवीरने स्पष्टच विचारलं.

“आतमध्ये गेलो होतो पण ते झोपी गेलेत बहुधा. मग त्यांना त्रास न देता तसाच बाहेर येऊन देशमुखांशी बोलत उभा राहिलो.” शाळकरी मुलासारखं पाटील पटापट बोलून गेले.

“ओह्ह अस्स...” एवढचं सत्यवीर बोलला

“चला मिस्टर अविनाश, आता आम्ही तुमची रजा घेतो. तसदी दिल्याबद्दल क्षमस्व” सत्यवीर हात जोडून अविनाशला म्हणाला तसं अविनाशने देखील हात जोडले. सत्यवीर मग डॉक्टर पाटलांकडे वळून “चला डॉक्टरसाहेब आपण बाहेर बोलूयात” असं म्हणून वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे चालायला सुरुवात केली.

वाड्याच्या बाहेर सगळेजण पोलिसांच्या गाडीपाशी उभे होते.

“डॉक्टर पाटील तुम्ही इथे जवळच राहत असाल ना?” सत्यवीरने समोरच्या रस्त्याकडे नजर टाकत विचारल.

“हो.. ते काय ते समोरचे १-२ बंगले दिसतायत ना ते सोडले कि पुढे थोड्या अंतरावर माझं घर आहे” पाटलांनी हात करत सांगितलं.

“चला मग तुम्हाला घरापाशी सोडतो आणि तुम्हाला काही प्रश्न पण विचारायचे आहेत?” सत्यवीर असं म्हणत पाटलांच्या उत्तराची वाटही न पाहता गाडीत बसला. सत्यवीरने असं केल्याने पाटलांना गाडीत बसण्यावाचून दुसरं गत्यंतरच उरलं नाही. सत्यवीर बसल्यानंतर बाकीचे सगळे गाडीत बसले आणि हवालदारांनी गाडी चालू केली.

बाहेर चांगलाच अंधार पडलेला होता. थंड वाऱ्याची झुळुक सुद्धा वाहत होती. गाडीमधे देशमुख पुढच्या बाजूला हवालदाराच्या सोबत बसले होते तर सत्यवीर आणि डॉक्टर पाटील मागच्या बाजूला. रस्ता जास्त पक्का नव्हता त्यामुळे हवालदार म्हस्के गाडी सावकाश पुढे नेत होते.

"वाड्यावर चौकशी केल्यावर असं समजलं कि मालतीताई जेव्हा जमिनीवर कोसळल्या तेव्हा तुम्हाला वाड्यावर बोलावलं होतं" सत्यवीरने समोर रस्त्याकडे पाहतच पाटलांना प्रश्न विचारायला सुरुवात केली.

"अं.. हो..." सत्यवीरकडे हलकेच पाहत पाटलांनी उत्तरं दिलं. पोलिसांच्या गाडीत बसायची पाटलांची कदाचित पहिलीच वेळ असावी. सत्यवीर असा प्रश्नोत्तरांचा तास घेतोय म्हणून त्यांना थोडस दडपण आलेलं होतं. त्यामुळे आपला चष्मा सावरत अंग चोरून पाटील बसले होते.

"डॉक्टर साहेब, जेव्हा तुम्ही मालतीताईंच्या वाड्यावर त्या कोसळल्या म्हणून तपासायला गेला तेव्हा काय घडलं. हे सविस्तर सांगू शकाल का? सत्यवीरने मागे टेकत आणि नजर समोर रस्त्यावर ठेवूनच पाटलांना विचारलं.

सत्यवीरच्या या प्रश्नानंतर पुढे बसलेले देशमुख थोडेसे सरकून गाडी चालवणाऱ्या हवालदाराकडे तोंड करून कान मागच्या सीटकडे लावून बसले जेणेकरून पाटील काय म्हणतायत हे स्पष्टपणे ऐकू यावं. थोडं थांबून पाटलांनी सांगायला सुरुवात केली.

"त्या दिवशी जवळपास संध्याकाळच्या सुमारास एक जवळपासचा स्थानिक माणूस माझ्या क्लिनिकमध्ये जे कि घराला लागुनच आहे तिथे धावत

पळत आला आणि देसाई वाड्यावर मालतीताई जमिनीवर पडल्यात असं सांगितलं. मी तत्क्षणी माझ्या क्लिनिक मधून पळत वाड्याकडे निघालो. तिथे पोचतो तर मुख्य दरवाजाजवळ काही लोकं थांबलेली पहिली. त्यांना बाजूला करून आतमध्ये गेलो. मालतीताईंच्या खोलीबाहेर कमला आणि त्यांची सून नंदिनी घाबरून उभ्या होत्या. मला कमलाने सांगितलं कि मालतीताई येथे पडलेल्या तिने पहिल्या आणि हाक मारली तरी उठेनात. मी पुढे जाऊन त्यांच्या खोलीत डोकावुन पाहिलं तर मालतीताई जमिनीवर काहीशा उताण्या अवस्थेत पडल्या होत्या. मी त्यांना जोरजोराने हाका मारल्या तरी मला त्यांच्याकडून काही प्रतिसाद येईना. मग मी त्यांच्या जवळ जाऊन त्यांना खांद्याला स्पर्श करून हलवलं. तरीही त्या उठेनात. मग मी त्यांचा हात पकडून नाडी पहिली तर मला ती जाणवलीच नाही तसा मी घाबरलो.'' एवढं बोलून डॉक्टर पाटील थांबले.

''अच्छा म्हणजे मालतीताई मेल्या आहेत असं तुम्हाला वाटलं'' सत्यवीरने हाताची घडी घालत विचारलं.

''मला शंका आली होती. पण नाडी लागली नाही म्हणून मी गळ्याच्या इथे नाडी लागते का ते पाहण्याचा प्रयत्न करू लागलो तर मला मालतीताईंच्या मानेजवळ एक छोटासा रक्ताचा थेंब दिसला दिसला. तसा मला जरा वेगळाच संशय आला. म्हणून मग मी कर्तव्यदक्षपणे पोलिसांना फोन लावला.'' पाटील सभ्यपणाने बोलत म्हणाले.

''बर मग पुढे'' सत्यवीर शांतपणे म्हणाला.

''पुढे काय... पोलिसांनी म्हणजेच या देशमुख साहेबांनी पुढची कारवाई उरकली. समोर बसलेल्या देशमुखांकडे हात करत पाटील म्हणाले. नंतर

मालतीताईंना हॉस्पिटलमध्ये नेलं. हॉस्पिटलमधून फोन आला कि मालतीताईंचा मृत्यू झालाय. मृत्यू काहीसा संशयास्पद वाटल्याने पोस्टमार्टेम करावं लागेल असं त्यांनी सांगितलं. मग मी अविनाशशी चर्चा करून सांगितलं कि हॉस्पिटलमधले डॉक्टर्स पोस्टमार्टेम करायचं म्हणत आहेत. त्याने सुरुवातीला याची काय आवश्यकता आहे म्हणून विरोध केला पण हॉस्पिटलची हि प्रोसिजर असते असं मी त्याला सांगितलं मग तो तयार झाला.'' एवढ बोलून पाटील शांत बसले.

''तुमचं काय मत आहे डॉक्टर, कशामुळे मृत्यू झाला असेल मालतीताईंचा'' पाटलांकडे पाहत सत्यवीर म्हणाला. त्याची नजर पाटलांच्या प्रत्येक हालचालींकडे होती. कपाळावर आलेला घाम पाटलांनी हातानेच पुसला.

''मला काही सांगता येणार नाही'' पाटील बोलले.

तेवढ्यात गाडी पाटील राहतात तिथे येऊन पोचली. घराजवळ गाडी येताच इथे थांबा असं पाटील म्हणाले. त्यांच्या सांगण्यासरशी हवालदार म्हस्केंनी गाडी बाजूला उभी केली. तसं पाटील लगबगीने गाडीतून उतरले. गाडीतून उतरताच त्यांना जरा बऱ वाटलं. कारण सत्यवीरच्या प्रश्नोत्तरांनी त्यांना घाम फुटला होता. डॉक्टर पाटील यांच्या मागोमाग सत्यवीर पण उतरला आणि मागोमाग त्यांच्या घराच्या दाराजवळ आला. त्याने उतरताना देशमुखांना गाडीमधेच बसायला सांगितलं होतं.

''अच्छा इथे राहता तर तुम्ही'' समोरील घराकडे पाहत सत्यवीर म्हणाला.

सत्यवीर असा अचानक त्यांच्यामागून गाडीतून उतरलेला त्यांना कळाल नाही. त्यामुळे मागे वळून आणि बिचकून पाटील "अं..हो..हो" एवढचं म्हणाले. सत्यवीर असा अचानक खाली उतरल्यामुळे पाटलांना काय बोलावे ते सुचेना. समोर पाटलांचे घर होते आणि ते घरात एकटेच राहत असावे. कारण घरातून कोणी बाहेर आलं नाही.

सत्यवीर डॉक्टर पाटील यांच्या नजीक उभा राहिला आणि बोलू लागला

"हे बघा डॉक्टर, मालतीताईंचा मृत्यू एका ठराविक विषसदृश रासायनिक पदार्थामुळे झालेला आहे. तो पदार्थ कोणता असेल याचा पत्ता फोरेन्सिक खात्याला सुद्धा लागलेला नाहीये. तुम्ही देसाई कुटुंबियांच्या बरेच जवळ आहात तेव्हा तुम्हाला त्यांच्या घरची इत्यंभूत माहिती असेल. तसचं अशी कोणती माहिती जी या खुनासंदर्भात तुम्हाला असल्यास मला नक्की सांगावी जेणेकरून तपासकार्यात मदत मिळेल. कोणतीही माहिती तुम्ही न लपवता मला सांगावी असं मला वाटत. माझी मदत हवी असेल तर मला तसं सांगा. पोलिसांना मधे न घेता ती माहिती आपल्या दोघात राहील याची खात्री मी तुम्हाला देतो. कारण पुढे जाऊन जर हि माहिती पोलिसांना मिळाली आणि त्यात संशयाची सुई तुमच्याकडे वळली तर... थोडं थांबून पोलिसांच्या गाडीकडे पाहून आणि परत पाटलांकडे वळत सत्यवीर म्हणाला. "पोलिसांची तपासाची आणि संशयितांना हाताळण्याची पद्धत तुम्हाला माहित असेलच. त्यामुळे काही सांगायचं असेल तर हीच वेळ आहे." सत्यवीर दोन्ही हात मागे बांधून पाटलांकडे निरखत उभा राहिला.

डॉक्टर पाटील पूर्ण घामाने भिजलेले होते त्यांच्या तोंडातून शब्दहि फुटला नाही. सत्यवीरने दिलेल्या इशाऱ्यामुळे तर त्यांची पूर्ण भंबेरीच उडालेली होती.

"अं...म..मी..मला जे माहिती ते सगळं सांगितलं आहे सत्यवीरसाहेब" अतिशय चाचरत पाटील म्हणाले.

"तसं असेल तर तुम्हाला घाबरण्याची गरज नाहीये. कसलीही माहिती तुम्हाला द्यावी वाटली तर सरळ माझ्याकडे येऊ शकता" असं बोलून सत्यवीरने पाटलांना आपला घरचा फोनक्रमांक दिला आणि त्यांना जायला सांगितलं. शांतपणे काहीही न बोलता पाटील घराकडे वळले. सत्यवीर गाडीमध्ये येऊन बसताच त्याने गाडी सुरु करायला सांगितली. लगेचच हवालदारांनी गाडी सुरु केली.

"काय झालं सत्यवीर पाटलांशी काय बोलत होतास तू.." गाडी चालू होताच देशमुखांनी विचारलं.

"काही विशेष नाही देशमुखसाहेब, बस्स डॉक्टर पाटलांना गुन्ह्याचं गांभीर्य सांगितल आणि काही माहित असेल तर पोलिसांना मदत करा असं म्हणालो" पाठीमागे रेलत आणि शरीराला झटके देत सत्यवीर म्हणाला.

"ओह्ह.. तुला काय वाटत पाटलांना काही विशेष माहिती असेल का या प्रकरणात" देशमुखांनी सत्यवीरकडे पाहत विचारलं.

"शक्यता नाकारता येत नाही. तसंपण मी अंधारात तीर मारला आहे.. बघू काय होतंय ते" सत्यवीर हलकेच स्मित करत म्हणाला आणि गाडीच्या बाहेर पाहू लागला. बाहेर चांगलाच अंधार पडलेला दिसत होता. गाडी मुख्य रस्त्यावर

आली होती आणि रस्त्यावरचे दिवे लक्ख प्रकाशात उभे होते. सत्यवीर विचारमग्न झालेला असल्याने देशमुखांनी त्याला जास्त काही विचारले नाही. थोड्या वेळाने गाडी सत्यवीरच्या घरापुढे आली. सत्यवीर गाडीतून खाली उतरला आणि देशमुख बसले होते त्या दरवाजाजवळ गेला.

"प्रकरण वाटत तितके सोपे नाहीये देशमुख साहेब. बराच काथ्याकुट करावा लागणार असं दिसतंय" दरवाजावर हात ठेवत सत्यवीर म्हणाला.

"हम्म.. तू म्हणतोयस त्याची कल्पना आलीय मला" देशमुख गाडीमध्ये बसूनच म्हणाले.

"आपल्याला दोन गोष्टी समजल्या म्हणजे या खुनाचा सूत्रधार कोण आहे समजू शकेल देशमुख" सत्यवीर म्हणाला.

"त्या कोणत्या.." कपाळावर आठ्यांच जाळ आणत देशमुख म्हणाले.

"एक म्हणजे ज्या कोणत्या हत्याराने खून केला गेलाय ते हत्यार आणि खुन करण्यामागच कारण" सत्यवीर म्हणाला.

"हुश्श.." असं करत देशमुख म्हणाले "त्या दोन्ही गोष्टी सध्यातरी आपल्याकडे नाहीत. लवकरच आपल्याला या दोन्ही गोष्टी मिळवाव्या लागतील."

"लवकरच त्या गोष्टी मिळतील आपल्याला देशमुख साहेब. तुम्ही फक्त तुमचा तपास चालू ठेवा. कारण संशय हा सगळ्यांवरच आहे. मालतीताईंना मारून बऱ्याच जणांना बदला घ्यायचा असेल. कोणालासुद्धा संशयातून सूट देता कामा नये" हात झटकत सत्यवीर म्हणाला.

“ठीक आहे, सत्यवीर मी मालतीताईंच्या राजकीय वर्तुळात जरा चौकशी करतो त्यांच्या कामाबद्दल थोडी माहिती घेतो. त्यांचे कोणी विरोधक होते का असल्यास कितपत विरोध करणारे होते.” देशमुख म्हणाले.

“हम्म..राजकीय व्यक्ती कोणच्यातरी खांद्यावर बंदूक ठेवून असा घातपात करू शकतात. पण खून घरात झालेला असल्याने कोणाची तरी मदत घेऊन हे कृत्य करता येऊ शकते. सर्व शक्यता पडताळून घ्यायला काहीच हरकत नाहीये.” सत्यवीर हनुवटीवर हात ठेवून म्हणाला.

“बर.. चला आता उशीर झालाय. उद्या बोलूयात” असं म्हणून इंस्पेक्टर देशमुखांनी सत्यवीरचा निरोप घेतला. सत्यवीरसुद्धा आपल्या घराकडे जायला वळला.

कमलाबाई

दुपारचं ऊन सरून संध्याकाळ होत आलेली होती. दत्तनगरजवळील वस्तीमध्ये आतल्या गल्ल्यांमध्ये माणसांची जरा वर्दळच होती. उन कमी झाल्याने लहान मुले गल्ल्यांमध्ये खेळत होती. वयोवृद्ध लोकं घराच्या बाहेर उभी राहून शेजारच्यांशी चकाट्या पिटत उभी होती. घरातल्या कर्त्या पुरुषाची कामावरून येण्याची वेळ झाल्याने त्यांच्या बायका स्वयंपाकाची तयारी करण्यात गुंतल्या होत्या. दत्तनगरच्या आसपासच संध्याकाळच्या सुमारासच हे नेहमीचच वातावरण होतं. वस्तीमध्ये बरीच छोटी मोठी घरे होती. आता म्हणायला वस्ती असली तरी तेथील घरे हि पक्क्या स्वरूपाचीच होती. तिथली लोकं पोटापुरत कमावत होती आणि दोन खोल्यांच्या घरात निवांत राहत होती. गल्ल्यांच्या पुढे मुख्य रस्त्याला चिटकून काही दुकाने आणि छोट्याश्या टपऱ्या पण होत्या. त्यातल्याच एका टपरीजवळ उभं राहून सत्यवीर शांतपणे सिगारेट ओढत टपरीवाल्याशी गप्पा मारत उभा होता. आत्ताच टपरीवाल्याला त्याचे हात ओले करून त्याने माहिती मिळवली होती कि कमलाबाई ह्या आतमधल्या गल्ल्यांच्या रांगेत शेवटच्या दोन खोल्यांमध्ये आपल्या नवरा आणि लहान मुलीसोबत राहतात. नवरा एका छोट्या कंपनीच्या गेटवर वॉचमन म्हणून रात्रपाळीत काम करत होता आणि छोटी मुलगी शाळेत शिकत होती. काही

वेळातच कमलाबाई देसाई वाड्यावरची कामं आटोपून घरी येतील असा सत्यवीरचा कयास होता आणि त्यांचीच वाट पाहत मुख्य रस्त्याकडे नजर ठेवून तो उभा होता.

मालतीताईंचा मृत्यू झाला तेव्हा कमलाबाई वाड्यामध्येच होत्या एवढचं न्हवे तर मालतीताई जमिनीवर पडल्या हे कमलाबाई यांनीच आधी पाहिलं होतं. वाड्यावर कमलाबाईची चौकशी करण सत्यवीरला रास्त वाटलं नाही कारण कदाचित अविनाशसमोर त्यांना जास्त बोलता आला नसतं. त्यामुळेच कमलाबाई यांची चौकशी त्यांच्याच घरात जाऊनच करणे सत्यवीरला क्रमप्राप्त वाटत होतं. संध्याकाळी कमलाबाई यांचा नवरा घरात नसतो. कमलाबाई आणि त्यांची मुलगीच असते. त्यामुळे घरात जाऊन चौकशी केल्याने कमलाबाई कोणतेही दडपण न घेता सगळ्या गोष्टी इत्यंभूत सांगतील असा सत्यवीरचा अंदाज होता. वाड्यावर कमलाबाईनी सत्यवीरला पाहिलं असल्याने त्या लगेचच ओळखतील असा विश्वास सत्यवीरला वाटत होता. सत्यवीर आपल्याच विचारांमध्ये मग्न होऊन सिगारेट ओढत शांतपणे उभा असतानाच त्याचं लक्ष मुख्य रस्त्याकडे गेलं.

हातातली कापडी पिशवी सांभाळत डोक्यावर पदर घेऊन काष्टा घातलेली कमलाबाई लगबगीने मुख्य रस्ता ओलांडून आतमधल्या गल्ल्यांमध्ये प्रवेश करत होती. तिला असं येताना पाहताच सत्यवीर जरा टपरीच्या आडोशाला सरकला आणि कमलाबाई गल्लीतून पुढे जाण्याची वाट पाहू लागला. काही वेळातच कमलाबाई लगबगीने टपरीपुढून समोरच्या गल्लीत निघून गेली. ती लगबगीने घरी जात असल्याने तिने सत्यवीरला पाहण्याचा प्रश्नच नव्हता.

कमलाबाई पुढे गेली आहे याची खातरजमा करून सत्यवीरने हातातली सिगारेट खाली टाकून विझवली आणि ठराविक अंतर ठेवून कमलाबाईच्या मागोमाग जाऊ लागला. असा प्रसंग येणार हे सत्यवीरला ठावूक होतं म्हणूनच सत्यवीरने आज त्याची मोटारसायकल न आणता चालतच तो या ठिकाणी आला होता. जेणेकरून कोणाचही लक्ष त्याच्याकडेन न जाता त्याला सावकाशपणे कमलाबाईच्या मागे जाता यावं. काही वेळातच कमलाबाई आपल्या दोन खोल्यांच्या घरापाशी येऊन ठेपली आणि दरवाजा लोटून आतमध्ये निघून गेली. सत्यवीर अगदी शांतपणे चालत येत होता. काही वेळातच तोही कमलाबाईच्या घराजवळ येऊन पोहोचला. थोडा थांबून त्याने दारावर टकटक केली. तसा आतून आवाज आला- " कोन हाये"

"मी गुप्तहेर सत्यवीर, आपण देसाईच्या वाड्यावर भेटलो होतो. तुमच्याशी थोडं बोलायचं होतं." सत्यवीरने बाहेरूनच आवाज दिला. यावर आतून काहीच प्रतिसाद आला नाही. पण थोड्या वेळातच दरवाजा उघडला गेला आणि डोक्यावर पदर घेऊन कमलाबाई दरवाजा उघडून उभी राहिली.

"नमस्कार मला ओळखलंत ना तुम्ही" सत्यवीर हात जोडून थोडसं स्मित करत म्हणाला.

कमलाबाई काहीशी भांबावलेल्या स्थितीत उभी होती. कारण अचानक सत्यवीर आपल्या घरापाशी येऊन उभा ठाकेल असं तिला वाटलं नव्हतं आणि तसंही आपल्याकडे सत्यवीरचं काय काम असेल या विचाराने ती गोंधळली होती. तिच्या चेहऱ्यावरचे हे सगळे भाव सत्यवीरने भराभर टिपले आणि कमलाबाईला विश्वासात घेत म्हणाला.

"कमलाबाई काळजी करू नका. वाड्यामधल्या नुकत्याच घडलेल्या प्रकरणाबद्दल मला थोडीशी माहिती हवी होती. तुम्ही अजिबात काळजी करू नका मी तुमच्या मालकीणबाईना न्याय मिळवून देण्यासाठीच पोलिसांच्या सांगण्यावरूनच तपास करतोय." सत्यवीर मनमोकळ हास्य करत म्हणाला.

सत्यवीरचा हसरा चेहरा पाहून कमलाबाई जरा निश्चिंत झाल्या. कारण नाही म्हटलं तरी पोलिसांच्या प्रकरणात नसती ब्याद ओढवून घेण्यात त्यांना काहीही स्वारस्य नव्हतं. बाहेर जरा अंधार पडू लागला होता. कमलाबाईनी सत्यवीरला आत बोलावून घेतल. सत्यवीर घरात आला आणि दाराजवळच्याच लाकडी खुर्चीवर विसावला. कमलाबाई आत स्वयंपाक घरात गेली. समोरच लोखंडी कॉटवर कमलाबाईची मुलगी अभ्यास करत बसली होती. सत्यवीर आत येताच ती किलकिल्या डोळ्यांनी सत्यवीरकडे पाहू लागली. सत्यवीरने तिच्याकडे पाहून हलकेच स्मितहास्य केलं आणि घराचं निरीक्षण करू लागला. ते दोन खोल्यांचं पक्क घर होत. पुढे एक खोली आणि मागे स्वयंपाकघर. पुढच्या खोलीत एकच दिवा होता त्याचा मिणमिणता प्रकाश सगळीकडे पसरला होता. एका कोपऱ्यात कपडे ढीग करून ठेवले होते आणि त्याच्या बाजुलाच २ लोखंडी ट्रंका एकावर एक ठेवलेल्या होत्या.

"चाह घेणार न.." कमलाबाईने आतून डोकावून विचारलं. तसं सत्यवीरने होकारार्थी मान डोलावली.

काही वेळातच चहा घेऊन कमलाबाई सत्यवीरच्या पुढे आली आणि पुढच्या लोखंडी कॉटवर विसावली. पदराने घाम पुसत आता सत्यवीर काय विचारणार याचाच विचार करत चेहऱ्यावर दडपणाचे भाव घेऊन बसली होती.

सत्यवीरला ते कमलाबाईकडे न पाहताच समजलं होतं. त्यामुळे एकदम प्रश्नांची सरबत्ती न करता खेळीमेळीच्या वातावरणातूनच कमलाबाईची चौकशी करावी लागणार हे सत्यवीरने ताडलं. तसंही समोरची व्यक्ती पाहून त्याच्याकडून माहिती कशी काढून घ्यावी हे सत्यवीरला चांगलंच समजत होतं. चहाचा एक घोट घेऊन आणि कमलाबाईकडे न पाहताच सत्यवीर स्मितहास्य करत म्हणाला "वाहः चहा फक्कड झालाय कमलाबाई "

यावर कमलाबाई कसनुस हसल्या.

"तुमच्या हाताला चांगलीच चव आहे कमलाबाई" कमलाबाईकडे पाहत तृप्तीचे भाव आणत सत्यवीर म्हणाला.

या स्तुतीने कमलाबाई नुसताच हा हा असं म्हणल्या पण त्यांच्या मनावर आलेला ताण थोडा हलका झाला हे सत्यवीरने टिपले आणि काहीही न बोलता तो चहा पिऊ लागला. काही वेळ असाच शांततेत गेला.

"कमलाबाई वाड्यावर जे काही घडलं ते खूप दुर्दैवी होतं. असं कोणाच्याही बाबतीत घडू नये. पण आता काय करणार. आम्हाला कर्तव्यापोटी सगळ्यांचीच चौकशी करावी लागते. आमचं कामच आहे ते. त्याशिवाय आमचं पोट कस चालणार.. नाही का" चेहऱ्यावर हसरे भाव आणत आणि शक्य तितके वातावरण खेळीमेळीचे ठेवत सत्यवीर म्हणाला. कमलाबाई सत्यवीरच्या या गोड बोलण्याने आता बऱ्यापैकी तणावरहित होऊ लागली होती आणि जरा आरामात कॉटवर बसली होती.

"कमलाबाई तुम्ही आम्हाला तपास कामात मदत करणार का? म्हणजे देसाई वाड्यावरचे लोक स्वभावाने कसे आहेत. तुमच्याशी नीट वागतात का? पगारपाणी वेळेवर देतात का? वगैरे वगैरे माहिती हवी होती" चहाचा घोट घेत सत्यवीर म्हणाला. आपला संशय हा तिच्यावर नसून तिला वाड्यावर कशी वागणूक मिळते हे जाणून घेण्याचा आपण प्रयत्न करत आहोत असं सत्यवीर भासवत होता.

कमलाबाई सुद्धा आता जरा एक पाय वर घेऊन निवांत बसली आणि सांगू लागली– "मानस लय चांगली हायती बगा. माजी आन माज्या घरातल्या माणसांची खूप काळजी घेत्यात"

"अस्स.. ते कस काय" सत्यवीर उगाचच चहाचा कप हातात घेत प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागला.

"मला पगार देत्यात येळेवर, माज्या पोरीची चौकशीबी करत्यात. माज्या मालकाला समजावून सांगत्यात सगळं" कमलाबाई बोलून गेल्या.

"मालकाला काय समजून सांगत असतात" न समजून सत्यवीर म्हणाला. कमलाबाईच्या नवऱ्याला देसाई कुटुंबीय कशाबाबतीत समजावून सांगत असावेत याचा त्याला प्रश्न पडला.

तसं थोडंस खाली पाहत कमलाबाई म्हणाल्या "आता काय सांगू साहेब तुम्हास्नी, आमचे मालक चांगल्या कंपनीत कामास्नी होते पण मित्रांच्या नादाला लागून दारूच्या येसनाला लागले. आन त्या येसनापायी लयं भिकेकंगाल झाले होते. हातातली चांगली कंपनीतील नोकरी होती ती पण

सोडून दिली. आन मलाबी घरात तरास देऊ लागले. म्या देसाई वाड्यावर काम करायचे तवा आणि अजून २-३ घरात धुनी भांडी बी करायचे. हि पोरगी शाळत शिकाय होती. तिच्या फी ला बी पैसा हातात गावत नव्हता. हे अविनास साहेबास्नी कळल तेव्हा तेनी हित येऊन आमच्या मालकाची समजूत घातली आणि मोठ्या बाईसाहेबांच्या ओळखीन एका ठिकाणी आमच्या मालकाला वाचमनची नौकरी देऊ केली."

"ओह्ह.. म्हणजे अविनाश यांनी मालतीताईंच्या ओळखीने तुमच्या मालकांना नोकरी देऊ केली होती तर" सत्यवीर चहाचा घोट घेत बोलला.

"हा ते तर हायेच, पन दर दिवाळीला आम्हा सगळ्यासनी कापड बी घेऊन दित्यात आन वर बोनस बी. मला अविनास साहेबांनी फक्त आमच्या इथे कामाला या चांगला पगार देऊ असं सांगितलं. त्यांना वाडा सांभाळणारा कोणी बाईमाणूस पण पाहिजे हुतं. मोठ्या बाईसाहेबांकडे माणसांची लयं रीघ लागायची. आन वाहिनीसाहेबांना पण घरकामात मदतीला कोणीतरी हवंच होतं. आता ती मानस एवढं आमच्यासाठी करत्यात तर अजून काय पाईजे म्हनून मीबी हा म्हटलं." कमलाबाईने एका दमात सगळं सांगून टाकलं.

एवढी माहिती कळताच आता मूळ मुद्द्याला हात घालायला हवा असं सत्यवीरला वाटून गेल. हातातला चहा संपला असल्याची जाणीव त्याला झाली.

"वाहः असा फक्कड चहा बऱ्याच दिवसांनी पिला बघा. अजून मिळेल का?" चेहऱ्यावर तेच समाधान मिळाल्याचे भाव आणत सत्यवीर म्हणाला.

"हाये कि अजून आनते हा. असं म्हणत कमलाबाई उठली आणि पटकन स्वयंपाक घरात जाऊन तिने अजून एक चहाचा कप सत्यवीरच्या हातात ठेवला.

"आहाह.. कमलाबाई तुमच्या हातचा चहा पिऊन अगदीच पोट भरल्यासारख वाटतय बघा" सत्यवीर अतिशय मंदपणे स्मितहास्य करत चहाचा घुटका घेत म्हणाला.

"आयो एवढा आवडला वय चाह तुम्हास्नी" कमलाबाई हलक्याच लाजत बोलल्या. त्या आता आरामात बसून बोलू लागल्या होत्या. याचाच फायदा घेत सत्यवीरने पुढचा प्रश्न केला.

"बऱ मला एक सांगा कमलाबाई तुमच्या मोठ्या मालकीणबाई म्हणजेच मालतीताई स्वभावाने कशा होत्या" सत्यवीर मान खालुन चहा पीत उत्तराची वाट पाहू लागल्या. मालतीताईविषयी बोलायचं म्हटल्यावर कमलाबाईचा चेहरा जरा सुकल्यासारखा झाला.

तरीही त्या पुढे बोलू लागल्या – "मोठ्या बाईसाहेब स्वभावाला लयं कडक होत्या बगा. कामात जराबी कुचराई झालेली अजिबात खपत नव्हती त्यासनी. जरा सुदिक चूक झाली कि वसकन कावायचा. मला तर लय भीती वाटायची बगा त्यांची.

"अच्छा घरातल्या सगळ्यांशीच तसं वागायच्या कि फक्त तुमच्याबरोबरच" सत्यवीर हलकंस हसत म्हणाला.

"सगळ्याशीच ओ.. कोणाला सुदिक सोडत नसायच्या.. आबासाहेब बरे होते तेव्हा ते सांभाळून घ्यायचे समद, पर आबासाहेबांचा डोक्याचा अपघात

झाल्यापासन ते खाटेवर पडून होते मगतर बाईसाहेबांना कोणीबी आवरणार नव्हतं.” मान खाली घालत कमलाबाई बोलली.

“त्यांची दोन्ही मुलं आणि सून त्यांच्याशी सुद्धा असंच कडकपणे वागणं होतं का?” प्रश्नार्थक मुद्रा करत चहाचा कप धरून सत्यवीर म्हणाला.

“अर्रर..ते तर इचारुच नका तुम्ही...” कपाळावर हात ठेवत कमलाबाई म्हणाली. तसा सत्यवीर जरा खुर्चीत नीट बसला आणि म्हणाला”

“का हो काय झाला एवढ कपाळावर हात मारण्यासारख?” सत्यवीरच्या या प्रश्नासरशी कमलाबाई सुद्धा सावरून बसत थोडं पुढे झुकत बोलू लागली.

“अवो अविनास साहेबास्नी आन वाहिनीसाहेबास्नी तर लयच कावायच्या. कुटबी चूक झाली तर लय झापायचा दोघांना. आन बिचारी दोघबी निमुटपनी ऐकायचे सगळं. आबासाहेबांना सांभाळायला दवाखान्यातून नर्स ठिवली होती तर तिलाबी काडून टाकली आन या दोघास्नीच आबासाहेबांच सगळं बागाय लावलं” कमलाबाई दुखी स्वरात म्हणाल्या.

“त्यांचा दुसरा मुलगा आशुतोष त्याला काही बोलायच्या कि नाही” सत्यवीरने विचारलं

“हम्म..” असं म्हणत ओठ मुडपत नाराजीचा स्वर काढत कमलाबाई म्हणाली.. तर तर.. तेला कशाला काही बोलतील बाबा. लाडाचा गोळा न तेंचा तो. आपल्या पोटच्या पोराला कशाला काय बोलतील त्या”

“आपल्या पोटच्या पोराला म्हणजे...न समजून सत्यवीरने विचारलं “

"अवो आशुतोष तेंचा स्वतःचा पोरगा ना.. अविनास साहेब हे आबासाहेबांच्या पहिल्या बायकोचे पोर होते. सावत्र मुलगा.. मोठ्या बाईसाहेबांचा." कमलाबाईने एका दमात सांगून टाकलं.

"काय सांगताय काय.." हातातला चहाचा कप तसाच ठेवून कमलाबाईकडे आश्चर्याने पाहत सत्यवीर बोलला.

"हो, आबासाहेबांची दोन लग्न झाली हायेत. पहिली बायकू आजारात मेली तिचा पोरगा म्हणजे अविनास साहेब. ते लहान असतानाच तेंची आई गेली. मग लहान पोराची खाण्यापिण्याची आबाळ होऊ नये म्हनून आबांनी दुसरं लगीन केलं ते मोठ्या बाईसाहेबासंग. तेंना जो पोरगा झाला त्यो आशुतोस" कमलाबाईने अगदी मोलाची माहिती पुरवली होती. सत्यवीरला हि माहिती नवीन असल्याने तो विचारात पडला कि देशमुखांनी त्याला हि माहिती कशी काय सांगितली नाही कि त्यांनाच या बाबत काही माहिती नाहीये. खुनाच्या प्रकरणात सर्व अंगाने माहिती घेणे गरजेचे असताना देशमुखांना हि माहिती कशी नसावी. सत्यवीरला भराभर प्रश्न पडत गेले. कदाचित पोलिसांच्या चौकशीत पोलिसांनी या अनुषंगाने चौकशी केली नसावी. वाड्यावर सगळ्यांची चौकशी होत असताना हि माहिती देण्यासारखं महत्व वाड्यावरील कोणत्याच सदस्याला वाटलं नसेल. असो आता आपल्याला हि माहिती मिळाली हे महत्वाचं आहे. एकंदरीत कमलाबाईला घरी भेटण्याचा निर्णय चांगलाच फळाला.

"चाह देऊ का अजून साहेब" सत्यवीरची विचारांची तंद्री भंग करत कमलाबाईने विचारलं

"न..नाही नको एवढा पुरे आहे..." एवढं बोलून सत्यवीरने आता थोडसं गंभीरपणे प्रश्न विचारायला सुरुवात केली-

"अविनाश सोबत मालतीताई यांचं वागण कस असायचं" सत्यवीरने विचारलं.

"अवो काय सांगू लयच हाड्तुड करत वागणूक द्यायचा तेस्नी. आन वहिनिसाहेबास्नी पण अशीच वागणूक देयाच्या. बिचारी दोग मात्र शांतपणे त्यांची सगळी कामा निमुटपणे करायची. कवा कवा वहिनिसाहेबास्नी अविनास साहेब इचारायला पण येयाचे कि काही मदत करू का कामात म्हणून, पण वहिनीसाहेब नाई नाको म्हणून सगळी कामा एकटी करायच्या. तरीबी येळ मिळेल तसं अविनास साहेब घरकामात वहिनीसाहेबांना मदत करू लागायचे. दोघांचा एकमेकांवर लाय जीव बगा. कवा कवा मला वाटायचं माझीच दृष्ट नको लागाय या जोडप्याला." कमलाबाई हलकेच हसत वर पाहत म्हणाल्या.

"कमलाबाई त्या दिवशी जेव्हा मालतीताईं जमिनीवर कोसळल्या तेव्हा नक्की काय झालं होतं मला सविस्तर सांगाल का? सत्यवीर गंभीर चेहरा करत म्हणाला.

"हो सांगती कि असं म्हणत कमलाबाईनी पदर कमरेला खोचला दोन्ही पाय खाटेवर घेतले आणि सांगायला सुरुवात केली- "त्या दिशी बगा वाड्यावर मला खूप कामं होती. सकाळपासून मी आणि वहिनीसाहेब कामातच हुतो. सगळी जुनी भांडी काढून धुवून पुसून ठिवली. समदा वाडा झाडून पुसून साफ केला. संध्याकाळी झाल्यावर मी आन वहिनीसाहेब गप्पा मारत स्वयंपाकघरात भाज्या निवडत बसलो हुतो. अचानक मोठ्या बाईसाहेब तनतनत

स्वयंपाकघरात आल्या. आन मोठ्या बाईसाहेबांनी ४-५ साड्या आन २-३ चादरी आमच्यासमोर आणून टाकल्या. आन म्हणाल्या हि कापड का धुतली न्हाईत. अमी दोगी त्यांच्या तोंडाकड बघतच राहिलो. घटकाभराने वहिनिसाहेबांनी सांगितलं कि मागच्याच हप्त्यात धुतली हायती हि. तवा बाईसाहेब म्हणाल्या या साड्या खराब झाल्यात. चादरींवर कळकट डाग पडलेत परत आताच्या आत्ता धुवा हि कापड, मला अंघोळीला जायचंय. असं म्हणून त्या अंघोळीला निघून गेल्या आम्ही दोगी आदीच दिवसभराच्या कामाने थकून गेलू होतु. परत हे कपडे धुवाचे म्हटल्यावर मला तर लय आंग मोडून आल्यावानी झालं. पर बोलणार काई? माझी तर घरी जायची येळ झाली हुती. माजी पोरगी घरी एकटी असते सांच्याला. कारण माझं मालक रात्रपाळीला जातो. मला लगबग घरी याचं हुतं. वहिनीसाहेबांस्नी हे माहित हुत म्हनून त्या म्हणाल्या

"कमलाबाई तुमी जावा मी समदी कापड धुते." वाहिनीसाहेबांना एकट्याला एवढ कपडं धुवायला लावायला लावून घरी जायचं, मला लय वंगाळ वाटलं बगा. बिचाऱ्या वाहिनीसाहेबांनी मोठ्या बाईसाहेबांचा शब्द कधी खाली पडू दिला नाही. त्यांना असं एकट्याला कामा कराया सोडून जावा वाटना. तवा मी पन थांबले आन म्हनले मी पन थांबते दोगीबी मिळून कापड धुवू. आन आम्ही दोगी वाड्याच्या मागच्या बाजूला हिरीवर कापड घेऊन गेलू. वहिनिसाहेबांनी रहाटाला कळशी लावली आन पानी उपसून काडाय लागल्या. मंग मी आन वहिनीसाहेब कपडे धुवाय लागलो. काही वेळात पानी संपल आन वहिनिसाहेबांनी परत पानी उपसायला कळशी हिरीत टाकली आन पानी

उपसणार एवढ्यात दोर तुटला आन कळशी हिरीतच पडली. आत सांच्याला हिरीत उतरून कळशी काढायची म्हटल्यावर आम्हा दोघींना जमणार नव्हतं. मंग मीच म्हणाले वहिनीसाहेब आता कळशी राहूदेत आत हिरीतच. साहेबास्नी सांगून परत काढू. तुमी कापड धुवा तवर म्या आत जाऊन दुसरी कळशी आणते. असं म्हणून मी मागच्या रस्त्याने आतमध्ये परत वाड्यात आले. आन जिन्याने वरच्या मजल्यावर गेले कारण वरल्या मजल्यावर सामानाच्या खुलीत जुन्या सामानांच्या पसाऱ्यात लय समान हुत. तीत कळश्या, बादल्या आन लय कायकाय सामान असतया. तीत इकडतिकड पाहिल्याव मला कोपऱ्यात एक कळशी दिसली ती घेतली आन खाली आली. तवा खाली येताना म्या पाहिलं कि मोठ्या बाईसाहेबांच्या खोलीचा दरवाजा उघडाच हुता. त्या अंघोळ करून खोलीत आल्यावर खोली अशी उघडी ठेवत नसायच्या. म्हणून म्हन्ल आत बगाव आन माझी नजर आतमध्ये गेली. तवा मला लांबून दिसलं कि मोठ्या बाईसाहेबांचे पाय जमिनीवर पालथ दिसल. जणू की उताण्या पडल्यात तसं म्या म्हटलं अशा का पडल्याती जरा जवळून जाऊन बगाव असं म्हनून खोलीच्या समोर आले.

तर मोठ्याबाईसाहेब जमिनीवर उताण्या पडलेल्या दिसल्या मी तर घाबरलेच. पहिलं वाटलं चक्कर बिक्कर येऊन पडल्या कि काय म्हणून हाका मारल्या. तर हु नाही कि चू नाही माजी काय त्यस्नी हात लावायची हिम्मत झाली नाही. आवाज देऊन बी त्या उठानात आन कसली हालचाल बी करानात मंग मात्र मी घाबरले. पळत वाड्याच्या मागी गेले, आन मी मोठ्याने वहिनीसाहेबास्नी हाका मारल्या तवा त्या घाबरून पळत आल्या. त्यांनीबि हाक

मारल्या, जवळ जाऊन हलवलं तरीबी उठानात. शेजारच्या खोलीत आबा खाटेवर आजारी असल्यागत पडलेलं असायचं तवा त्यांना उठवून बी काय फायदा नव्हता कारण आबांना सौताचीच सूद नसायची. मंग मीच वाड्याच्या बाहेर गेले आन बाहेर जाऊन २ लोक बोलावून आणली आन त्यांनी डाक्तरास्नी बोलावून आनल. डाक्टारने तपासून सांगितलं कि हास्पिटलात हलवा. एवढ बोलून कमलाबाई शांत बसली

सत्यवीर शांतपणे हाताची बोटे एकमेकात गुंफवून शांतपणे ऐकत होता. कमलाबाईच्या घराबाहेर आता रात्र पडली होती. आजूबाजूला चांगलीच शांतता पसरली होती. घरात कोणी काहीच बोलत नव्हतं. कमलाबाईची पोरगी सुदा आमच्याकडे आम्ही काय बोलत आहोत ते ऐकत शांतपणे पाहत बसलेली होती. सत्यवीर खुर्चीत जरा मागे टेकून बसला आणि म्हणाला. "कमालाबाई तुम्ही जेव्हा कळशी आणायला परत आत वाड्यात गेलात. तेव्हा वाड्यात बाहेरून कोणी आल्याचं तुम्हाला जाणवलं का? बाहेरून कोणी वाड्यामधे येऊन मालतीताईंची हत्या केली असेल असं तुम्हाला वाटत का?" सत्यवीर शांतपणे कमलाबाईकडे पाहत म्हणाला. त्यावर कमलाबाई विचार करत म्हणाल्या

"नाई वो असं नाई वाटत मला. कारण अमी धून धुवाय गेलो तवा कोनी नव्हतं वाड्यात. तसंबी वाड्याच पुढच दार दिवसभर उघडंच असतंय रातच्याला अविनाससाहेब आले कि लावून टाकायचे. हा आता अचानक कोन बाहेरून आलं आसन तर आम्ही मागे धून धूत असल्यामुळ आमाला माहित नाई" कमलाबाई ने चेहरा बारीक करत सांगितलं.

"हम्म..डॉक्टर पाटील हे कसे आहेत स्वभावाने" सत्यवीरने हनुवटीवर हात ठेवत विचारले.

"त्यो तर लय डोमकावळ्यावाणी होता बगा... नजर चांगली नव्हती मेल्याची" तोंड वाकड करत कमलाबाई म्हणाल्या.

"अच्छा... अजून काही विशेष त्यांच्याबद्दल म्हणजे कामाव्यतिरिक्त कधी येणं जाणं त्याचं वाड्यावर" सत्यवीरने विचारलं.

"आबास्नी बगायला येयाचा तेवढच.. पन आला कि आपलं इकडे बघ तिकडे बघ करायचा लुथभरयासारखं... हलकट मेला" दात विचकत कमलाबाई म्हणाला.

"हम्म...असा उद्गार काढून सत्यवीर शांत बसला. आता अजून जास्त काही विचारण्यात काही अर्थ नव्हता कारण महत्वाच्या गोष्टी त्याला समजल्या होत्या. कमलाबाईनी बरीच माहिती दिली होती. आता इथे जास्त वेळ बसण्यात काही अर्थ नव्हता.

त्यामुळे सत्यवीर खुर्चीतून उठला आणि म्हणाला "चला कमलाबाई निघतो मी आता खूप वेळ घेतला तुमचा. मस्त चहा पाजलात तुम्ही, तुमची खूप मदत झाली मला."

कमलाबाईने सुद्धा हसत हसत सत्यवीरला निरोप दिला. कमलाबाईच्या घरातून बाहेर पडल्यावर रस्त्यावरून सत्यवीर खूप शांतपणे चालत चालला होता. रस्त्यावर जास्त वर्दळ नव्हती. बहुतेक घरात निजानीज करण्याची तयारी चालू होती. आज त्याला बरीच महत्वाची माहिती मिळाली होती आणि

तपासकार्यात त्याची खूप मदत होणार होती तसचं त्यानुसारच तपासाची पुढची दिशा ठरणार होती. सत्यवीरची विचारचक्र वेगाने फिरत होती. कमलाबाईने दिलेल्या माहितीनुसार वाड्यात कोणाच्याही अपरोक्ष वाड्यात येऊन घातपाताच कृत्य करता येऊ शकत होत असंच दिसतं होतं पण नक्की कोण असं करू शकेल? केलंच तर त्याने कोणत्या हत्याराच्या सहाय्याने हे कृत्य घडवून आणलं? मालतीताईंना अशा विचित्र पद्धतीने मृत्यू देण्यामागे गुन्हेगाराचा काय हेतू असू शकत होता? असे एक न अनेक प्रश्न सत्यवीरच्या मनात पिंगा घालत होते. जोपर्यंत गुन्ह्यात वापरलेलं हत्यार आणि गुन्हा करण्यामागचा हेतू कळणार नाही तोपर्यंत हे कोडं उलगडणार नाही हे सत्यवीर जाणून होता. त्यामुळे लवकरात लवकर पाऊले उचलण्याची गरज होती. तसही गुन्हेगार जो कोणी असेल तो आत्तापर्यंत सावध झालेला असू शकतो. त्यामुळे अतिशय सावधपणे पाऊले टाकणं क्रमप्राप्त होतं. त्यामुळे उद्या काय काय कामं केली पाहिजे याचा एक विशेष आराखडा सत्यवीरच्या मनात तयार होऊ लागला होता.

झडती

दुपारचे बारा वाजत आले होते. इन्स्पेक्टर देशमुख तणतणच सत्यवीरच्या घराजवळ आले. त्यांच्या चेहऱ्यावर ताण आणि राग दोन्ही गोष्टी स्पष्ट दिसत होत्या. देसाई खून प्रकरण लवकरात लवकर सोडवावं असं त्यांना वाटत होतं. तसे त्यांना वरिष्ठांकडून स्पष्ट आदेशसुद्धा होते. पण त्यांच्या हाती काही लागतं नव्हतं. खुनाच हत्यार पण अजून त्यांच्या हाती लागलेलं नव्हतं. तपासाची पुढची दिशा निश्चित होत नव्हती त्यामुळे एका वेगळ्याच तणावाखाली ते होते आणि अशाच अविर्भावात ते सत्यवीरच्या घराच्या दरवाजाजवळ येऊन जोरजोराने दरवाजा ठोठावू लागले. दरवाजा उघडायला काही वेळ लागला पण नंतर आतून सत्यवीरने दरवाजा उघडला.

"अरे काय सत्या.. किती वेळ लावलास दरवाजा उघडायला" देशमुख त्रासिक सुरात बोलले. सत्यवीरच्या उत्तराची वाटही न पाहता समोरच्या टेबलावर आपली डोक्यावरची पोलिसी टोपी आपटली आणि शेजारच्या खुर्चीत स्वतःला झोकून दिलं. देशमुखांचं हे वर्तन पाहता देशमुख वैतागलेल्या अवस्थेत आहेत हे कळायला सत्यवीरला गुप्तहेरीतल्या कौशल्याची गरज नव्हती.

"थोडी झोप घेत होतो देशमुखसाहेब, त्यामुळे दरवाजा उघडायला उशीर झाला." देशमुखांच्या समोरील रिकाम्या खुर्चीत विसावत सत्यवीरने टेबलावरचा लायटर घेतला आणि जवळील सिगारेट काढून शिलगावली.

"अरे हि काय वेळ आहे झोपायची. १२ वाजत आलेत. आपण सध्या किती गुंतागुंतीच प्रकरण सोडवत आहोत त्यावर काम करायचं सोडून तुला झोप कशी लागून शकते" मनगटावरील घड्याळाकडे पाहत अजूनच त्रासिक सुरात देशमुख बोलेल.

"काल रात्री कमलाबाईकडे जाण झालं. तिथून माघारी आलो तेव्हा विचार करता करता झोप लागली नाही. मनामध्ये काही दुवे जुळवता जुळवता झोप उशिरा आली म्हणूनच उशिरा जाग आली. पण तुम्ही आज एवढे वैतागलेल का आहात" शांतपणे सिगारेटच्या धुराची वलये हवेत सोडत सत्यवीर म्हणाला.

"सत्यवीर एवढे दिवस झाले मालतीताईंच्या खून प्रकरणाला आपल्या हाती अजून काहीच कसं लागत नाहीये. ना कोणी संशयित ना खुनाच हत्यार" देशमुख त्रासिक सुरात म्हणाले.

"काही प्रकरणात धीराने काम करावं लागतं देशमुखसाहेब. हे कोणत्याही मुरलेल्या गुन्हेगाराचे काम नाहीये. ज्याची गुन्हेगारी पद्धत गुन्हेगारी विश्वातील लोकांशी मिळतीजुळती असेल. इथे आपली गाठ एका हुशार व्यक्तीशी आहे जिने धीर धरून बरोबर संधी साधून मालतीताईंचा काटा काढलाय. त्यामुळे गुन्हेगाराचा हाच शिरस्ता अवलंबून आपल्याला धीराने काम घ्यावं लागेल. सरतेशेवटी तो आपल्या हाती लागेलच हे नक्की." सत्यवीरने सिगरेटची राख टेबलावरील रिकम्या डब्यात झटकत सांगितलं.

"बऱ, मला सांग काही नवीन माहिती हाती लागली तुला कमलाबाईच्या घरी" देशमुख शांत होत म्हणाले.

"हम्म.. काहीशी नवीन माहिती हाती लागली म्हणू शकता, पण ठोस काही नाही." सत्यवीर हवेत एक झुरका सोडत म्हणाला.

"म्हणजे नक्की काय? आणि तुला कोणावर संशय आहे का? कमलाबाईंनी विशेष काय सांगितलं? देशमुख एका मागोमाग एक प्रश्न विचारत गेले.

"देशमुख तुम्हाला तुमच्या चौकशीत हे समजलं का.. कि मालतीताई या आबांच्या दुसऱ्या पत्नी होत्या आणि अविनाश हा आबांचा पहिल्या पत्नीपासून झालेला मुलगा होता? तो लहान असताना त्याचं संगोपन नीट व्हावं म्हणून आबांनी दुसरं लग्न मालतीताईंशी केलं आणि नंतर मालतीताईंपासुन त्यांना आशुतोष हा दुसरा मुलगा झाला" सत्यवीर शांतपणे म्हणाला.

"काय सांगतोस काय.. आम्हाला हि माहिती नव्हती. चौकशीत कुठे असे प्रश्न विचारलेच गेले नाहीत." देशमुख अतिशय आश्चर्यचकित होऊन म्हणाले.

"या माहितीचा आपल्याला कितपत उपयोग होईल माहित नाही पण पोलिसांनी कमलाबाईंची योग्य चौकशी करण आवश्यक होतं. घरात खून घडला असेल तर अशा प्रकरणात घरातल्या नोकरांना घरातल्या माणसांची आणि त्यांच्या स्वभावाची इत्यंभूत माहिती असते. म्हणूनच ती माहिती वेगळ्या पद्धतीने घेणे गरजेचे असते हे तुम्हाला माहिती असेलच" सत्यवीर सिगारेटची राख झटकत म्हणाला.

"हम्म.. कमलाबाईंना आम्ही वाड्यातच प्रश्न विचारले होते. तेव्हा तिने घटनेसंदर्भात माहिती दिली कि ती त्या दिवशी वाड्याच्या मागे असलेल्या विहिरीवर नंदिनिसोबत कपडे धुवत बसली होती. कळशी विहिरीत पडली म्हणून कमलाबाई वाड्याच्या आतमध्ये आल्या. तेव्हा मालतीताई जमिनीवर कोसळलेल्या दिसल्या अशी माहिती त्यांनी दिली. त्याची खातरजमा पण करून घेतली. इतर सगळ्यांच्या स्टेटमेंटमध्ये एकवाक्यता वाटत होती. मला वाटलं तेवढं पुरेसं आहे" देशमुख हनुवटी खाजवत बोलले.

"तेवढ पुरेसं होतंच. पण वाड्यात तुम्ही कमलाबाईंना वेगळ्या प्रकारचे प्रश्न विचारले जरी असते तरी तिला उत्तर द्यायला प्रशस्त वाटलं नसतं. म्हणूनच प्रत्यक्ष तिच्या घरी जाऊन भेट घेऊन चौकशी करणे भाग होतं आणि त्यासाठीच मी तिच्या घरी जाऊन आलो" एवढं बोलून सत्यवीरने सिगरेटचा शेवटचा झुरका घेऊन सिगरेट विझवून डोकं वर करून खुर्चीत बसला.

"अच्छा... आम्ही सध्या बाहेर चौकशी करत आहोत कि मालतीताईंना कोणी राजकीय शत्रू वगैरे होते का जे असे कृत्य करू शकतात." देशमुख सांगू लागले.

पण त्यांना पुढे काही बोलू न देताच सत्यवीर डोकं वर करत मधेच म्हणाला

"काही वेळा शत्रू फक्त बाहेरचेच असतात असं नाही ते घराच्या आतमध्ये देखील असू शकतात."

सत्यवीरच्या या वक्तव्यावर देशमुख विचारात पडले कि सत्यवीर नक्की कोणाबद्दल बोलत असावा.

"देशमुखसाहेब मालतीताईंचा सख्खा मुलगा आशुतोषबद्दल काय माहिती काढलीत तुम्ही" सत्यवीर आता खुर्चीवर ताठ बसत म्हणाला.

"आशुतोष हा परदेशात शिक्षणाला जाण्याची तयार करत होता. मालतीताईंचीच तशी इच्छा होती म्हणून मागील वर्षीच त्याने त्यासाठीची तयारी करण्यासाठी शहरातल्या मुख्य भागात क्लास देखील लावला आहे. मालतीताईंचा मृत्यू झाला तेव्हा तेव्हा तो क्लासमध्येच होता. त्याची खातरजमा पण केली." देशमुखांनी माहिती पुरवली.

"ओह्ह.. अस्सं आहे तर... परदेशी शिक्षण म्हणजे पैसे पण जास्तच लागत असतील अर्थात देसाई कुटुंबियांना पैशाची चणचण तशी नाहीये पण तरीही एक गोष्ट विशेष आहे. अविनाशच शिक्षण पदवीपर्यंत देखील झालेलं नाहीये पण धाकट्या मुलाला आशुतोष मात्र परदेशात जायला मुभा मिळालीय. इथे एक प्रकारचा भेदभावच झालेला दिसून येत नाही का तुम्हाला." सत्यवीरने प्रश्नार्थक मुद्रा करत देशमुखांना विचारलं.

"कदाचित अविनाशला शिक्षणात रस नसेल आणि तसंही त्याची फळझाडांची नर्सरी आहे. त्यामुळे धंद्यामध्ये त्याला रस असेल. म्हणूनच त्याने शिक्षण पूर्ण केलं नसेल." देशमुखांनी आपलं मत मांडले.

"कि मुद्दाम अविनाशला छोटा मोठा उद्योग काढून दिला आहे आणि धाकट्या मुलाला आशुतोषला उच्चशिक्षण घ्यायला लावलंय. कदाचित कोणतातरी वेगळाच बेत असेल त्यामागे. कदाचित अविनाशला आयुष्यात काहीतरी मोठं करायचं असेल पण मालतीताईंनी त्याला ते करू दिलं नाही उलट

नर्सरी काढून दिली. त्यामुळे अविनाशला आपल्या स्वप्नांना तिलांजली द्यावी लागल्याचा राग असेल'' सत्यवीरने आपला संशय व्यक्त केला.

''तुला नक्की काय म्हणायचंय सत्यवीर?'' देशमुख गंभीर होत म्हणाले.

''दोन्ही भावांना घरात समान वागणूक मिळत होती कि नाही? दोघांमधले संबंध कसे होते? आपल्याला सगळ्या शक्यतांचा विचार करावा लागेल'' सत्यवीर आपले दोन्ही हात डोक्यामागे ठेवत म्हणाला.

''तसं बघायला गेलं तर कमलाबाईवर तरी किती विश्वास ठेवायला हवा. कारण मालतीताईंना पहिल्यांदा जमिनीवर पडलेलं त्यांनीच पाहिलं होतं कदाचित कळशी न्यायला वाड्यात आल्यावर त्यांचीच कसल्या तरी हत्याराने मालतीबाई यांचा काटा काढला असेल'' देशमुखांनी आपली शंका व्यक्त केली.

''कमलाबाई सुद्धा संशयाच्या बाहेर नाहीयेत. पण तुम्ही दिलेल्या या तर्कानुसार डॉक्टर पाटील सुद्धा हि गोष्ट करू शकतात. मालतीताईंवरचा त्यांचा राग त्यांनी बागेत जेव्हा त्यांची मी म्हाताऱ्याच्या रुपात भेट घेतली तेव्हाच व्यक्त केला होता. वाड्याचं दार हे नेहमीच उघड असतं. संध्याकाळी आबांची तब्बेत तपासण्याच्या बहाण्याने ते आंत आले असतील आणि वाड्यात कोणी नाही हे पाहून मालतीताईंच्या खोलीबाहेर आले. नुकत्याच अंघोळ करून आलेल्या मालतीताई पाटलांना दिसल्या असतील. मग संधीचा फायदा घेऊन बेसावध मालतीताईंना मागून इंजेक्शनला वेगळीच कोणतीतरी विषारी सुई लावून टोचली असेल मग लपून छपून आपल्या क्लिनिकमध्ये पळून गेले असतील. डॉक्टरी पेशात असल्याने विष आणि विषसदृश पदार्थांबद्दल त्यांना नक्कीच

ज्ञान असावे. नंतर लोकांनी बोलावल्यावर तपासण्याच्या बहाण्याने साळसुदपणे वाड्यात आले असतील.'' सत्यवीरने आपला तर्क मांडला.

''हम्म.. हा तर्क पण चपखल बसतोय. विषसदृश पदार्थ मिळवणे डॉक्टरांना सहज शक्य आहे'' देशमुखांनी पुस्ती जोडली.

''या तर्कात नक्की कोण बसतंय हे पाहण्याआधी आपल्याला खुनात कोणतं हत्यार वापरलं गेलंय त्या हत्यारबद्दल माहिती मिळणं आवश्यक आहे. उगाचच कोणावरही संशय घेऊन त्या बाजूने तपास करण्यापेक्षा एकदा का खुनाच हत्यार मिळालं कि ते कोण वापरू शकत याचा शोध घेऊन त्या दिशेने तपास करता येईल.'' सत्यवीरने विश्वासाने सांगितलं.

''पण हत्यार मिळणार कसे. घटनास्थळी असं कोणतही हत्यार किंवा काही संशयास्पद आढळलं नाही. पोलिसांनी वाड्यातील सगळ्यांच्या खोल्या तपासल्या तरीसुद्धा काहीही सापडलं नाही.'' देशमुख हताश होत म्हणाले.

''सगळीकडे शोधलं असं मला वाटत नाही देशमुख'' सत्यवीर देशमुखांकडे घारीसारखी नजर रोखून म्हणाला.

''म्हणजे तुला म्हणायचं काय सत्यवीर? पोलिसांनी कुठे शोधायचं राहिलंय आता'' देशमुखांनी साशंकतेन विचारलं.

''पोलिसांनी वाड्याच्या आसपास पाहिलं का? वाड्याचं कंपाऊंड जिथं आहे तिथून आतपर्यंत ३-४ मीटर रिकामी जागा वाड्याच्या सगळ्या बाजूंनी आहे. कदाचित तिथे आसपास कुठेतरी ते हत्यार पुरून ठेवलेलं असू शकत.

जमिनीवर खणलेल्या तशा प्रकारच्या खुणा असू शकतील" सत्यवीर बारीक डोळे करत म्हणाला.

"ओह्ह्ह... तू म्हणतोस त्या जागा खरंतर तितक्या व्यवस्थितपणे पहिल्या गेल्या नाहीयेत. अगदीच वरवरची पाहणी झाली." देशमुख विचार करत म्हणाले.

"तसं असेल तर आजचं वाड्यात जाऊन मी पाहून येतो, बघू हाती काही लागतंय. कारण तिथे आसपास काहीतरी मिळेल असं मला वाटतंय" सत्यवीर खुर्चीवरून उठत म्हणाला. अंगावरचे कपडे झाडत तो आरशात स्वतःला निरखू लागला.

"ठीक आहे सत्यवीर, तु तुझ्या पद्धतीने बघ काही मिळतंय का? काही मदत लागली तर सांग" देशमुखसुद्धा खुर्चीवरून उठत म्हणाले.

"तुम्ही एक काम कराल का?" भिंतीवरच्या आरशांत हातानेच केसांचा भांग पाडत सत्यवीर देशमुखांना म्हणला.

"जरूर.. सांग काय हवंय ते" देशमुख म्हणाले.

"तुमचा एक खास माणूस आशुतोषच्या मागावर ठेवा. आशुतोषचा क्लास कुठे आहे? क्लास व्यतिरिक्त तो कुठे जातो? त्याचे मित्र कोण आहेत. या सगळ्या गोष्टींची माहिती मिळवा" सत्यवीर म्हणला.

खरंतर आशुतोषच्या मागावर माणूस का ठेवायचा. सत्यवीरला त्याच्यावर एवढा संशय का वाटतोय याचा उलगडा देशमुखांना होईना.

"जरूर..पण असं करण्यामागे काही विशेष कारण" देशमुखांनी अखेर विचारलेच.

"तरुण मुलांचा खरा स्वभाव हा घरातल्या माणसांपेक्षा घरातल्या बाहेरच्यांना जास्त माहित असतो. तेव्हा त्याच्याबद्दलची खरी माहिती आपणाला बाहेरूनच मिळू शकते" सत्यवीर वळून देशमुखांकडे पाहत म्हणाला.

ते कारण देशमुखांना पटलं. त्यांनी मनगटावरील घड्याळाकडे पाहिलं तशी देशमुखांना ड्यूटीवर जाण्याची आठवण झाली. सत्यवीर लगेचच आवरून देसाई वाड्यावर जाणार होता. त्यामुळे देशमुखांनी सत्यवीरची रजा घेतली आणि काही महत्वाचं कळल्यास तातडीने फोन करण्यास सांगून देशमुख सत्यवीरच्या घरातून पोलीस स्टेशनला निघून गेले. देशमुख गेल्यावर सत्यवीर अंघोळ वगैरे करून तयार झाला आणि आपल्या दुचाकीवर बसून देसाई वाड्याकडे जाण्यास निघाला.

देसाई वाड्यावर पोहोचल्यावर त्याने आपली दुचाकी वाड्याच्या बाहेरचं एका झाडाखाली लावली. वाड्याच दार उघडच होतं त्यामुळे सत्यवीर आतमध्ये आला. वाड्यात शुकशुकाट जाणवत होता. आतमध्ये तुळशी वृन्दावनाजवळ येऊन सत्यवीर सगळीकडे नजर फिरवत असतानाच त्याला जिन्याच्या बाजूला पाठमोरी ऊभी असलेली नंदिनी दिसली. नुकतंच विहिरीवर धुणं धुवून ती आली होती आणि बादलीतले कपडे पिळत व्हरंड्यातल्या दोरीवर कपडे सुकायला टाकत होती. तिला पाहताच सत्यवीर जागीच उभा राहिला. नंदिनीला मागे सत्यवीर आल्याचं कळाल नाही. ती आपल्याच कामात गर्क

होती. सत्यवीरला आपल्या उपस्थितीची कल्पना तिला कशी द्यावी कळेना. नंदिनीची पाठमोरी मूर्ती न्याहाळत सत्यवीर तसाच उभा होता. नंदिनीने आपला पदर कमरेला खोचला होता त्यामुळे तिचा कमनीय देह दिसून येत होता. ओले कपडे झटकताना शरीराच्या हालचालींमुळे तिच्या केसांच्या बटा अलगदपणे तिच्या गालावर रेंगाळत होत्या त्यामुळे ती अजूनच सुंदर दिसत होती. सत्यवीरला तसं तिला मागून नुस्त पाहत बसणं प्रशस्त वाटेना त्यामुळे तो जरासा खाकरला.

त्यासरशी नंदिनीची मान झटकन मागे वळली. सत्यवीरकडे पाहताच ती कावरीबावरी झाली. कारण सत्यवीर मागे उभा होता याची तिला कल्पनाच नव्हती. हातातली कपड्याची वळकटी तिने खाली ठेवली आणि कमरेचा पदर सोडून तिने तो डोक्यावर कसाबसा धरला. चेहऱ्यावरच्या बटा हाताने कानामागे खोचल्या. नंदिनीने कपाळावर लावलेली एक नाजुकशी टिकली तिच्या सौंदर्यात जास्तच भर टाकत होती.

"क..कधी आलात तुम्ही.. माफ करा मला समजलंच नाही तुम्ही आलेलं" नजर खाली करत कावऱ्याबावऱ्या अवस्थेत नंदिनी बोलली. तिचा आवाज खूपच नाजूक आणि गोड होता.

"मी आत्ताच आलो...वाड्याच दार उघड होतं म्हणून सरळ आत आलो... माफ करा माझ्या अचानक येण्याने तुम्ही दचकलात" सत्यवीर सुद्धा मधाळ आवाजात बोलला.

"नाही माझंच लक्ष नव्हतं आणि वाड्याच दार पण उघडच असत. त्यामुळे आवाज दिल्याशिवाय कोण आलंय हे कळत नाही" नजर जमिनीकडे ठेवूनच नंदिनी म्हणाली.

"काही नाही.. त्या दिवशी मी रात्री अवेळी वाड्यात आलो होतो. त्यामुळे वाडा नीट पाहता आला नाही. त्यामुळे म्हटलं दिवसाउजेडी वाडा नीट पाहावा" इकडे तिकडे नजर फिरवत सत्यवीर म्हणाला.

"अच्छा..थांबा मी पाणी आणते आणि चहा टाकते तुमच्यासाठी" लगबगीने स्वयंपाकघराकडे वळत नंदिनी म्हणाली.

"नाही नाही.. त्याची काहीही आवश्यकता नाहीये.. मी फक्त वाडा पाहायला आलोय तुम्ही उगाच तसदी घेऊ नका. तुम्ही तुमची कामं करा माझ्यामुळे व्यत्यय नको त्यात" पुढे जाणाऱ्या नंदिनीला रोखत सत्यवीर म्हणाला.

"अहो व्यत्यय कसला.. घरात आलेल्यांना चहा पाणी करण या घराची पद्धतच आहे" नंदिनी म्हणाली.

"नाही नको... अशा औपचारिकतेची गरज नाहीये आणि तसही माझं चहापाणी झालंय. त्यामुळे खरंच तसदी घेऊ नका" सत्यवीर अतिशय सौम्य शब्दात म्हणाला. सत्यवीरचा ठाम नकार ऐकून मग नंदिनीने जास्त आग्रह केला नाही.

"बंर वाड्यात कोणकोण आहे आत्ता" सत्यवीरने विचारलं.

“मी आणि आशुतोष भावोजी आहेत. बाकी कोणी नाही” नंदिनीने माहिती पुरवली.

“ओके.. अविनाश आणि आबा कुठे आहेत? कमलाबाई आलेल्या नाहीत का आज कामाला” सत्यवीरने प्रश्न केला.

“आबांना घेऊन आमचे हे नर्सरीवर गेले आहेत्त. तिथे कामं पण आहेत आणि आबांना पण सहज बदल म्हणून नेलंय. कमलाबाई जरा उशिरा येतील” नंदिनी म्हणाली.

“आबांची तुम्ही दोघं खूप काळजी घेता. खरोखरंच असा मुलगा आणि सून मिळाल्याने ते स्वतःला भाग्यवानच समजत असतील.” सत्यवीर स्मित करत म्हणाला.

“अहो ते तर कर्तव्यच आहे आमचं. आमच्या ह्यांचे वडील ते माझेच वडील असं मानून त्यांची काळजी आम्ही नेहमीच आनंदाने घेतो. आबांची स्मृती जाण्याआधी आबा आमच्या दोघांनाहि खूप जीव लावायचे. खूप मजा मस्ती करायचे आम्हा दोघांसोबत. मला कधीही ते माझे सासरे आहेत असं वाटलं नाही. मला तर पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळायचे. त्यांना वाचनाची आणि भटकंतीची खूप आवड होती बऱ्याच ठिकाणी ते फिरून आले होते. वाचनाची आवड मला त्यांच्यामुळेच लागली. पण जसा त्यांचा अपघात झाला तसं ते सगळ्या गोष्टी विसरले. आम्हाला देखील ओळखेनासे झाले“ नंदिनीचे डोळे पाणावले आणि निराश होतं जमिनीकडे पाहून अश्रू ढाळू लागली.

नंदिनीला निराश झालेलं पाहून तिला जास्त काही विचारायला नको असं सत्यवीरला वाटलं.

"ठीक आहे. मी जरा वाड्यातील खोल्या पाहतो. तुमच्या कामात अजून व्यत्यय आणत नाही." असं म्हणत सत्यवीरने विषय बदलला.

नंदिनी देखील काही लागल्यास ती स्वयंपाकघरात आहे असं साश्रुनयनांनी सांगून निघून गेली. नंदिनी निघून गेल्यावर सत्यवीरने एकवार खालच्या सगळ्या खोल्यांकडे नजर फिरवली आणि त्याची नजर मालतीताईंच्या खोलीकडे गेली. मागच्या वेळी ती खोली पहिल्याने सत्यवीरला आता परत तिथे जाण्याची जास्त आवश्यकता वाटली नाही. त्यामुळे त्याच्या शेजारील आबांच्या खोलीकडे त्याने मोर्चा वळवला. पुढे जात दरवाजा उघडून सत्यवीरने आबांच्या खोलीत प्रवेश केला. आबांचा बेड व्यवस्थित लावलेला होता. आजूबाजूला जास्त समान नव्हतं. समोरच्या भिंतीवर एक खिडकी होती. ती सत्यवीरने जवळ जाऊन उघडली. खिडकीला गज नव्हतेच. बाहेर चांगलंच कडक ऊन पडलेलं होतं.

सत्यवीरने खिडकीच्या बाहेरच्या बाजूला जमिनीवर नजर फिरवली. आसपास खुरटी गवत आणि सदाफुलीची झाडं उगवलेली होती. जमिनीवर जास्त माती दिसत नव्हती. उलट जमीन जास्तच टणक दिसत होती. जरावेळ आसपास नजर फिरवून सत्यवीरने खिडकी लावून टाकली. आबांच्या खाटेच्या बाजूला एक कपाट होतं ते जवळ जाऊन सत्यवीरने उघडलं. आतमध्ये आबांचे ३-४ सदरे, पायजमे आणि काही चादरी सोडल्यास इतर काहीही गोष्टी न्हवत्या म्हणून सत्यवीरने कपाट लावून टाकलं. बेडच्या खाली पाहावं म्हणून सत्यवीर

जमिनीवर ओणवा झाला आणि बेडच्या खाली पाहू लागला बेडच्या आतमध्ये त्याला आबांच्या बुटाचा एक राखीव जोड दिसला. तो बूट त्याने बाहेर काढला. बूट तसा जुनाट वाटत होता आणि पुढच्या भागात चौड्याकडे तो जरासा घासला गेला होता. नेहमीच्या वापरात असावा अशी चिन्हं त्यावर होती. बूट परत तसाच ठेवून सत्यवीर मागे असलेल्या टेबलाकडे वळला.

खिडकीच्या बाजूला असलेल्या टेबलावर आबांच्या गोळ्या आणि औषधं होती. मागच्या वेळी आलो तेव्हा इथे पुस्तकं ठेवलेली होती असं त्याला आठवलं. त्या टेबलाच्या खाली एक बंद कप्पा होता. सत्यवीरने तो कप्पा उघडला तिथे आतमध्ये १०-१२ पुस्तकांचा ढीग रचलेला होता. आबांना पुस्तकं वाचायची आवड होती त्यामुळे एवढी पुस्तकं त्यांच्या खोलीत असणं साहजिक होतं. पुस्तके बाहेर काढून त्यांच्या शीर्षकावरून तो नजर फिरवू लागला. काही कथा कादंबऱ्या होत्या तर काही पुस्तकं हि प्रवासवर्णनांवर आधारित होती. डोंगर दऱ्यामधील भटकंती आणि जंगल प्रवासातील सुरस अनुभव यावर आधारलेली ती पुस्तकं होती. त्यातली काही पुस्तकं सत्यवीरने आपल्या हातात घेतली आणि ती घेऊन जाण्याचा विचार त्याने केला. पुस्तके कशी न्यावी असा विचार करत असतानाच त्याला टेबलाजवळ काही कापडी पिशव्या पडलेल्या दिसल्या. त्यातल्याच एका रिकाम्या पिशवीत त्याने ती पुस्तके टाकली आणि तो खोलीबाहेर आला. नंदिनी स्वयंपाक घरातच होती. तिच्या नजरेत न येता सत्यवीर हळूच वाड्याच्या दरवाजाजवळ आला आणि ती पुस्तकांची पिशवी गाडीच्या हँडलला लावली. ही पुस्तके त्याला गुपचूप न्यायची होती. पिशवी अडकवून तो परत वाड्याच्या आतमध्ये आला.

पण वाड्याच्या दरवाजातून आतमध्ये न जाता त्याने आता दरवाजाच्या डाव्या बाजूने आतुन कंपाउंडजवळून चालायला सुरुवात केली. डावीकडे कंपाऊंडची भिंत आणि उजवीकडे वाड्याच्या खोल्यांच्या भिंती यांच्या मधल्या भागातून तो हळुवार चालत होता. जमीनीच व्यवस्थित निरीक्षण करत कुठे काही सुगावा लागतोय का हे पाहतच तो चालला होता. पुढचा स्वयंपाकघरच्या बाहेरचा भाग ओलांडून तो वाड्याच्या डाव्या भागाकडे आला. हा भाग आबांच्या आणि मालतीताईंच्या खोलीबाहेरचा होता. चालत चालत तो मगाशी आबांच्या खोलीची खिडकी उघडी होती त्या खिडकी खाली आला. बारकाईने तो तिथल्या अजुबाजुच्या परिसराच निरीक्षण करून लागला.

खिडकी सत्यवीरच्या हाताला लागेल एवढ्याच उंचीवर होती. खिडकीच्या खाली भिंतीवर जरा व्यवस्थित पाहिल्यावर दिसलं कि तिथला भिंतीवरचा रंग काहीतरी घासल्यामुळे उडालेला होता. खिडकीच्या खाली जमिनीवर खाली उगवलेल्या खुरट्या गवतांच तो बारकाईने निरीक्षण करू लागला. तिथली जमीन हि टणक स्वरुपाची होती त्यामुळे तिथे कसल्याही खणल्याचा किंवा इतर खुणा न्हव्त्या. पण जमिनीपासून एका फुटावर भिंतीवर मातीचे डाग पडलेले होते ते पाहून सत्यवीर थोडासा विचारात पडला, नंतर आजूबाजूला ३-४ सदाफुलीच्या झाडांच्या गर्दीमध्ये त्याने हात टाकून तिथली जमीन पण व्यवस्थित तपासली. न जाणो तिथे काहीतरी असेल म्हणून, पण काहीच संशयास्पद आढळलं नाही. ओठावर ओठ दाबून तो काहीतरी विचार करत तो पुढे चालू लागला. आता सत्यवीर मालतीताईंच्या खोलीबाहेरील खिडकीजवळ आला तिथे आसपास जास्त झाडी नव्हती. नाही म्हणायला

वाळलेली खुरटी गवत होती. हि खिडकी सुद्धा हाताला येईल एवढ्या उंचीवर होती. पण खिडकीखालचा भिंतीवरचा रंग मात्र जसा आहे तसाच होता. तिथे कसल्याही खाणाखुणा न्हव्त्या. खालची जमीन सुद्धा टणक होती आणि कसल्याही खुणा न्हवत्या. सत्यवीरने खिशातून आपली डायरी बाहेर काढली आणि सगळ्या गोष्टींच्या पटापट नोंदी घेऊ लागला. तिथून पुढे चालत सत्यवीर आता वाड्याच्या मागील बाजूस आला.

वाड्याच्या मागील भागात २ मोठी प्राजक्ताची झाडे होती आणि एका कोपऱ्यात रहाट असलेली विहीर. वाड्याच्या मागून विहिरीपासून जवळच वाड्याच्या आतल्या भागात जाण्यासाठी एक चिंचोळा रस्ता होता त्याचं मार्गाने कमलाबाई त्या दिवशी विहिरीत रहाटाला लावलेली कळशी पडल्यावर दुसरी कळशी आणायला आत गेली होती. प्राजक्ताच्या झाडाखाली प्राजक्ताच्या फुलांचा सडा पडलेला होता. तिथे जाऊन सत्यवीरने पायानेच जमीन चापचून पहिली. आजूबाजूला झाडाचा पालापाचोळा सुद्धा बराच पडलेला होता. जवळ जाऊन पाने बाजूला करत त्याने तिथला भाग न्याहाळला. जमीन थोडीशी नरम आणि ओलसर होती. कदाचित वाड्यातील मंडळी पाण्याने इथे प्राजक्ताच्या झाडाच्या आसपास सडा मारत असावेत. मग तिथून तो पुढे समोरच्या विहिरीजवळ आला. विहिरीत त्याने डोकावून पाहिलं तर विहिरीला चांगलंच पाणी होतं तसच पाणी इतकं स्वच्छ दिसतं होतं कि विहिरीचा तळसुद्धा स्पष्ट दिसतं होता. सत्यवीरने विहिरीत डोकावून पहिले आणि जरा डोळे बारीक करून निरीक्षण केल्यावर तळाशी एक पितळेची कळशी दिसली. कमलाबाई आणि नंदिनी कपडे धुत असताना ती कळशी पडलेली हे कमलाबाईने सांगितल्याच

सत्यवीरला आठवलं. मालतीताईंच्या मृत्यू प्रकरणानंतर ती कळशी बाहेर काढायचं कोणाच्या लक्षात आलं नसेल. विहीर पाहून झाल्यानंतर सत्यवीर आता वाड्याच्या उजवीकडच्या भागात आला जिथे अडगळीच सामन ठेवायच्या खोल्या होत्या. पुढे आल्यावर गेस्टरूमची बाहेरची खिडकी होती. या भागात बरीच छोटी छोटी झुडुपे होती. सत्यवीर तिथल्या भिंतीच्या जवळची जमीन चापचू लागला.

तेवढ्यात.. गेस्ट रुमच्या खिडकीखालील जमीन न्याहाळताना त्याला एक छोट्या गवताच्या झुडुपात अडकलेलं सिगारेटचं थोटूक दिसलं. सत्यवीरने ते थोटूक हातात घेतलं आणि नाकाने जळालेल्या भागाचा वास घेतला. जळलेल्या त्या थोटकाच्या वासावरून एक गोष्ट त्याला समजली कि हि सिगारेट १-२ दिवस जुनी आहे कारण आतील तंबाखुचा दर्प तितका कडक वाटत नव्हता आणि थोटूक सुद्धा कमी सादाळलेलं होतं. कदाचित गेस्टरूममध्ये कोणीतरी आलेलं असावं ज्याने सिगारेट पिऊन थोटूक बाहेर फेकलं असेल असं वाटून त्याने त्याने थोटूक बाजूला फेकून दिलं. तिथून पुढची आसपासची जागा व्यवस्थित पाहत सत्यवीर वाड्याच्या पुढच्या भागाकडे आला. त्याने संपूर्ण वाड्याला प्रदक्षिणा मारली होती या उद्देशाने कि वाड्याच्या आसपास काहीतरी पुरावा आढळेल, कुठेतरी काहीतरी लपवलं असेल.

पण तसं काहीच आढळलं नाही. वाड्याच्या मुख्यदाराजवळ येऊन त्याने तिथली जमीन सुद्धा नीट पहिली पण संशयास्पद असं काहीच आढळलं नाही. काहीच हाताशी आला नव्हतं त्यामुळे सत्यवीर तिथेच विचारात उभा होता. नंतर त्याच्या लक्षात आलं कि नंदिनीने मगाशी सांगितलं होतं कि आशुतोष

वाड्यातच आहे आणि आता वाड्यात आलोच आहोत तर त्याचीपण भेट घ्यावी असं त्याला वाटलं. सत्यवीर खालच्या जिन्यावरून वरच्या मजल्यावर आला जिथे आशुतोषची खोली होती.

जिन्याच्या विरुद्ध बाजूला अविनाशच्या नर्सरीच्या सामान ठेवण्याच्या आणि अडगळीच्या खोल्या होत्या. ज्या त्याने आधीच पाहिलेल्या होत्या. जिन्याच्या पुढे अविनाश आणि नंदिनीची झोपायची खोली होती. तिथे एक धावता कटाक्ष टाकून मग पुढे असलेल्या आशुतोषच्या खोलीकडे जावं असा विचार करत त्याने अविनाश आणि नंदिनीच्या झोपायच्या खोलीची कडी उघडून आत प्रवेश केला. या दाम्पत्याची खोली छान सजवल्यासारखी दिसत होती. भिंतीवर विविध प्रकारची निसर्गचित्रांच्या पेंटीग्स, टेबलावर छानसा टेबलक्लॉथ आणि त्यावर फ्लावरपॉट. मध्यभागी मोठा बेड आणि त्याच्या बाजूला एक मोठं कपाट. सत्यवीरने कपाट आणि खोलीचे कोपरे व्यवस्थित चेक केले. काही विशेष सापडलं नाही. सगळं काही नॉर्मल दिसतं होतं. त्यामुळे तो त्या खोलीतून बाहेर पडला आणि दरवाजाला कडी लावून पुढे आला. अडगळीच समान ठेवलेली खोली ओलांडून तो आशुतोषच्या खोलीजवळ आला. दरवाजापुढे उभं राहून थोडं थांबून त्याने दारावर टकटक केली.

"वहिनी मला भूक नाहीये तुम्ही जेवून घ्या." आतून आशुतोषचा आवाज आला. नंदिनी जेवायला बोलवत असेल असं वाटून त्याने आतून आवाज दिला होता म्हणून थोडंसं थांबून सत्यवीर बोलला

"आशुतोष मी सत्यवीर.. दरवाजा उघडशील का..? तुझ्याशी थोडं बोलायचं होतं"

सत्यवीरने आवाज दिल्यावर आतून कसलाही प्रतिसाद आला नाही. थोड्या वेळाने सत्यवीरने परत हाक मारली.

"आशुतोष दरवाजा उघडशील का?"

काही क्षण शांततेत गेले आणि थोड्या वेळाने दरवाजा अर्धवट उघडला गेला. आतून चष्मा घातलेल आणि कपाळावर आठ्यांच जाळ असलेलं आशुतोषच डोकं दिसलं.

"काय हवंय तुम्हाला" आशुतोषने आतूनच तसाच अर्धवट दरवाजा ठेवून विचारलं.

"मला आत येऊ देशील का? तुझ्या आईच्या खुनासंदर्भातच तपास करायला मी आलोय. तेव्हा दरवाजा उघड आणि मला आत येऊ देत" सत्यवीर जरा कडक आवाजात म्हणाला. सत्यवीरचा तसा कडक स्वर ऐकून आशुतोष थोडासा टरकला आणि त्याने दरवाजा उघडून सत्यवीरला आतमध्ये घेतलं. आत आल्यासरशी सत्यवीरची नजर घारीसारखी सगळ्या रूमभर फिरू लागली. आशुतोषच्या खोलीत सामान बरेच होते आणि खोली अजगळासारखी अस्तव्यस्त होती.

कपड्याचे जोड जमिनीवर पडलेले, कॉलेजची सॅक कोपऱ्यात अर्धवट उघडी पडलेली, भिंतीवर कोणत्यातरी म्युसिकल बँडचे पोस्टर, एका कोपऱ्यात कागदांची रद्दी आणि त्यांना बांधायचा सुतळ्या, जवळच अभ्यासाला लागतात तसे प्रश्नसंचाचे गठ्ठे पडलेले होते. चहूकडे पाहत हाताची घडी मागे बांधून सत्यवीर पाहत होता.

"अरेरे.. काय रे तुझ्या खोलीची अवस्था कमलाबाई तुझी खोली झाडत नाही कि काय? आजूबाजूला पाहत सत्यवीर समोरच्या खिडकीजवळ आला.

"नाही.. तसं नाही काही.. मीच माझ्या रुममध्ये कोणाला येऊ देत नाही" आशुतोष मान खाली घालून खालच्या सुरात म्हनाला.

"ओह्ह... असं काय दडवुन ठेवलयस तू इथे कि कोणाला आतमध्ये येऊ देत नाहीस" सत्यवीर इकडे तिकडे पाहत बोलला.

"त..तसं काही नाही..मला एकट राहायला आवडत. फक्त कधी मधी मी दादा आणि वहिनींसोबत गप्पा मारत असतो ते पण खाली जाऊन" आशुतोष शांत स्वरात म्हणाला.

"दादा आणि वहिनींसोबत जास्त जमत वाटत तुझं.. असो सध्या काय करत असतोस तु.. म्हणजे काय शिकतोस? सत्यवीरने विचारलं.

"मी सध्या परदेशात शिकायला जाण्याची तयारी करतोय" आशुतोषने सावकाशपणे उत्तरं दिलं.

"हम्म...काय वाटत तुला आशुतोष. तुझ्या आईची अशी हत्या कोणी केली असेल" मुद्दाम त्याला राग येईल अशा भाषेत सत्यवीर म्हणाला.

"म..मला नाही माहित" खाली मान घालून बाजूच्या खुर्चीवर बसत कोऱ्या चेहऱ्याने आशुतोष म्हणाला.

आशुतोषच्या खोलीला एकच खिडकी होती. गज नसलेली ती खिडकी सत्यवीरने उघड्ली आणि तिथेच उभा राहिला.

"अच्छा.. तुझ्या दादा सोबत कशी वागायची तुझी आई. कारण अविनाश तुझा सावत्र भाऊ आहे ना" खिडकीच्या चौकटीवर हात ठेवून अगदीच स्पष्ट बोलत आणि नजरेच्या कोपऱ्यातून आशुतोषचे हावभाव पारखत सत्यवीर म्हणाला.

या वाक्यावर आशुतोषने जरा चळवळ केली. काहीही न बोलता हाताची बोट एकमेकांवर घासत तो जमिनीकडे पाहू लागला.

"त्रास द्यायची का तुझी आई अविनाशला" सत्यवीर अजूनच स्पष्ट बोलला.

"माझी आई खूप कडक स्वभावाची होती. सगळ्यांशीच ती कडकपणे वागायची." आशुतोषने सांगितलं.

"तुझ्यासोबत पण असंच कडकपणे वागायची का तुझी आई" सत्यवीर थोडंसं पुढे झुकत म्हणाला.

"नाही.. तितकं नाही" आशुतोष चाचरत म्हणाला आणि त्याने आपली नजर दुसरीकडे वळवली.

यापुढे सत्यवीरने आशुतोषला काही प्रश्न विचारले नाही. खोलीमधल्या कपाटाजवळ जात सत्यवीरने कपाटाचा दरवाजा उघडला. आतमधले कपडे खोलीमधल्या कपड्यासारखेच असत्याव्यस्त पडलेले होते. २-३ कप्पे होते आणि काही बॉक्सेस होते. ज्यात औषधं आणि बँडेज होतं. कपाटाच्या तळातल्या कप्प्यात सत्यवीरला एक दोरखंड दिसला. त्याला मधेच गाठीगाठी बांधलेल्या होत्या. सत्यवीरने काहीही न बोलता उभा राहुनच तो दोरखंड

न्याहाळला. दोरखंड थोडासा जाड असून लांब होता. आतील कपडे इकडे तिकडे करत सत्यवीरने तो दोरखंड नीट न्याहाळला पण आशुतोषला याबद्दल काही विचारलं नाही. आशुतोष सत्यवीरच्या हालचाली बघत तसाच खुर्चीवर कपाळावर आठ्या पाडून बसला होता. सत्यवीरने आपल्या डायरीत काही नोंदी घेतल्या आणि कपाटाच दार लावून खोलीच्या खिडकीजवळ आला. त्याने खिडकीच्या बाहेर वरून खाली पाहिलं. खिडकी खालच्या जमीनीपासून बऱ्यापैकी उंचावर होती. खिडकीच्या चौकटी न्याहाळत सत्यवीरने थोडंस बाहेरच्या बाजूला झुकत बाहेरच्या भिंतींवर नजर टाकली. खिडकीच्या बाहेरच्या बाजूला भिंतीच्या एका भागावर काळसर डाग पडलेले त्याला दिसले.

सत्यवीरने आपलं डोकं अजून थोडसं बाहेर काढलं आणि ते डाग बघण्याचा प्रयत्न करू लागला अर्थात हे आशुतोषच्या लक्षात न येता. कशाचे काळसर डाग असावेत ते असं वाटून सत्यवीरने पुढे झुकत जरा बारकाईने पाहिल्यावर अचानक सत्यवीरची ट्यूब पेटली.

“ओहो.. असं आहे तर... ते काळसर डाग कशाचे असावेत याचा अंदाज सत्यवीरला आला होता.

काळी आकृती

"हे सिगरेट विझवल्याचे डाग आहेत तर..." खिडकीबाहेरच्या त्या काळसर डागांकडे पाहत सत्यवीर मनातल्या मनात म्हणाला.

कदाचित आशुतोषला सिगरेटचे व्यसन असावे आणि त्यानेच खोलीत सिगरेट पिऊन खिडकीच्या बाहेरच्या भिंतीवर सिगरेट पिऊन विझवली असेल. सत्यवीर स्वतः सिगारेट पीत असल्याने त्यानेदेखील अशाप्रकारे भिंतीवर कित्येकवेळा सिगरेट विझवली होती. त्यामुळे ते डाग कसले असतील हे सत्यवीरच्या लक्षात आले. मगाशी वाड्याच्या खालील भागात जमिनीची तपासणी करताना जे सिगरेटचे थोटूक सापडलं होतं ते आशुतोषनेच वरून खाली टाकलेलं असावं. पहिल्यांदा सत्यवीरला वाटलं होतं कि गेस्टरूममध्ये कोणीतरी सिगरेट पिली असेल आणि सिगरेट विझवून थोटूक बाहेर फेकलं असेल. गेस्टरूमच्या अगदी वरच आशुतोषची रूम होती. आशुतोषच्या खिडकीबाहेरील काळसर डागांवरून त्यानेच सिगारेट विझवून राहिलेले थोटूक बाहेर फेकले असल्याचं स्पष्ट होत होतं.

हळुवारपणे खिडकी लावून सत्यवीरने आशुतोषकडे पाहिलं. आशुतोष अजूनही कपाळावर आठ्यांच जाळ ठेवून बसला होता. चेहऱ्यावर कंटाळवाणे भाव आणल्याच नाटक करत आणि आपणास काहीही मिळालं नाही अशा

अविर्भावात सत्यवीर दरवाजाजवळ आला. अजून काही बघण्यासारखे उरलेले नसल्याने सत्यवीर आशुतोषच्या रूममधून बाहेर पडला आणि जिना उतरून खालच्या भागात आला. वाड्यात अजूनही कोणीच आलेलं नव्हतं. नंदिनी स्वयंपाकघरात भांडी घासत असल्याचं बाहेरून दिसलं. स्वयंपाकघराजवळ सत्यवीरने नंदिनीला सांगितलं कि मी आता निघतोय. नंदिनीने परत एकदा चहा घेण्याविषयी सुचवलं पण त्या आग्रहाला नम्रपणे नकार देऊन सत्यवीर वाड्याबाहेर आला. आपल्या दुचाकीजवळ जात तो विचार करू लागला.

देशमुखांशी सकाळी बोलल्याप्रमाणे वाड्याच्या परिसरात खुनाच हत्यार पुरून ठेवल्याच्या खुणा दिसल्या न्हवत्या. पण काही गोष्टी नक्कीच लक्षात घेण्याजोग्या होत्या.

वाड्याच्या डावीकडचा भाग जिथे आबांच्या आणि मालतीताईंच्या खोलीबाहेरील खिडकी होती. तिथे त्या खिडकीमार्गे कोणीही हळूच आतमध्ये जाऊ शकत होतं कारण खिडकीला गज नव्हतेच. न जाणो खुन्याने त्याचं मार्गाने आत जाऊन मालतीबाईवर हल्ला केला असेल. पण तसं असेल तर मालतीताईंनी आरडाओरडा का नाही केला? खून करणारी व्यक्ती मालतीताईंच्या जवळची ओळखीची होती का? मालतीताईंशी बोलताबोलता खिडकीतून त्या व्यक्तीने काहीतरी टोचवलं असेल आणि मागच्या मागे पलायन करून मुख्यदरवाजातून हळूच कोणाला चाहूल न लागता निसटली असेल. वाड्याच दार असंही रात्र होइपर्यंत उघडंच असायचं. तिथूनच एकमेव रस्ता आहे जिथून पलायन करता येईल. आजूबाजूला राहणाऱ्या लोकांनी नक्की त्या व्यक्तीला गुपचुप पळून जाताना पाहिलं असेल. तसं असल्यास आजूबाजूला

काही अंतरावर असणाऱ्या घरामध्ये चौकशी करण गरजेचं आहे न जाणो काहीतरी धागा मिळेल आणि खुन्याच्या जवळ जाण्यास उपयुक्त माहिती मिळेल.

अजून एक गोष्ट सत्यवीरला खात होती ती आशुतोषच्या खोलीत त्याच्या कपाटाच्या खालच्या भागात कपड्यांमध्ये ठेवलेला दोरखंड ज्याला मधेच गाठी मारलेल्या होत्या. कशाकरिता तो दोरखंड त्याने कपाटात ठेवलेला असेल आणि तो लपवण्याची कोणतीही तसदी त्याने घेतलेली नव्हती. पण तूर्तास त्या दोरखंडाचा विचार बाजूला ठेवून सत्यवीरने आसपासच्या घरांमध्ये चौकशी करण्याचं ठरवलं ज्यामुळे खुन्याविषयी काही धागादोरा हाती लागेल.

सत्यवीरने दुचाकी चालू केली देसाई वाड्याच्या बाजूला काही अंतरावर जे कोणी लोकं राहत होते तिथे जाऊन लोकांकडे जाऊन त्यांनी खून झालेल्या दिवशी काही पाहिलं का याची चौकशी चालू केली. आसपास राहणारे लोक आपल्या कामाशी काम ठेवणारे होते काही घरे हि वयोवृद्ध जोडप्यांची होती ज्यांची दृष्टी वयोमानानुसार अंधुक झालेली होती त्यामुळे खून झाला त्या दिवशी आसपास कोणाला संशयास्पद हालचाली जाणवल्या नाहीत कि कोणी व्यक्ती दिसली नाही. आपल्या म्हातारपणाचे दिवस घालवत ती लोकं आरामात राहत होती. तिथल्या आसपासच्या सगळ्या भागातल्या घरांमध्ये जाऊन त्याने चौकशी केली या सगळ्यात संध्याकाळ उलटून गेली आणि रात्र पडू लागली. आसपासच्या सगळ्या लोकांकडे चौकशी करून झाल्यामुळे आणी हाती काहीही न लागल्याने सत्यवीरने परतीचा रस्ता धरला. दुचाकीवरून परतत असताना काही ठिकाणी थांबून त्याने आसपासच्या दुकानांमध्ये सुद्धा

विचारपूस केली पण कोणाला काहीच सांगता आले नाही. आता चांगलाच अंधार पडला होता. रस्त्यावर जास्त वर्दळ नव्हती.

दुचाकीवरून पुढे आल्यावर अचानक सत्यवीरला आठवलं कि इथेच जवळ डॉक्टर पाटील याचं घर आहे. एकदा घरी जाऊन त्यांच्याशी बोलावं असं त्याला वाटलं. त्यामुळे थोडं पुढे जाऊन सत्यवीरने डॉक्टर पाटलांच्या घराजवळ आपली दुचाकी थांबवली. आसपास अंधार पसरला होता आणि रस्त्यावरचे दिवे खराब असल्यामुळे लागलेले नव्हते. डॉक्टर पाटलांच घर हे एक बैठे घर होतं. त्या बैठ्या घराला चीटकुनच बाजूला पाटील डॉक्टरांचा दवाखाना होता. सत्यवीर दुचाकीवरून खाली उतरला. पाटलांच्या घरातले दिवे बंद होते फक्त मागच्या खोलीत एक दिवा लागलेला दिसत होता. सत्यवीर चालत चालत पाटलांच्या मुख्य दरवाजाजवळ आला.

सत्यवीरने दारावर टकटक केली. आतून काहीच प्रतिसाद आला नाही. सत्यवीर थोडावेळ शांत उभा राहिला आणि आतमधला कानोसा घेऊ लागला पण त्याला कसलाही आवाज ऐकू आला नाही. आजूबाजूला चांगलाच अंधार पडलेला होता रातकिड्यांची किरकिर ऐकू येत होती. सत्यवीरने परत एकदा जोरात दारावर टकटक केलं. थोड्या वेळाने.. कोण आहे...? असा डॉक्टरांचा कातर आवाज आला.

"डॉक्टर, मी गुप्तहेर सत्यवीर.. दरवाजा उघडा" सत्यवीरने उत्तरं दिलं. त्यावर आतून कसलाही प्रतिसाद आला नाही. सत्यवीरला जरा आश्चर्य वाटलं कि डॉक्टर पाटील दरवाजा उघडायला वेळ का लावत आहेत. सत्यवीर तसाच

उभा राहिला. काही वेळाने आतून डॉक्टर पाटलांनी दरवाजा अर्धवट उघडत बाहेर डोकावून पाहिलं. त्यांच्या कपाळावर घामाचे बिंदु जमा झालेले होते.

"अ..गुप्तहेर.. स..सत्यवीर.. एवढ्या रात्री इथे" एवढचं कसबस ते बोलले.

त्यांच्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकत सत्यवीर म्हणाला "हो गुप्तहेर आहे म्हणूनच एवढ्या रात्री आलोय" त्याच्या या वाक्यावर डॉक्टर पाटलांनी काहीही न बोलता आवंढा गिळला.

"आता मला आतमध्ये येऊ देणार आहात कि इथे उभ राहूनच बोलणार आहात" सत्यवीर शक्य तितकं शांत आवाज ठेवून म्हणाला.

"अ..क..काय.. डॉक्टर पाटील सत्यवीरच म्हणण काहीच न समजल्यासारख बोलले. पाटलांच्या अशा वागण्यावर मात्र सत्यवीर संतापला आणि त्याने हातानेच दरवाजावर जोर देऊन पाटलांना बऱ्यापैकी ढकलतच दरवाजा उघडुन घरात प्रवेश केला.

"अहो.. अहो.. क..काय करताय असं का आतमध्ये घुसताय" पाटील डॉक्टर पडता पडता स्वतःला सावरत म्हणाले आणि दरवाजापासून जरा दूर फेकले गेले. पण त्यांच्या या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत सत्यवीरने आतमध्ये प्रवेश मिळवला आणि घराच्या आतल्या भागाचं निरीक्षण करू लागला. हॉलमध्ये सत्यवीर उभा होता. तिथे बसायला सोफा, टेबल, खुर्च्या असं सगळं साहित्य होतं. डाव्या भिंतीजवळ एक छोटंसं शेल्फ होतं ज्याला काचेचं दार होतं. त्यामध्ये वर्तमानपत्र आणि काही वैद्यकीय क्षेत्रातील मासिकं होती. डॉक्टर

पाटलांच्या घराकडे पाहून ते एक सधन व्यक्ती असल्याचं जाणवत होतं आणि तसंही डॉक्टर असल्याकारणाने तेवढी सुबत्ता असणं साहजिकच होतं.

"दार उघडायला एवढा उशीर का केलात डॉक्टर." आजूबाजूला निरीक्षण करणारी आपली नजर न हटवता सत्यवीरने पाटलांना प्रश्न केला.

"ते...मी.. झोपलो होतो...." पाटील थोडंस चाचरत म्हणाले. त्यांची मान खाली होती आणी सत्यवीरकडे पाहण्याचं धाडस देखील त्यांना होतं नव्हतं.

"अच्छा.. घरात तुम्ही एकटेच राहता वाटत" सत्यवीर जवळच्या शेल्फ जवळ जात म्हणाला.

"अ..हो.. मी एकटाच राहतो" पाटील उत्तरले. अजूनही त्यांच्या आवाजात म्हणावा तसा जोर नव्हता.

"लग्न केलं नाहीये तुम्ही... म्हणजे वय पाहता तुम्हाला एव्हाना मुलं असायला हवी होती" असं विचारत सत्यवीरने काचेच शेल्फच दार हळूच सरकवल आणि आतील मासिक बाहेर काढून एका पाठोपाठ एक मासिक चाळू लागला.

"नाही.. लग्नासाठी कधी वेळच नाही मिळाला आणि तसही मला एकट राहायला आवडत" पाटील सत्यवीर काय पाहतोय तिकडे पाहत म्हणाले. सत्यवीर त्याच्या हातातली एक एक मासिक चाळत होता. त्यातील एक मासिक त्याने व्यवस्थित आतमध्ये उघडून पहिले. नामांकित डॉक्टर लोकांचे विविध विषयावरचे लेख आणि प्रबंध त्यामध्ये होते. त्यातले काही प्रबंध आणि लेखांवर सत्यवीरने सहज नजर फिरवली.

"अरे वाह.. खूपच छान माहिती आहे हि" सत्यवीरने मुद्दाम वातावरण हलक करण्याचा प्रयत्न केला.

"हो.. माझ्या कामासाठी महत्वाचे आहे ते... पण मला एक सांगा एवढ्या रात्री तुम्ही मला भेटायला कशासाठी आलात" असं म्हणत पाटील सत्यवीरच्या चेहऱ्याकडे उतावळ्या नजरेने पाहू लागले.

"असंच.. सहज वाटलं तुम्हला भेटावं.. तुमचं घर पाहिलं नाही न कधी" हातातली मासिकं बाजूला ठेवत सत्यवीर पाटलांकडे रोखत म्हणाला. सत्यवीरच्या नजरेला नजर देण्याचं धाडस पाटलांमध्ये नव्हतं.

बाजूला वळत सोफ्याजवळ जात डॉक्टर पाटील म्हणाले "म्हणजे काही विशेष कारण आहे का.. खुन्यासंदर्भात काही धागादोरा हाती लागलाय का तुमच्या?"

"तूर्तास तरी काही नाही. काही कळत नाहीये हो डॉक्टर... कसं शोधावं आणि कुठे शोधावं. तो वाडा एकतर एवढ्या लांब. आसपास कोणी काही पाहिलं असल्याचं सांगत नाही कि कसला सुगावा नाही" मुद्दाम त्रागा करत सत्यवीर वैताग आल्यासारखी अक्टिंग करत म्हणाला.

"ओह्ह.." एवढ बोलून पाटील जमिनीकडे पाहत म्हणाले.

"मला पाणी द्याल का?" सत्यवीरने डॉक्टर पाटील यांना विचारलं.

"अ..हो.. आत्ता आणतो" असं म्हणत डॉक्टर पाटील आतमध्ये स्वयंपाक घरात वळले.

सत्यवीर सोफ्याजवळच्या टेबलाजवळ असणाऱ्या खुर्चीत येऊन बसला. जरा मागे टेकून बसणार तेवढ्यात त्याला टेबलाच्या पृष्ठभागावर पाण्याचं एक वर्तुळ दिसलं. जणू काही कोणीतरी ग्लास ठेवला असावा. ते पाण्याचं वर्तुळ एकदम ताज असल्यासारखं होतं. त्या पाण्याच्या वर्तुळाला बोटाने स्पर्श करत सत्यवीरने ते नक्कीच पाणी आहे कि आणखी कोणता द्रव पदार्थ हे पाहण्यासाठी त्याचा नाकाने वास घेतला. पण ते पाणीच होतं. कोणासाठी पाणी ठेवलं असेल इथे. कि स्वतःच पाटील डॉक्टरांनी पाणी पिऊन ग्लास इथे ठेवला असेल. पण पाटील तर म्हणाले कि मी झोपलो होतो म्हणून म्हणजे मग ते मागे बेडरूममध्ये असतील. मग इथे पाण्यचा ग्लास कोणी ठेवला असेल? सत्यवीर विचार करतच होता तेवढ्यात पाटील हातात काचेचा पाण्याचा ग्लास घेऊन आले. त्यांच्या हातातून पाण्याचा ग्लास घेऊन सत्यवीरने थोडसं पाणी पिलं आणि टेबलावर तो ग्लास ठेवून दिला. पाटील समोर हात बांधून उभे होते.

"तुमचं घर तसं बरंच मोठं आहे पाटील" सत्यवीर म्हणाला.

"हो, खूप आधी बांधलं होतं आणि माझं क्लिनिक सुद्धा बाजूला असल्याने जवळच घर असलेलं बऱ पडते." पाटील हातांचा चाळा करत उत्तरले.

"क्लिनिक घराला लागुनच आहे का तुमचं? तिथे जाण्यासाठी दरवाजा घरातूनच आहे का? सत्यवीरने विचारलं.

"नाही.. क्लिनिकमध्ये येण्यासाठी पेशंट लोकांसाठी दुसरा दरवाजा आहे बाहेरचा... एक दरवाजा घरात आहे जो क्लिनिकमध्ये जातो. तो मी वापरतो" पाटलांनी माहिती दिली आणि खाली पाहू लागले.

आपण घरात आल्यापासून पाटील डॉक्टर असं विचित्र वर्तन करत असल्याचं पाहून सत्यवीरचा त्यांच्यावरचा संशय नक्कीच बळावला होता. पण आपल्या चेहऱ्यावर तसं न दाखवता सत्यवीर शांतपणे बसून होता. टेबलावर त्याने मगाशी अर्धा पिऊन ठेवलेला ग्लास परत उचलला आणि राहिलेलं पाणी पिऊन टाकलं. टेबलावर त्याच्या ग्लास ठेवण्यामुळे टेबलावर अगदी तसचं ठळक पाण्याचं वर्तुळ तयार झालेलं होतं. जसं त्याने थोड्या वेळापूर्वी टेबलावर दुसऱ्या बाजूला पाहिलं होतं. ते पाहून त्याच्या चेहऱ्यावर हलकंच स्मित झळकलं.

"खरतरं तुमचं सगळं घर पाहण्याचा विचार आहे." सत्यवीर खुर्चीवर उठत म्हणाला.

"आत्ता.. एवढ्या रात्री... सकाळी या न.. सकाळी पहा...." कपाळावरचा घाम पुसत पाटील अजीजीने म्हणाले.

"आत्ता काय अडचण आहे" सत्यवीरला माहित होतंच कि पाटील नकार देणार तरी नकली आश्चर्य व्यक्त करत त्याने विचारलं.

"आत्ता मला झोपं लागलीय आणि उद्या मला लवकर उठायचय. पेशंट येणारेत उद्या बरेच" पाटील आळस देण्याचं नाटक करत म्हणाले.

त्यांची हि नाटकं पाहता पाहता सत्यवीरच्या एक गोष्ट मात्र लक्षात आलेली होती. डॉक्टर पाटील नक्कीच काहीतरी लपवत आहेत. पाटलांना नक्कीच कोणीतरी भेटायला येणार आहे असं दिसतंय किंवा कोणीतरी पाटील डॉक्टर यांना नुकतंच भेटून गेलंय. त्यामुळेच पाटलांनी त्या व्यक्तीला पाण्याचा ग्लास

देऊ केला असेल त्या व्यक्तीने पाणी पिऊन ग्लास टेबलावर ठेवल्याने पाण्याच्या ग्लासच्या खुणा उमटल्या होत्या. सत्यवीर शांतपणे आपल्या हनुवटीवर बोट ठेवून काहीतरी विचार केला आणि थोड्या वेळात तो म्हणाला "ठीक आहे डॉक्टर आता उशीर झालाय नंतर कधीतरी येईन भेटायला" असं म्हणून तो झटकन दरवाजाजवळ जाऊ लागला. पाटील लगोलग त्याच्या पाठोपाठ आले. बाहेर पडून सत्यवीरने पाटलांना निरोप दिला तेव्हा पाटील दरवाजातच उभे होते आणि सत्यवीर कधी एकदा जातोय याची वाट पाहत दरवाजा लावण्याच्या तयारीत होते.

सत्यवीर आपल्या दुचाकीजवळ जात मिश्कील हसत होता. बाहेर खूपच अंधार पडलेला होता. रातकिड्यांची किरकिर पण खूप वाढलेली होती. सत्यवीरने दुचाकी चालू केली आणि पाटलांच्या घराकडे नजर टाकली. तेव्हा पाटलांनी नुकतंच दार लावून घेतलेलं त्याला दिसलं. गाडी चालू करून सत्यवीरने थोडी पुढे आणली आणि एका गल्लीच्या पुढे आडोशाला उभी केली. सत्यवीरला दाट संशय होता कि डॉक्टर पाटील हे काहीतरी लपवतायत त्यामुळे घरातून बाहेर पडून थोडं पुढे येऊन सत्यवीरने दुचाकी आडोशाला लावली होती आणि परत पायी डॉक्टर पाटलांच्या घराकडे पाळत ठेवायला चालला होता. पाटील यांना भेटायला नक्कीच कोणीतरी आलेले असावे असं त्याला वाटून गेलं. त्यामुळेच त्यांच्या घरावर पाळत ठेवावी असं त्याला वाटून गेलं. थोड्या वेळातच पाटील डॉक्टरांच्या घरासमोर एका बंद दुकानाच्या बाजूंला असलेल्या झाडींमध्ये सत्यवीर उभा राहिला. इथून डॉक्टर पाटलांच घर आणि बाजूचं क्लिनिक स्पष्ट दिसतं होतं. डॉक्टर पाटलांच्या घरात त्याने सहजच

भेट दिलेली होती तेव्हा त्याला माहित नव्हतं कि कोणीतरी आधीच डॉक्टर पाटलांना भेटायला आलेलं आहे. त्यामुळेच डॉक्टर पाटलांनी लवकर दरवाजा उघडला नाही कारण जी कोणी व्यक्ती आत आलेली होती त्या व्यक्तीला आतमध्ये लपवायला त्यांना वेळ लागला.

डॉक्टर पाटलांचा घाबरा झालेला चेहरा आणि सत्यवीर आल्यामुळे उडालेली त्यांची तारांबळ, टेबलावरच्या पाण्याच्या ग्लासच्या ताजा खुणा. जे पाणी पाटलांनी भेटायला आलेल्या व्यक्तीला दिलं असेल त्यामुळे सत्यवीरचा डॉक्टर पाटलांवर संशय जास्तच दृढ झाला. आपला संशय खरा आहे कि नाही हे बघण्यासाठीच झाडीमध्ये आपल्याला व्यवस्थित लपवून सत्यवीर डोळे उघडे ठेवून पाटलांच्या घराकडे नजर देऊन उभा होता.

सत्यवीर पाटलांच्या घरातून निघून जाताच काही वेळाने ती व्यक्ती बाहेर पडेल कारण लगेचच बाहेर जाण्याचा धोका ती व्यक्ती घेणार नाही थोडी जास्त काळोखी रात्र होण्याची वाट पाहिलं असा सत्यवीरचा कयास होता. हाताची घडी घालून सत्यवीर पाटलांच्या घराकडे पापणी सुद्धा न लवता पाहत होता. कारण ती व्यक्ती कोण आहे हे कळणे खूप गरजेचे होते. अशा प्रकारे गुपचूप येऊन पाटलांना भेटायचे कारण काय असावे? मुख्य म्हणजे मालतीताईंच्या खुनाशी त्या व्यक्तीचा काही संबंध असावा का? या सारख्या प्रश्नाची उत्तरं देखील त्याला मिळणार होती. रात्र अजूनच गडद झालेली होती. रस्त्यावर चिटपाखरूदेखील नव्हतं. रातकिड्यांची किरकिर जास्तच वाढलेली होती. दूरवर काही कुत्री जोरजोरात भुंकत होती. डॉक्टर पाटलांच्या घराजवळ अंधार असल्याने जास्त स्पष्ट दिसत नव्हते त्यामुळे घराजवळ जाऊन तिथे उभं

राहिल्याने स्पष्ट दिसणार होतं. पण पाटलांच्या घराजवळ लपून पाहता येईल अशी आडोशाची जागा अथवा झाडी नव्हती. तसही लांबून पाटलांचं घर आणि क्लिनिक यांची दोन्ही प्रवेशद्वार इथून दिसतं होती. त्यामुळे इथूनच पाहण्याचा निर्णय सत्यवीरने घेतला होता. वाट पाहता पाहता जवळपास अर्ध्या तासाचा काळ लोटला. अजूनही त्या व्यक्तीचा काही पत्ता नव्हता. खरंच ती व्यक्ती आत असेल ना? कि आपला तर्क चुकला आहे असे विचार सत्यवीरच्या मनात घोळू लागले. हातावर हात चोळत सत्यवीर उभा होता.

एवढ्यात.. त्याची नजर समोर डॉक्टर पाटलांच्या क्लिनिकच्या दरवाजावर गेली. दरवाजातून एक व्यक्ती हळूच बाहेर पडलेली सत्यवीरने पहिली. तसं सत्यवीर जरासा खाली वाकला म्हणजे आपला तर्क बरोबर होता तर. इतका वेळ ती व्यक्ती पाटलांच्या घरातच क्लिनिकमध्ये लपून बसलेली असावी सत्यवीरला वाटून गेलं. सत्यवीर झाडीमध्ये लपून श्वास रोखून पाहू लागला. क्लिनिकचा दरवाजा बंद झाला. त्या व्यक्तीने आपल्या अंगाभोवती भोवती मोठी चादर किंवा शाल लपेटलेली होती त्यामुळे त्या व्यक्तीचा चेहरा स्पष्ट दिसतं नव्हता आणि लांबून ती व्यक्ती कोण असावी याबाबत अंदाज देखील येत नव्हता. क्लिनिकचा दरवाजा बंद झाल्याक्षणी झटक्यात त्या व्यक्तीने क्लिनिकच्या बाजूने वळून पाटलांच्या घराला वळसा घातला आणि घरच्या मागच्या बाजूला गेली जिथे काळोख होता. ती व्यक्ती तिकडे वळल्याक्षणी सत्यवीर चपळाईने पण सावधगिरीने झाडीतून बाहेर आला आणि आडमार्गाने त्या व्यक्तीच्या मागे झपाट्याने जाऊ लागला. इकडे तिकडे पाहत झपाझप पावले टाकत ती व्यक्ती पाटलांच्या घरामागे जाऊन मागच्या रस्त्याने अंधाऱ्या

गल्लीतून जाऊ लागली. सत्यवीर देखील हळूहळू त्या व्यक्तीचा माग घेत पाठलाग करत पुढे जाऊ लागला. आजूबाजूला पूर्ण शांतता होती. पुढे जाऊन एका मोक्याच्या क्षणी झडप घालून त्या व्यक्तीला पकडायचा डाव सत्यवीरने आखला.

गल्ली संपून आडमार्गाने जाणाऱ्या रस्त्यावर ती व्यक्ती आली. तो रस्ता त्या व्यक्तीचा सवयीचा असल्याप्रमाणे ती व्यक्ती झपाझप पावले टाकत पुढे जात होती. सत्यवीर मात्र दगडधोंड्यांवर आदळत आडमार्गावरील काटेरी झुडूपांमध्ये अडकत कसाबसा वेग राखून चालला होता. पटकन धावत पुढे जाऊन त्या व्यक्तीला जमिनीवर आडवे पडायचा विचार सत्यवीरने केला आणि त्या नादातच घात झाला. वेगात पाठलाग करण्याच्या नादात एका काटेरी झाडीमध्ये सत्यवीरची पँट अडकली. काटेरी झाडांनी त्याची पँट ओढली गेली आणि त्याचा तोल गेला. तोल जाऊन सत्यवीर बाजूला एका दगडांच्या राशीवर जाऊन पडणारच होता पण तरी सावध असल्याने दगड चुकवत दोन्ही हात दगडांच्या राशीवर टेकवत हुलकावणी देऊन बाजूला रस्त्याच्या एका उतरंडीला जाऊन पाठीवर आडवा पडला. दगडांवर आपटून होणारा कपाळमोक्ष सत्यवीरने चुकवला होता पण त्या नादात दगडांची राशी कलंडली आणी त्यावरचे दोन गोलाकार दगड रस्त्याच्या उताराकडे गडगडत गेले. त्याचा आवाज झाला आणि पुढे जाणाऱ्या त्या गूढ व्यक्तीला तो आवाज आला. त्या व्यक्तीने मागे वळून पहिले तर दोन दगड रस्त्यावर गडगडत चाललेले दिसले. सत्यवीर रस्त्याच्या बाजूला उताराला जिथे थोडीफार झाडी होती तिथे आडवा पडल्याने आणि अंधार असल्यामुळे त्या व्यक्तीचा नजरेस काही दिसला नाही.

पण कोणीतरी आजूबाजूला असणार या भीतीने त्या गूढ व्यक्तीने पळत जाण्यास सुरुवात केली. सत्यवीरची पाठ चांगलीच शेकली होती. त्याला पटकन उठता येईना. थोड्यावेळाने कसबस उठत कपडे झटकत त्याने आजूबाजूला पहिले. ती व्यक्ती अंधाराचा फायदा घेऊन पसार झालेली होती.

"शीट.. हातचं सावज असं निसटून गेल्याने त्याला प्रचंड राग आला होता." हाताने पाठ चोळत सामोर पहिले. पुढे दूरवर २-३ लुकलुकते दिवे घरे असलेली त्याला दिसली. त्या भागाकडेच ती व्यक्ती गेल्याचं त्याच्या ध्यानात आलं. लुकलुकणारे ते दिवे हे देसाई वाडा आणि त्याच्या पुढची काही घरे इथले दिसत होते. आता परत पाठलाग करण्यात किंवा पुढे जाण्यात काही अर्थच उरलेला नव्हता. त्यामुळे आपली दुखरी पाठ चोळतच सत्यवीर आपल्या दुचाकी लावलेल्या जागेकडे जाण्यासाठी वळला.

हॉस्पिटलला भेट

हॉस्पिटलमध्ये स्पिरिटचा आणि औषधांचा वास जास्तच दरवळत होता. नर्सेसची येण्याजाण्याची लगबग चालू होती. त्या त्या स्पेश्यालीटीचे डॉक्टर्स आपापल्या केबिनमध्ये आलेले होते आणि नंबरनुसार पेशंट्सना तपासत होते. अशाच एका केबिन बाहेर सत्यवीर आपला नंबर येण्याची वाट पाहत बाकावर बसला होता. त्याच्या आजूबाजूला जास्त पेशंट्स नव्हते कारण डॉक्टरांची तपासायची वेळ अजून सुरु झालेली नव्हती. डॉक्टर येण्याची वेळ पाहूनच सत्यवीरने तातडीने दिवसाची पहिली अपॉइंटमेंट घेतली होती. डॉक्टरांनी अजून पेशंट तपासायला सुरुवात केली नव्हती त्यामुळे सत्यवीरला पटकन आत जाऊन डॉक्टरांची भेट घेता येणार होती.

एवढ्यात केबिन मधून एक गलेलठ्ठ बाई डोळ्यावरचा चष्मा सावरत बाहेर आली आणि तिने आवाज दिला.

"मिस्टर सत्यवीर कोण आहेत." असं म्हणत बाकावरच्या २-३ लोकांकडे शोधक नजरेने पाहू लागली.

"मीच आहे सत्यवीर" जागेवरून उठत सत्यवीर म्हणाला.

"डॉक्टरांनी बोलावलंय.. आतमधे या.." असं म्हणत ती तिच्या बसण्याच्या जागेकडे वळली.

सत्यवीर पुढे होत डॉक्टरांच्या केबिनजवळ आला. केबिनच्या दारावर ठळक अक्षरात पाटी होती.

"डॉ. सचित पटवर्धन, न्युरोलॉजी तज्ञ. सत्यवीरने केबिनच्या दारावर टकटक केली. तसा आतून आवाज आला "प्लीज कम इनसाईड"

सत्यवीर आतमध्ये गेला. एका मोठ्या टेबलाच्या समोर मोठ्या खुर्चीत डॉक्टर सचित पटवर्धन एकटेच हलकंसं स्मित करत बसले होते. बाजूलाच पेशंटला तपासायचा बेड होता. मागच्या शेल्फमध्ये काही औषधांचे बॉक्सेस आणि सलाईनच्या बाटल्या होत्या. बाजूलाच कसलीतरी हेल्मेटसारखी मशीन होती.

"हेल्लो डॉक्टर सर्वप्रथम धन्यवाद मला तातडीने वेळ दिल्याबद्दल" सत्यवीर पुढे झुकत हात जोडत म्हणाला.

"अहो सत्यवीर धन्यवाद कसले. आम्ही जशी समाजाची सेवा करतो. तशीच तुम्ही सुद्धा समाजाची सेवा करता. तुम्हाला वेळ द्यावाच लागला.. या या बसा.." डॉ. सचित समोरच्या खुर्चीत निर्देश करत हसत म्हणाले.

डॉक्टर सचित यांच्या नम्र वागण्याने सत्यवीरला खूप बरं वाटलं. डॉक्टर सचित पटवर्धन यांना सत्यवीरबद्दल माहिती होती. तो सध्या देसाई खून प्रकरण हाताळतोय आणि त्यानिमित्तच त्याला आपली भेट हवी असं त्यांचं सत्यवीरसोबत फोनवर बोलण झालेलं होतं.

"तुमचा जास्त वेळ न घेता मी मुद्द्यालाच हात घालतो. म्हणजे तुम्ही पण तुमचे पेशंट्स पाहायला मोकळे आणि मी पण माझी कामं करायला मोकळा" सत्यवीर म्हणाला.

"शुअर, गो अहेड" डॉ. सचित पुढे झुकत म्हणाले.

"ओके, खरंतर फोनवर आपलं बोलणं झालंच आहे. तरीही परत एकदा सांगतो. तुम्ही परदेशात वास्तव्यास असताना मेंदूच्या तंतुंबद्दल केलेलं संशोधन माझ्या वाचण्यात आलं. त्याबद्दल मला काही प्रश्न आहेत." सत्यवीरने बोलायला सुरुवात केली. त्यावर डॉ. सचित यांनी फक्त मान डोलावली. त्यामुळे पुढे सत्यवीर बोलू लागला.

"डॉक्टर, तुमचा सायंटिफिक मॅगझिन मधला लेख वाचला. परदेशातील काही औषधनिर्मात्या कंपनीतील ज्येष्ठ शास्त्रज्ञांसोबत मिळून तुम्ही एक वेगळ्या पद्धतीची उपचारपद्धती शोधून काढली. ज्यामुळे मेंदूशी निगडीत असलेले अनेक रोग बरे होण्यास मदत तर झालीच पण त्याहून अधिक म्हणजे फिट्स आणि स्मृतीभ्रंश यासारख्या आजारांवर सुद्धा हा इलाज रामबाण ठरला. परदेशातील पेशंट्स बरे होण्याचं प्रमाण जवळपास ९८ टक्के इतके आहे. अगदी जुनाट मेंदूचे रोग असलेले पेशंट्स जे अतिवयोवृद्ध आहेत त्यांना सुद्धा या उपचार पद्धतीने फरक पडलाय. त्याच उपचार पद्धती तुम्ही इथे स्वदेशात वापरत आहात. मला त्याबद्दल जाणून घ्यायचंय.

"तुम्ही माझे लेख अत्यंत मनापासून वाचलेले दिसतायत मिस्टर सत्यवीर" डॉ. अतिशय कौतुकाने म्हणाले.

"माझा पेशा गुप्तहेराचा असल्याकारणाने आणि माझ्या केसमध्ये याचं महत्व मला जाणवल्याने तो लेख बारकाईने वाचण भाग होतं" शांतपणे सत्यवीर म्हणाला.

"हम्म.. हे बघा सत्यवीर उपचार पद्धतीच म्हणाल तर मी ज्या परदेशी शास्त्रज्ञ टीम सोबत काम करून एक औषध निर्माण केलं होतं ते औषध आणि

काही रोजच्या दैनंदिन सवयी उदाहरणार्थ खाण्याच्या सवयी, झोपेतून उठायच्या सवयी यांचा ताळमेळ बसवून पेशंट्सना बरे करता येऊ शकते अशा निष्कर्षाप्रत आम्ही आलो होतो. परदेशात त्याचे अफलातून रीजल्ट आलेत. तुम्ही म्हणालात तसे जवळपास ९८% इतके. आपल्या देशात सुद्धा हि उपचार पद्धती मी आणली आणि इथे सुद्धा चांगले निष्कर्ष आहेत.'' डॉ सचित म्हणाले.

''आपल्या देशात किती रुग्णांवर हि उपचार पद्धत अवलंबली गेली आणि किती रुग्ण बरे झालेत?'' सत्यवीरने गंभीर होत विचारलं.

''माझ्या जवळील अधिकृत महितीनुसार या उपचार पद्धतीने तब्बल २०८ पेशंट्स मी हाताळले. त्यातले जवळपास २०५ पूर्ण बरे झालेत. उर्वरित ३ बरे न झालेल्यापैकी २ अगदीच वृद्ध होते आणि त्यांना मेंदूचे सोडून इतर दुर्धर आजार पण होते. त्यांच्या मेंदूची तंतू असलेली रचना सुधारत होती. पण इतर दुर्धर आजारात शरीर जास्तच खंगल्यामुळे ते दगावले. डॉ. पटापट बोलले.

''तिसरा पेशंट जो बरा झाला नाही ते म्हणजे याचं शहरातील रहिवासी असलेले आबासाहेब देसाई बरोबर ना?'' हनुवटीवर दोन्ही हात ठेवत सत्यवीर म्हणाला.

''येस्स.. मागच्या बऱ्याच महिन्यांपासून त्यांची ट्रीटमेंट माझ्याकडे चालू आहे. सी.टी. स्कॅनचे रिपोर्ट्स मी चेक केले. मागच्या दोन महिन्यात त्यांच्या मेंदूच्या तंतूंची सुधारणा छान झालीय. ठरलेली औषधउपचार पद्धती आणि दैनंदिन सवयीसुद्धा उपचार पद्धतीप्रमाणे चालू आहेत. पण त्यांना अजून पूर्ण बरं वाटत नाहीये. त्यांची स्मृती त्यांना दाद देत नाहीये. डॉ. सचित खंत व्यक्त करत म्हणाले.

“उपचार जर व्यवस्थित चालू असतील तर त्यांची स्मृती का दाद देत नाहीये अजून” सत्यवीरने विचारणा केली.

“कदाचित त्यांच्या केसमध्ये उपचारांमुळे गुण येण्यास जास्त कालावधी लागत असेल” डॉ. बोलले.

“पण डॉक्टर तुमच्या हातून बरे होणाऱ्या रुग्णांची जास्त संख्या आणि त्यावरील सकारात्मक सर्वे पाहता असं होणं थोडं विचित्र नाही का? म्हणजे देसाई हे इतके म्हातारे पण नाहीत किंवा असपण नाही कि त्यांना इतर काही आजार आहेत, ज्यामुळे उपचारांचा गुण येण्यास वेळ लागतोय” सत्यवीरने आपली शंका उपस्थित केली.

“खरंतर ते एव्हाना बरे व्हायला हवे होते. पण काही केसेस मध्ये ठराविक घटनांचा पेशंट्ना मानसिक धक्का बसलेला असतो त्यामुळे रिकवरीला वेळ लागतो.” डॉ. सचित आपली बाजू मांडत म्हणाले.

“ते आहेच.. पण तुमच्या संशोधन लेखाप्रमाणे रुग्णांच्या बरे होण्याच्या यादीत आबासाहेब देसाई हि केस जरा वेगळी आहे असं म्हणायला हरकत नाही.” सत्यवीर स्मित करत म्हणाला.

“हो.. एक अपवाद म्हणा हवं तर. पण मला खात्री आहे त्यांना आज ना उद्या नक्की पूर्ण बरं वाटेल आणि त्यांची गेलेली स्मृती सुद्धा परत येईल.” डॉ सचित खात्रीपूर्वक म्हणाले.

“नक्कीच डॉक्टर मला सुद्धा तुमच्याकडून याचं उत्तराची अपेक्षा होती. आज ना उद्या त्यांना नक्कीच पूर्ण बऱ़ वाटणार. चला तुमचा खूप वेळ घेतला.”

सत्यवीर आभार व्यक्त करत उठला. हस्तांदोलन करत सत्यवीरने डॉक्टर सचित पटवर्धन यांचा निरोप घेतला.

केबिनच्या बाहेर येत हलकंसं स्मित करत आणि शिळ वाजवतच तो चालू लागला.

घरी पोचताच सत्यवीरने आपले अंग बेडवर टाकले. रात्रभर त्याला झोप नव्हती. एकतर त्या गूढ व्यक्तीचा पाठलाग करताना सपाटून आपटल्याने त्याची पाठ चांगलीच दुखावली गेली होती आणि वाड्यावरून त्यादिवशी आणलेली प्रवासवर्णनांची पुस्तकं वाचता वाचता पहाट कधी झाली त्याला कळलेच नाही. सकळी लवकर डॉक्टर सचित पटवर्धन यांची ठरलेली गाठ घेणे भाग असल्याने झोप अपूर्णच राहिली. त्यामुळे थोडी झोप घेण्याच्या उद्देशाने सत्यवीरने अंग टाकलं आणि लागलीच त्याला झोप लागली. सत्यवीर झोपून काही तासच झाले असतील कि त्याची झोपमोड झाली ती टेबलावरच्या फोनच्या आवाजानेच. डोळे किलकिले करत चरफडतच सत्यवीर उठला आणि फोनजवळ गेला.

"कोण आहे" सत्यवीरने त्रासिक सुरात विचारले.

"इस्पेक्टर देशमुख बोलतोय. सत्या काय झालं एवढ वैतागायला." समोरून देशमुख बोलले.

"अच्छा देशमुख तुम्ही आहात होय. काही नाही हो.. रात्रभर झोप नव्हती. नुकतीच झोप लागली तर तेवढ्यात तुमचा फोन आला. बऱ ते सोडा तुम्ही कशासाठी फोन केला होता" सत्यवीर मुद्द्याला हात घालत म्हणाला.

"आशुतोषबद्दल सांगायचं होतं. तू सांगितल्याप्रमाणे त्याच्या मागावर माणूस ठेवलेला होता." देशमुख शांतपणे बोलले.

"बऱ मग काय हाती लागलं" सत्यवीर जवळच्या खुर्चीत बसत म्हणाला.

"शहरात तो ज्या क्लासला जातो तो क्लास ७ वाजता सुटतो पण कधीकधी शहराबाहेर असणाऱ्या बारमध्ये सुद्धा आशुतोष साहेब दिसले होते. सिगरेट आणि दारू पीत मित्रांसमवेत वेळ घालवताना" देशमुख व्यंगात्मक पद्धतीत बोलले.

"हम्म.. मला शंका होतीच. साधारण किती वाजता दिसला आशुतोष तिथे?" सत्यवीर म्हणाला.

"साधारण ९ च्या आसपास होता तिथे. बारमध्ये चौकशी केली तेव्हा समजले आठवड्यातून एक दोनदा येत असतो तो बारमध्ये याच सुमारास. पण मला एक शंका आहे सत्यवीर. ९ वाजता त्याला वाड्याच्या बाहेर जाताना कोणी हटकल नसेल का? कि एवढ्या रात्री कुठे जातोयस म्हणून " देशमुखांनी विचारलं.

"अहं.. कोणीही हटकल नसेल. कारण तो वाड्याच्या मुख्य दरवाजातून जातच नाही मुळी. बाहेर पडायला तो त्याच्या खोलीतील खिडकीचा वापर करतो. वाड्यात देखील कोणाला त्याच्या व्यसनांविषयी माहिती नसावी" सत्यवीर म्हणाला.

"तू एवढ ठामपणे कस काय बोलतोस" देशमुख बोलले. त्यावर सत्यवीरने आशुतोषच्या खोलीत जाऊन तिथे दिलेली भेट सांगितली. त्याच्या

खिडकीबाहेर त्याने विझवलेली सिगरेट आणि त्यामुळे खिडकीबाहेर पडलेले सिगरेटचे डाग, सिगरेट विझवून खाली टाकलेलं थोटूक आणि त्याच्या कपाटामध्ये त्याने ठेवलेला तो गाठी मारलेला दोरखंड याबाबत सविस्तर वृतांत सांगितला.

"ओह्ह असं आहे तर... म्हणजे रात्री गुपचूप दोरीच्या सहाय्याने आशुतोष खिडकीवाटे खाली उतरून बारमध्ये दारू प्यायला जातो तर." देशमुख म्हणाले.

"येस देशमुख, दोरीच्या साहाय्याने खिडकीबाहेर खाली उतरून बाजूचं पुरुषभर उंचीचं कंपाऊंड उडी मारून ओलांडायला त्याला अवघड नाहीये" सत्यवीर खुर्चीत बसत म्हणाला.

"सध्यातरी आशुतोषबद्दल एवढचं आहे. तुला काही अजून माहिती मिळाली" देशमुखांनी विचारणा केली.

त्यावर सत्यवीरने त्या रात्री पाटील डॉक्टरांना दिलेली भेट, डॉक्टरांच्या घराबाहेर ठेवलेली पाळत आणि एका गूढ व्यक्तीचा केलेला पाठलाग सांगितला.

"माय गॉड सत्या, एवढ सगळं झालं मग तू मला त्याचवेळीच का नाही कळवलस." देशमुख मोठ्याने बोलले.

"तितका वेळ नव्हता देशमुख आणि तसंही इतर गोष्टींची छाननी करण बाकी होतं" सत्यवीर म्हणाला.

"ठीक आहे सत्यवीर, पण तुला काय वाटत कोण असावी ती व्यक्ती जी अपरात्री पाटलांच्या घरात होती. काय काम असेल तिचं तिथं" देशमुख अधीर होत म्हणाले.

"मला अंदाज आला आहे. त्या व्यक्तीचा बुरखा लवकरच फाडणार आहे मी. खरतरं त्याचं दिवशी सगळ्या गोष्टींचा सोक्षमोक्ष लावणार होतो मी. पण मला खात्री करून घ्यायची होती म्हणून थांबलो होतो" सत्यवीर शांतपणे म्हणाला.

"खात्री.. कसली खात्री? तुला नक्की कोणावर संशय आहे का? आत्ताच जाऊन त्या व्यक्तीला रिमांड मधे घेऊयात आपण" देशमुख तावातावात म्हणाले.

"रिलॅक्स देशमुख.. सगळं काही करायची संधी मिळेल तुम्हाला. तुम्ही लगेचच देसाई वाड्यावर यायला निघा सगळं काही प्रात्यक्षिक करूनच दाखवतो आणी हो.. त्या डॉक्टर पाटलांना सुद्धा त्याचं मानगुट पकडून आणा वाड्यावर" सत्यवीर जरा कडक आवाजात म्हणाला. सत्यवीरच्या अशा ठाम उद्गारानंतर तर देशमुखांची खात्रीच पटली कि सत्यवीरला गुन्हेगार कोण आहे ते समजलंय. देशमुख यावर भलतेच खुश झाले आणि त्या खुशीतच त्यांनी फोन ठेवला. सत्यवीर सुद्धा पटकन आवरून देसाई वाड्याकडे जाण्यासाठी निघाला.

काही वेळाने सत्यवीर देसाई वाड्याच्या जवळ पोहोचला. आपली दुचाकी देसाई वाड्याबाहेर थांबवून सत्यवीर देशमुखांची वाट पाहत उभा होता. इन्स्पेक्टर देशमुख आल्यावरच वाड्यात प्रवेश करावा या इराद्याने सत्यवीर बाहेर थांबलेला होता. सत्यवीरला जास्त वाट पाहायला लागली नाही कारण

थोड्या वेळातच देशमुखांची गाडी देसाई वाड्याजवळ येऊन थांबली. गाडीच्या आतमधून देशमुख लगबगीने उतरले आणि त्यांची वाट पाहत असणाऱ्या सत्यवीर जवळ आले. नंतर गाडीतून हवालदार म्हस्के आणि अजून दोन हवालदार उतरले. गरज पडेल म्हणून देशमुखांनी पोलिसांची जादा कुमक सोबत आणली होती.

"बोल सत्या काय योजना आहे" अधीर होत देशमुखांनी विचारलं. आज देशमुख वेगळ्याच उत्साहात होते.

"आपण दोघे आतमध्ये वाड्यात जाऊयात. हवालदार म्हस्केना सांगा त्या पाटील डॉक्टरांना उचलून वाड्याच्या मुख्यदरवाजापाशी आणून उभं करून ठेवा आणि जोपर्यंत मी आवाज देत नाही तोपर्यंत त्यांना आत आणू नका. उर्वरित दोन हवालदारांपैकी एकाला मुख्य प्रवेशद्वारापाशी आणि दुसऱ्याला आतमध्ये अंगणात उभं राहायला सांगा. मी सांगितल्याशिवाय कोणीही वाड्यात येणार नाही किंवा बाहेर जाणार नाही. सत्यवीरने पटापट देशमुखांना निर्देश दिले.

देशमुखांनी सत्यवीरच्या निर्देशानुसार सगळ्यांना आदेश दिले. हवालदार म्हस्के डॉक्टर पाटलांना आणायला गेले. उर्वरित दोन हवालदार देशमुखांनी सांगितलेल्या जागेवर जाऊन थांबले. सत्यवीर आणि देशमुखांनी वाड्यात प्रवेश केला.

बिंग फुटलं

सत्यवीर वाड्यात आल्यावर त्याने चहूबाजूला नजर फिरवली. संध्याकाळची वेळ असल्याने तुळशीवृंदावनापाशी उदबत्ती लावलेली होती. त्याचा सुवास सगळीकडे दरवळत होता. आता या वेळी वाड्यात सगळे असतील हा अंदाज बांधूनच सत्यवीरने या वेळी वाड्यात येण्याचं ठरवलं होतं. आत आलेल्या हवालदाराला गेस्टरूमच्या बाजूला उभं राहायला सांगून सत्यवीर पुढे जाऊन आबांच्या खोलीकडे जाऊ लागला.

"देशमुख मी इथे उभा आहे. तुम्ही वाड्यातल्या इतर सगळ्यांना बोलावून आणा." सत्यवीर पुढे जात म्हणाला.

सत्यवीरच्या म्हणण्यासरशी देशमुखांनी सगळ्यांना आवाज द्यायला सुरुवात केली. कमलाबाई आणि नंदिनी जवळच स्वयंपाक घरात असल्यामुळे त्या लगेचच बाहेर आल्या आणि काय झालंय म्हणून बावरलेल्या नजरेने आबांच्या खोलीबाहेर उभं असलेल्या सत्यवीरकडे पाहू लागल्या. वरच्या मजल्यावरून अविनाश खाली आला आणि त्याने काय झालं? का हाका मारून बोलावत आहात? अशा अर्थाने देशमुखांना विचारणा केली तेव्हा देशमुखांनी त्याला सांगितलं कि सत्यवीरने सगळ्यांना बोलावलंय. सगळ्यात शेवटी वरच्या मजल्यावरून हळूहळू खाली बघत चष्मा सावरत आशुतोष खाली

आला. सगळेजण सत्यवीरच्या समोर जमा झाले. आबांच्या खोलीबाहेर हाताची घडी घालून सत्यवीर गंभीर चेहरा करून उभा होता. सगळे आल्यावर सत्यवीर अविनाशकडे पाहत म्हणाला

"अविनाश तुम्हाला आबांना घेऊन बाहेर फिरायला जायचं असेल ना?

"हो.. थोड्याच वेळात निघणार होतो मी त्यांना घेऊन .." चेहऱ्यावर आश्चर्य दाखवत अविनाशने उत्तर दिलं.

"ठीक आहे. पण आज तुम्हाला बाहेर जाता येणार नाही कारण मला तुमच्या सगळ्यांशी खूप महत्वाचं बोलायचं आहे, चला इथे आतमध्ये" असं म्हणून सत्यवीर मागे वळाला आणि आबांच्या खोलीची बाहेरील कडी काढून आतमध्ये प्रविष्ट झाला. आतमध्ये आबा बेडवर एका अंगावर झोपलेले होते. समोरच्या भिंतीवर असलेली खिडकी सत्यवीरने पुढे जाऊन उघडली तशी वाऱ्याची मंद झुळूक आतमध्ये आली, बाजूलाच उभी असलेली एक लाकडी खुर्ची त्याने खिडकीजवळ ओढली आणि पायावर पाय ठेवून त्या खुर्चीत सत्यवीर आरामात बसला.

सत्यवीरच्या मागोमाग सगळेजण आतमध्ये आले. आबांची खोली बऱ्यापैकी मोठी होती. आतमध्ये आल्यावर आबांच्या बेडवर अविनाश बसला. दाराजवळ कमलाबाई आणि तिच्या मागे नंदिनी उभी होती. त्यांच्यापुढे आशुतोष उभा होता. देशमुख दरवाजातच उभे राहून पुढे काय होणार हे कुतुहूलतेने पाहत उभे होते.

आतमध्ये आल्यावर सगळ्यांनाच हा प्रश्न पडलेला होता कि सत्यवीरला नक्की काय बोलायचंय आणि त्याने सगळ्यांना आबांच्या खोलीत का बोलावलंय. सगळ्यांचे प्रश्नार्थक चेहरे पाहून सत्यवीर गंभीर चेहरा सोडून जरा हसरा चेहरा करत म्हणाला.

"तुम्हा सगळ्यांनाच हा प्रश्न पडलेला असेल कि मी असा अचानक या वाड्यात येऊन सगळ्यांना इथे का बोलावलं असेल." सत्यवीरच्या या वाक्यावर कोणीच काहीही बोललं नाही.

"तुमच्यापैकी कोणी नाटकं पाहिलं आहे का"? सत्यवीरच्या या पुढच्या प्रश्नावर सगळे अजूनच बुचकळ्यात पडले.

इन्स्पेक्टर देशमुखांना सुद्धा कळल नाही सत्यवीर नाटकाविषयी का विचारतोय.

"अविनाश तुम्ही सांगा तुम्ही नाटक पाहिलं आहे का कधी?" अविनाशकडे पाहत सत्यवीरने स्मित करत विचारलं.

"अ...हो..पाहिलं आहे" अविनाश काहीसं बावरत आणि प्रश्नार्थक मुद्रा करत म्हणाला.

"नाटक संपल्यावर पडदा पडतो आणि काही नाटकवेडे प्रेक्षक स्टेजच्या मागील खोलीत नाटकात काम केलेल्या कलाकाराचं अभिनंदन करायला किंवा त्यांच्या कामाचं कौतुक करायला त्यांची भेट घेतात. काहीजण तर त्यांची सही सुद्धा घेतात. हो ना अविनाश?" परत अविनाशकडे हसरा चेहरा करत सत्यवीरने प्रश्न विचारला.

यावर अविनाशने होकारार्थी मान हलवली खरी पण सत्यवीरला नक्की म्हणायचं काय हे कोणालाच समजत नव्हतं.

सगळेचजण प्रश्नार्थक नजरेने सत्यवीरकडे पाहत होते. सगळ्यांचे असे चेहरे पाहून सत्यवीरने विषय जास्त न ताणता मुद्द्याला हात घालायला सुरुवात केली.

"मी सुद्धा आज इथे अशाच एका कलाकालाराला भेटायला आलोय. ज्याने नाटकातील कलाकाराप्रमाणेच अतिशय उत्तम अभिनयाचा नमुना दाखवत नाटकं छान चालवलं आहे. खरंतर अशा कलाकाराला नाट्य क्षेत्रातील मोठा पुरस्कारच द्यायला हवा. पण दुर्दैवाने त्या नाटकावर पडदा पडायची वेळ आलेली आहे आणि ते सौभाग्य मी स्वतःकडे घेत आहे" सत्यवीर नाटकीय पद्धतीने म्हणाला.

"सत्यवीर आम्हाला खरंच कळत नाहीये तुम्ही काय बोलताय. तेव्हा कृपा करून आता स्पष्टपणे सांगा तुम्हाला काय म्हणायचं" अधीर होत पण चेहऱ्यावर नाराजीचे भाव आणत अविनाश म्हणाला. आता सगळ्यांच्याच धीराची परीक्षा होत आहे हे ओळखून सत्यवीर जागेवरून उठत पुढे म्हणाला.

"या बेडवर झोपलेले आबा देसाई हेच त्या नाटकाचे कलाकार आहेत. म्हणजेच मागचे काही दिवस स्मृतिभ्रंशाचं नाटकं करतं बेडवर पडलेले आहेत."

त्याचं ते वाक्य बॉम्ब पाडाव तसं खोलीत घुमलं. कोणीच काही बोललं नाही. कारण कोणालाच ते वाक्य पचले नाही. सत्यवीरला पुढे बोलला.

"२ महिन्यापूर्वीच आबा स्मृतिभ्रंशाच्या व्याधीतून बरे झालेत आणि तरीसुद्धा कोणाला कळू न देता आपण अजूनही बरे झालेलो नाही. आपणास काही आठवत नाही अशा अविर्भावात ते वावरत आहेत." सत्यवीर म्हणाला.

कमलाबाईने तोंडावर पदर ठेवला. नंदिनी आणि अविनाश अविश्वासाने सत्यवीरकडे पाहत होते. बाजूला उभ्या आशुतोषला याचं काहीही देणंघेणं नसल्यासारखा तो मान खाली घालून उभा होता. दरवाजात उभ्या असलेल्या देशमुखांना पण चांगलाच हादरा बसला होता आणि ते अविश्वासाने आतमध्ये पाहत होते. आबा अजूनही बेडवर एका कुशीवर झोपूनच होते. पण आता अविनाशचा संयम सुटला आणि तो मोठ्याने बोलला.

"सत्यवीर काय वाट्टेल ते बोलत आहात तुम्ही. कशावरून तुम्ही असे आरोप करताय. आबांना असं करायची गरजचं काय आहे."

"गरज काय आहे ते आबा स्वतःच सांगतील. पहिल्यांदा जेव्हा आबांच्या या खोलीत आलो होतो तेव्हा फक्त टेबलावरील पुस्तकं पडल्याच्या आवाजाने त्यांना जाग आली होती. पण आज आपण एवढ मोठ्याने बोलतोय तरीही त्यांची झोपमोड होत नाहीये. बघा कसं झोपेचं सोंग करत पडलेत" सत्यवीर जरा घुश्यातच म्हणाला.

"सत्यवीर तुम्ही माझ्या वडिलांना पुराव्याशिवाय काहीही बोलू शकत नाही." अविनाश आपल्या जागेवरून उठत तावातावात म्हणाला.

"पुरावा हवाय तुम्हाला? देशमुख... बाहेर बघत मोठ्याने सत्यवीर म्हणाला.

“त्या पाटील डॉक्टरला आतमध्ये आणा ज्याने चौकशीत आपल्याला सांगितलं कि आबा हे चोरून रात्री अपरात्री त्यांना भेटायला येतात आणि तशी साक्ष पण तो कोर्टात देणार आहे.” सत्यवीरने बिनदिक्कतपणे खडा मारला होता.

सत्यवीरच्या वाक्यासरशी देशमुखांनी अंगणातील हवालदाराला इशारा केला. तो हवालदार पळतच बाहेर गेला आणि काही वेळातच हवालदार म्हस्के बाहेरून पाटील डॉक्टरांना हाताला धरून आबांच्या खोलीबाहेर आला. सगळ्यांच्या तोंडचं पाणीच पळाल होतं आणि कोणाला काय बोलावं ते समजत नव्हतं. डॉक्टर पाटलांना आपणाला इथं का आणलंय तेच समजत नव्हतं. ते प्रचंड घाबरलेले होते. पाटील डॉक्टरांना घेऊन देशमुख आत आले.

सत्यवीर आबांकडे पाहत म्हणाला “हे बघा आबा तुम्ही रंगवलेल्या नाटकातील तुमचे सहकारी पाटील डॉक्टर आतमध्ये आलेले आहेत आणि...थोडसं थांबून हलकसं हसत पुढे जाऊन आबांच्या जवळ जात त्यांच्या कानात हळूच म्हणाला “कुटीरोवांच्या शस्त्राबद्दल पण माहिती मिळालीय आम्हाला”

सत्यवीरने असं सांगताच.. पटकन अंगावरची चादर बाजूला फेकत आबा ताडकन बेडवर उठून बसले आणी कडाडले.

“मूर्ख माणसा, थोडे दिवस थांब असं म्हणलो होतो ना. लगेचच घाबरलास आणि सगळं सांगून बसलास पोलिसांना. असला कसला शेळपट डॉक्टर आहेस रे तू”

असं म्हणून आबा रागारागाने डॉक्टर पाटलांना मारायला धावले.

सत्यवीरने त्या दोघांमध्ये पडत आबांना धरले आणि बेडवर बसवले. डॉक्टर पाटलांना घाबरून काय होतंय तेच समजत नव्हतं आणि त्यामुळे त्यांच्या तोंडून एक शब्दही फुटला नाही. कसायाला दिलेल्या बकरीसारखी त्यांची अवस्था झालेली होती.

आबांच्या त्या ताडकन उठण्याने सगळेच आवक झाले त्याहूनही ते जे स्पष्टपणे बोलले त्याने तर इन्स्पेक्टर देशमुखांसोबत घरातील सगळ्यांनाच धक्का बसला. नंदिनी तर रडवेल्या चेहऱ्याने मटकन खालीच बसली. कमलाबाईने मोठ्याने आ वासला. अविनाश डोळे मोठे करून विश्वास न बसल्यासारखा आबांकडे पाहत बेडवर खिळून होता. आशुतोषसुद्धा कपाळावर आठ्या आणत आश्चर्याने पाहत होता.

"आबांना पाणी द्या प्यायला" अविनाशला निर्देश करत सत्यवीर खुर्चीत बसत म्हणाला.

सत्यवीरच्या वाक्यासरशी अविनाश भानावर आला आणि आबांना मिठी मारून ओक्साबोक्शी रडू लागला. आबांनी सुद्धा पाणावलेल्या नेत्रांनी त्याला छातीशी धरलं. नंदिनीसुद्धा स्फुंदून स्फुंदून रडू लागली. कमलाबाईचे डोळे सुद्धा पाणावले.

थोड्या वेळ त्यांना एकमेकांना सावरायला लागला त्यामुळे सत्यवीर शांतपणे खुर्चीत बसून सगळ्यांना न्याहाळत उभा होता. अविनाशला आबांनी मिठीतून सोडवलं आणि डॉक्टर पाटलांकडे पाहत म्हणाले "डॉक्टर तू या

पोलिसांना आणि या गुप्तहेराला सगळंच सांगायची गरज नव्हती. काही दिवस थांब असं म्हणलो होतो मी"

"अहो आबा मी यांना काहीही सांगितलेलं नाहीये. यांनीच मुद्दाम तुम्हाला तुमचं बिंग बाहेर पडावे म्हणून खोट सांगितलंय सगळं" डोक्यावर हात ठेवत रडवेल्या सुरात डॉक्टर पाटील म्हणाले. पाटलांच्या या वाक्यासरशी आबा चमकून सत्यवीरकडे पाहू लागले. सत्यवीर मात्र गालातल्या गालात हसत खुर्चीत आरामात रेलून बसलेला होता.

"पण तुम्हाला कुटीरोवांच्या शस्त्राबद्दल कसं माहिती ते एक दुर्मिळ वनस्पतींपासून बनलेल हत्यार आहे ज्याची माहिती कोणालाच नाहीये" आबा शांतपणे सत्यवीरकडे पाहत म्हणाले.

"त्या आधी तुम्ही मला सांगा तुम्हाला हे नाटक करायची काय आवश्यकता होती. ते पण आजूबाजूला प्रेम करणारी मुलं आणि सुन असताना. तुमची एवढी काळजी घेत हे लोक घेत असताना त्यांना असं अंधारात ठेवायला तुम्हाला जराही वेदना झाल्या नाहीत" सत्यवीर मुद्दाम भावनिक शब्दात म्हणाला. यावर आबांची नजर खाली गेली.

"वेदना.. वेदना झाल्या. खूप झाल्या... पण काय करणार..." एवढ बोलून आबा शांतपणे जमिनीकडे पाहू लागले.

"मग आता हे सगळं का आणि कशासाठी केलं ते सविस्तर सांगा अगदी कुटीरोवांच्या माहितीसकट" सत्यवीर खुर्चीवर रेलत म्हणला.

"सांगतो.. सगळं सांगतो" असं म्हणून आबा दोन्ही हात बेडच्या काठावर ठेवून सांगू लागले –

"मला पहिल्यापासूनच फिरायची खूप आवड होती. नोकरीत असतानादेखील मी माझी हि आवड जोपासायचो. कामाच्या ठिकाणी असताना माझे दोन मित्र होते गजानन सुरवसे आणि प्रमोद टेके या नावाचे. त्यांना सुद्धा फिरायचा खूप नाद होता. कामावर असताना एकदा गजानन म्हणाला कि दक्षिण भागात जिथे खूप दाट जंगलं आहेत तिथे खूप रम्य धबधबे आणि वेगवेगळ्या प्रकारचे पक्षि पाहायला मिळतात. आपण तिथे फिरायला जाऊयात. तो तसा म्हणाला खरा पण योग काही आलाच नाही. घरात पण मालतीची चिडचिड जास्तच वाढली होती. येऊन जाऊन ती सगळ्यांवर डाफरत असायची. मी घरात असलो कि सांभाळून घ्यायचो. पण माझ्या मागे तिला आवरण इतरांना अशक्य होऊन जायचं. मागच्या वर्षाखाली एकदा गजाननचा फोन आला कि जिथे आमचं फिरायला जायचं ठरलं होतं तिथं जाण्यासाठीची तिकीट त्याने बुक केलेली होती आणि मला तिकडे चलण्यासाठी तो गळ घालत होता. सोबत प्रमोद पण येणार होता. मला नाही म्हणवल नाही आणि दुसरीकडे निसर्ग सुद्धा खुणावत होताच. घरच्या कीटकीटीतून जरा विरंगुळा सुद्धा होणार होणार होता. मी होकार दिला आणि आम्ही फिरायला निघालो. अतिशय रम्य अशा अशा ठिकाणी फिरता फिरता वेगवेगळे पक्षी पहिले. धबधबे आणि उंचच उंच कडे कपारी पहिल्या. खूप मस्त वाटलं.

गजाननच्या म्हणण्यानुसार इथे ठराविक प्रकारच्या आदिवासी जमाती राहत असतं. पण त्या सहसा कोणाला दिसायच्या नाहीत. तिथे मला नंदिनीची

माझ्या सुनेची जास्तच आठवण आली तिला अशा ठिकाणी फिरायला फार आवडते. इथल्या वातावरणाबद्दल सांगायला मी काही पत्र पण लिहून घरी पाठवली होती.

पुढच्या वेळी अविनाश आणि नंदिनीला नक्की या ठिकाणी पाठवायचं असा निर्धार मी केला. तिथे एके ठिकाणी उंच सुळक्या जवळ मी फिरत होतो, त्या दिवशी गजाननला जरा बऱ़ वाटत नव्हते म्हणून प्रमोद आणि तो दोघे आम्ही ज्या ठिकाणी मुक्काम केला होता तिथेच थांबले होते. मी मात्र जरा पाय मोकळे करायला म्हणून बाहेर पडलो. एका उंच कड्याच्या टोकाजवळ मी उभा होतो. तिथून खालचा ओढा वाहत असतांनाच दृश्य खूप छान दिसतं होतं. अजून थोडं खाली एक वेगळ्याच प्रकारची रानटी फुलं पाहण्याच्या नादात मी जरा कड्याच्या खाली उतरलो. फुलं बघण्याच्या नादात हे विसरलो कि वर परत जायला रस्ता नाहीये. कडा उतरून खाली जाऊन एक फेरी मारून मग दुसऱ्या बाजूंला जाणे हा एकंच मार्ग होता. डोक्यावर हात मारून मी कडा हळूहळू उतरलो आणि खाली कच्च्या रस्त्याला लागलो.

अंधार पडू लागल्याने पटापट चालत होतो. आजूबाजूला जंगलाचा भाग भितीप्रद वाटत होता. लवकर मुक्कामी पोहोचावं म्हणून झपझप पावलं टाकत असतानाच एका खड्यात माझा पाय अडकला आणि तोल जाऊन पडलो. पाय मुरगळल्याने मला उठता येईना आजूबाजूला कोणीच माणूस दिसत नव्हता. बराच वेळ तिथे कण्हत नशिबाला दोष देत बसून होतो. एवढ्यात मागून २ आदिवासी बायका येत होत्या. त्यांना मी जमिनीवर बसलेला दिसलो. त्या इथे झाडपाला गोळा करायला आल्या होत्या. मला त्यांची भाषा समजत नव्हती

पण त्यांना माझी भाषा थोडीशी समजत होती. त्यांनी माझी मोडक्या तोडक्या भाषेत विचारपूस केली. मी माझा पाय मुरगळल्याच सांगितलं. तसं त्या दोघींनी मला आधार देत उचललं आणि जवळच आपल्या पालावर नेऊन जायला लागल्या. गजाननने सांगितल्याप्रमाणे इथे खरंच आदिवासी जमाती वास्तव्यास होत्या हे खर होतं. जंगलात आतमध्ये एके ठिकाणी त्यांनी मला नेलं, माझ्या पायाला खूप वेदना होत होत्या. काही वेळातच आम्ही त्यांच्या पालावर पोचलो. आजूबाजूला ४-५ लहान झोपड्या आणि मध्ये छोटी शेकोटी केलेली होती. तिथे ३-४ लहान मुले आणि काही वृद्ध मंडळी बसली होती. आम्ही येताच सगळयांनी आमच्याभोवती कोंडाळ केलं. पालावरचे इतर आदिवासी त्या बायकांना माझ्याबद्दल विचारू लागले. तेव्हा आदिवासी भाषेत त्या बायकांनी त्यांना काहीतरी सांगितलं आणि मला बाजूच्या झोपडीत घेऊन गेले.

तिथे नंतर त्यांच्यातील एक वृद्ध आदिवासी माझ्याजवळ आला कदाचित त्यांचा वैद्य असावा. त्याने माझा पाय पाहिला आणि त्या मुरगळलेल्या पायावर २-३ लहान काठ्या वेलाच्या सहाय्याने बांधल्या. नंतर कसल्यातरी पानाचा लेप लावला. जवळच्याच भांड्यात एक पदार्थ टाकून त्याला आग लावून धूर केला. त्याने तो धूर माझ्या नाकाजवळ आणला आणि क्षणार्धात मला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी उठलो तेव्हा सकाळ झाली होती. उठून बसलो तर मी कालच्याच झोपडीत एकटा होतो. पायाला वेदना अजिबात होत न्हवत्या. पाय हलवून पाहिलं तर तो अगदी ठणठणीत बरा झालेला पाहून आश्चर्य आणि आनंद दोन्ही भावना मनात उमटल्या. मग मी झोपडीच्या बाहेर आलो तर काही आदिवासी मंडळी बाहेरचं उभी होती. मी आल्यावर आनंदाने ती माझ्याजवळ

येऊन उभी राहिली. त्यांनी मला बाजूला एका दगडावर बसवलं. मोडक्या तोडक्या भाषेत ती लोकं माझी विचारपूस करू लागली. खूप प्रेमळ स्वभावाची अशी ती लोकं होती. त्यांनी मला खाण्यास काही फळे दिली. नंतर दिवसभर मी त्यांच्या सोबतच घालवला. आजूबाजूला खूप वेगवेगळ्या प्रकारची फुलं आणि वनस्पती असल्याचं मला त्यांच्याकडून कळल. मुख्यत्वे हि लोकं फुलं आणि झाडावरचा मध गोळा करून आसपासच्या गावात विकून आपली गुजराण करत असत. तेवढाच काय तो त्यांचा बाहेरच्या जगाशी संबंध. बाहेरील लोक सुद्धा त्यांच्याशी तेवढाच संबंध ठेवायचे. मला त्यांच्या सोबत दिवस काढायला मिळाल्याने मी खुश होतो. जंगलात असणाऱ्या विविध प्राण्यांची मुख्यत्वे ससे किंवा हरीण यांची ती लोक शिकार करायची.

जंगली श्वापदांपासून संरक्षण करण्यासाठी ते लोक विशेष अशी विषारी हत्यारे वापरात असत. तिथल्या एका वृद्ध अदिवास्याने मला सांगितलं कि त्यांच्या जमातीला कुटीरोवा असं म्हणतात. त्याने तिथली विविध प्रकारची औषधी झाडे मला दाखवली. त्यात ओल्डोमा नावाची अत्यंत दुर्मिळ वनस्पती देखील होती. ओल्डोमा वनस्पतीच्या पानांच्या रसाचा वापर करून तो हत्याराच्या टोकाला लावत असत. विशेष म्हणजे त्या वनस्पतीची खोडं जरा काटक होती आणि खोडं वापरून त्यांच्यामध्ये पोखरून मधोमध त्याचं खोडांपासून बनवलेल्या टोकदार सुया शिकारीला वापरत. त्या सुयांच्या टोकाला लावलेल्या त्याचं वनस्पतीच्या पाल्याच्या विषाने सावज जागीच ठार व्हायचं एवढ जालीम विष होतं ते. मला त्या वृद्ध माणसाने त्या वनस्पतीच्या खोडापासून ते हत्यार कसं तयार करायचं आणि पानांचा रस काढून विष कसं

लावायचं हे दाखवलं होतं. मला त्यांची ती पद्धत खूप आवडली. पण अखेर निरोप घ्यायची वेळ झाली. माझा पाय बरा केल्याने मी त्या आदिवासींचे मनापासून आभार मानले. त्यांना भरुन आलं होतं. जाताना मला त्यांनी ओल्डोमा वनस्पतीच्या काही बिया आठवण म्हणून दिल्या.

जड अंतकरणाने मी त्या प्रेमळ लोकांचा निरोप घेतला. जंगल तुडवत कच्च्या रस्त्याला आलो आणि चालत चालत मुक्कामाच्या स्थळी पोहोचलो. गजानन आणि प्रमोद यांना मला बघून जीवात जीव आला. दोघे रात्रभर मलाच शोधत होते. त्यांना मी पाय मुरगळून पडल्याचं आणि कुटीरोवा या आदिवासी जमातीच्या पाल्याला भेट दिल्याच सविस्तर वर्णन सांगितलं.

कुटिरोवांनी दिलेल्या ओल्डोमा वनस्पतीच्या बियासुद्धा त्यांना दाखवल्या. तिथला प्रवास उरकून आम्ही भाड्याने केलेल्या एक चारचाकी गाडीने परतत होतो. पण दुर्दैव माझं. रस्त्यात एका अपघाती वळणावर आमच्या गाडीला अपघात झाला. मी गाडीतून बाहेर फेकला गेलो आणि माझ्या डोक्याच्या मागे मार लागला तशी माझी शुद्धच हरपली. जाग आली तेव्हा कुठल्यातरी हॉस्पिटलमध्ये असल्याचं जाणवलं. बोलायला बघितलं तर तोंडातून शब्द फुटत नव्हते. थोड्या वेळाने परत शुद्ध हरपली अशामधे किती दिवस गेले कोण जाणे. एकदा परत जाग आली तेव्हा याचं खोलीत होतो. रात्र झाली होती उठता येत नव्हते आणि जीभ पण जड झाली होती. हळूहळू जाणीवा होऊ लागल्या होत्या. काही दिवसांनी उठता बसता येऊ लागलं. वाड्यातल्या लोकांना सुरुवातीला ओळखता येत नसायचं म्हणून गप्पच असायचो पण नंतर नंतर सगळं आठवू लागलो. बायका मुलं सुना सगळ्यांचे चेहरे ओळखीचे वाटू

लागले. पण बोलत नसायचो. हळू हळू समजायला लागलं कि अविनाश माझी ट्रीटमेंट करण्यासाठी एका पटवर्धन नावाच्या डॉक्टरकडे नेत होता. त्या डॉक्टरकडे गेल्यावर आणि त्याची औषधं घेतल्याने मला बऱ़ वाटू लागलं होतं. अविनाश रोज बाहेर फिरायला घेऊन जायचा त्याने जास्तच बऱ़ वाटायचं. हळूहळू माझी स्मृती पण माघारी येऊ लागली होती आणि जीभ थोडीशी जडत्व रहित झालेली होती. पण तरीही बोलत नसायचो.

एके दुपारी अचानक झोप मोडली ती कसल्याशा आवाजाने..

मी जागीच उठून बसलो. बाहेर मालती तावातावाने कोणाशी तरी बोलत होती. बेडवरून उठत बाहेर जायला बघितलं तर माझ्या खोलीच्या दाराला बाहेरून कडी होती. मग आतूनच कान देऊन ऐकू लागलो. मालती माझ्या सुनेला नंदिनीला मोठमोठ्याने शिव्यांची लाखोली वाहत होती आणि माझी गरीब बिचारी सून रडत गयावया करत उभी होती. मला आतून काहीच करता येईना. बोलता सुद्धा येत नव्हते कि दार उघडा म्हणून. मग तसाच आतमध्ये बसून राहिलो.

नंतर एकदा हा डॉक्टर पाटील रात्री तपासायला आला होता. खोलीबाहेर त्याचं आणि अविनाशचं बोलणं कानावर पडलं. तेव्हा समजलं कि मालती नंदिनीला कशी त्रास देते. अविनाशला कशा प्रकारे वागवते. बाहेर सुद्धा तिने लोकांना त्रास देऊन कसे पैशाचे गैरव्यवहार केलेले होते. ते ऐकून माझं पित्तच खवळल. अविनाश लहान होता म्हणून अविनाशच्या संगोपनासाठी मालतीला घरात आणले होते पण तिची हि थेरं ऐकून मस्तकच फिरलं. क्षणभर विश्वासच बसला नाही. डॉक्टर पटवर्धनांच्या उपचारांचा चांगलाच असर माझ्यावर होत

होता. पण मला सगळ आठवत असल्याचं मी कोणालाच सांगितलं नाही कारण माझे मागे मालती काय काय प्रताप करते हे मला पहायचे होते.

रोज दुपारी अविनाश नसताना मालती नंदिनीवर ओरडत असताना मी ऐकायचो. संध्याकाळी अविनाश आला कि त्याच्यावर खेकसायची. माझ्या डोक्याचा पारा चढत चालला होता. एके रात्री मी ठरवलं कि डॉक्टर पाटलांना कल्पना द्यायची कि मी बरा झालोय. माझ्या खोलीच्या खिडकीतून अंगावर शाल पांघरून हळूच बाहेर पडलो. मुख्यदरवाजा रात्री बंद असल्याने मी कंपाऊंडची भिंत उडी मारून कशीबशी ओलांडली आणि आडमार्गाने डॉक्टरच्या घराकडे निघालो. पाटलांची मला पाहताच बोबडीच वळली. पण मी डॉक्टरला विश्वासात घेऊन सांगितलं कि मी बरा झाल्याचं कोणाला सांगायचं नाही. कारण माझ्यामागे मालतीची काय थेरं चालतात मला पहायचं होतं. डॉक्टरांकडून मला समजलं कि बाहेर सुद्धा अनेक गैरव्यवहारामध्ये मालती गुंतलेली होती. डॉक्टरांचे पाटलांचे उपचाराचे पैसे सुद्धा दिलेलं नव्हते. पाटील एकदा पैसे मागायला आले तेव्हा भर लोकात त्यांचा अपमान केला होता. मुलांना एक चांगली आई मिळेल या उद्देशाने मी दुसरं लग्न केलं होतं. पण ती बाई अशी निघाली. वेळ मिळेल तसं मी रात्री डॉक्टरांच्या घरी जायचो आणि त्यांच्याशी बोलायचो. ते माझं म्हणणं ऐकून घ्यायचे.

त्यात एके दिवशी संध्याकाळी पोलीस घरी आलेले पाहिलं. मला कळेना पोलीस का आलेत. मला काहीच समजेना. मी आणि अविनाश बाहेरू फिरून आलो होतो. वाड्यात मालातीचा खून झाल्याचं समजलं. मला वाईट वाटलं नाही. नक्कीच मालतीने कोणाच तरी वाटोळ केलं असणार आणि त्यामुळेच

असं घडलं. काही दिवसांनी रात्री पुन्हा डॉक्टर पाटलाकडे गेलो. पाटलांनी सांगितलं कि त्यांनीच पोलिसांना बोलावून घ्या असं सांगितलं होतं. खरतरं बाहेरच्या माणसाच हे काम असावं म्हणून पाटलांनी अविनाशला तसं सांगितलं. पण मीच पाटलाला ओरडलो कि अरे सुंठेवाचून खोकला गेलेला असताना तू कशाला शहाणपणा करून पोलिसांना बोलावून घेतलंस. आपण सांगितलं असत लोकांना हृदयविकाराच्या झटक्याने गेली ती. खरतर पाटलांच्या शहाणपणामुळेच पोलिसांचा संबंध इथे आला. परत पाटलांना वाटू लागलं कि मीच मालतीला मारलंय. पण मी म्हणालो खरतरं खुन्याने माझ्या हातून हि संधी नेली. कारण खरंतर मलाच माझ्या हाताने तिचा गळा आवळायचा होता. पण माझ्या नशिबात ते नव्हते. एवढ बोलून आबा शांत बसले.

खोलीत निरव शांतात होती. सगळेजण गुपचूपपणे ऐकत होते.

"पण मग तुम्हाला कसं कळल कि आबा माझ्याकडे येतात ते.? डॉक्टर पाटील सत्यवीरकडे पाहत जमिनीवर बसून बोलले.

"त्या रात्री तुमच्या घरी भेट दिली तेव्हाचं समजलं कि तुम्हाला भेटायला कोणीतरी आलंय आणि तुम्ही त्याला घरात लपवताय. टेबलावर तुम्ही त्यांना प्यायला दिलेल्या ग्लासचं पाण्याचं वर्तुळ त्याची साक्ष देत होतं. म्हणून तुमच्या घरातून निघाल्याचं नाटक करत मी बाहेरच तुमच्या घरासमोरच्या झाडीत बसून पाळत ठेवत होतो कि नक्की तुम्ही कोणाला लपवत होतात." सत्यवीर खुर्चीत बसूनच बोलला.

"हो त्या दिवशी तुम्ही वाड्यावर आला होतात तेव्हा नंदिनी अविनाशला सांगत होती कि सत्यवीर वाड्यावर पाहणी करायला आला होता. त्या रात्री मी

डॉक्टरकडे गेलो होतो हेच सांगायला कि या प्रकरणात आता एक हुशार गुप्तहेरसुद्धा सामील आहे. तेव्हा आज ना उद्या हा गुप्तहेर माझं बिंग बाहेर काढायच्या आत मी बरा झाल्याचं दाखवतो नाहीतर विनाकारण आपल्यावर संशय यायचा. कारण डॉक्टरसुद्धा घाबरला होता कि मी रात्री असे त्याला त्याच्या घरात जाऊन भेटतो.

"त्या रात्री अचानक दार वाजलं तेव्हा मी जाम घाबरलो. आमचं बोलणं थांबवून आबांना माझ्या घरातल्या दरवाजा मधून क्लिनिकमध्ये लपवलं. कोण आहे ते पाहून बाहेरच्या बाहेर त्या व्यक्तीला कटवायच हा विचार करत दार उघडलं. तर समोर गुप्तहेर सत्यवीर. माझी तर वाचाच बसली होती. कसबस करून मला झोप येतेय असं तुम्हाला सांगून आणी उद्या घर पहा असं सांगून घरातून घालवलं. नंतर तुम्ही गेल्यावर आबा माझ्याशी बोलून खूप वेळाने निघाले. कारण रात्र काळोख्या रात्रीत कोणी त्यांना पाहिलं पण नसत" डॉक्टर म्हणाले.

"मग मी त्यांचा पाठलाग केला" हलकंस हसत सत्यवीर बोलू लागला. आबांनी मस्त शाल वगैरे पांघरून आपली ओळख लपवायचा प्रयत्न केला होता. पण डॉक्टर पाटलांच्या क्लिनिकबाहेर पडत असताना मला अचनाक त्यांच्या पायातला बूट दिसला. जो मी वाड्यात त्यांच्या बेडखाली पहिला होता. आत्तासुद्धा तो बेडखाली असेल पहा आणि त्याचा पुढचा भाग घासल्याने तो जरासा खरवडला गेलाय. त्यामुळे माझा संशय आबांवर बळावला. पाठलाग करत असताना आबा पुढे निसटून गेले तेव्हा रात्रीच्या त्या अंधारात लांबवर लुकलुकणारे दिवे वाड्याच्या आसपास असावेत असं दिसतं होतं. त्यामुळे हि

व्यक्ती वाड्यातीलच असणार असं वाटून गेलं. त्याआधी दिवसा एकदा वाड्याची पाहणी करायला आलेलो असतना आबांच्या खोलीबाहेर जरा पाहणी केली त्यात आबांच्या खिडकीबाहेर असलेल्या भिंतीवरचा रंग काहीतरी घासल्यामुळे उडालेला होता. तोच रंग काहीसा आबांच्या बुटाला पुढच्या भागाला लागलाय. तेव्हाच मला संशय आला होता कि कोणीतरी या खिडकीमधून भिंतीवर पाय देऊन आतबाहेर करत आहे. भिंतीवर खालच्या बाजूला असलेल मातीचे डाग याला अजूनच बळकटी देत होते. प्रथम आबांच्या खोलीचा वापर करून कोणीतरी दुसराच हे काम करतोय असं मला वाटलं कारण आबांना स्मृतीभ्रंश असल्याने त्यांना या गोष्टी जमणार न्हवत्या. पण डॉक्टर सचित पटवर्धन यांचाकडे जाऊन जेव्हा मी या गोष्टीची माहिती मिळाली कि तुमच्याकडे येण्याऱ्या पेशंटच बरे होण्याच प्रमाण काय? तेव्हा समजले कि त्यांच्या माहितीनुसार त्यांची उपचार पद्धती खूपच गुणकारी होती. मला जरा शंका वाटू लागली कि आबा हे बरे झालेत आणि नाटक करतायत. अर्थात पटवर्धन डॉक्टरांकडे जायची कल्पना पाटील डॉक्टरांमुळेच मिळाली म्हणा"

"माझ्यामुळे... ते कसं काय" डॉक्टर पाटील आश्चर्याने म्हणाले.

यावर सत्यवीर म्हणाला" तुम्हाला आठवतंय का डॉक्टर त्या रात्री तुमच्या घरी आल्यावर मी तुमच्या शेल्फ मधली वैद्यकीय मासिक पाहत होते"

"अ..हो...तुम्ही तिथली माझी मासिक पाहत होतात" चष्मा सावरत पाटील म्हणाले.

"येस.. मग त्या मासिकातच डॉक्टर पटवर्धन डॉक्टरांच नाव आणि त्यांचा लेख नजरेस पडला. त्यातल्या काही महत्वाच्या गोष्टी पटापट वाचल्या. त्यामुळे त्यांना जाऊन एकदा भेटणं महत्वाचं वाटलं. त्यांच्या बोलण्यावरून एक समजलं कि त्यांच्या नवीन उपचार पद्धतीने बरेच पेशंट बरे होतात तर त्याला आपले आबा अपवाद कसे काय. मग मी माझा संशयाचा भवरा आबांकडे वळवल्यावर गोष्टी मला समजत गेल्या. आबा हे बरे आहेत अगदी ठणठणीत आहेत. आपल्या खोलीच्या बाहेर ते खिडकीतून बाहेर पडतात. त्यांच्या बुटाच्या खरवडलेल्या आणि भिंतीच्या रंग उडालेल्या परिस्थितीवरून सिद्ध होतं. मगाशी मी त्यांच्या कानामध्ये कुटीरोवांच्या जमातीबद्दल मला माहिती असल्याचं सांगितलं ज्याने मला शंभर टक्के खात्री होती कि आबा आपलं सोंग टाकून देतीलच" सत्यवीर हाताची बोट एकमेकांवर ठेवत म्हणाला.

"पण सत्यवीर तुला कुटीरोवाजमातीबद्दल आणि त्यांच्या विशिष्ट शस्त्रांबद्दल कस समजलं" इतका वेळ ऐकत बसलेले इन्स्पेक्टर देशमुख म्हणाले.

"आबांच्या खोलीत काही प्रवासवर्णनावर आधारित पुस्तकं होती. जी मी हळूच इथून घेऊन गेलो आणि माझ्या घरी जाऊन रात्रभर वाचून काढली. त्यामध्ये आबांचे मित्र गजानन सुरवसे यांनी लिहिलेलं एक पुस्तक होतं त्यातच त्यांनी आणि आबांनी दक्षिणेत प्रवास केल्या गोष्टिंची वर्णनं केली होती. त्यात त्यांनी कुटीरोवाजमातीबद्दल केलेला उल्लेख मी वाचला आणि राहून राहून मला वाटू लागलं कि नक्कीच या शस्त्राचा वापर मालातीताईच्या हत्येत झालाय." सत्यवीर खुर्चीतून उठत म्हणाला.

"अरे हो.. गजाननने पुस्तक लिहून झाल्यावर एक प्रत मला पाठवली होती. पण तेव्हा मी शुद्धीत न्हवतो नंतर अविनाश आणि नंदिनीच्या बोलण्यातून कळाल कि आमच्या केलेल्या प्रवासावर गजाननने पुस्तक लिहिलंय" आबा केसांवरून हात फिरवत म्हणाले.

सगळ्या गोष्टी ऐकून झाल्या होत्या देशमुख पुढे होऊन आबांना चौकशीसाठी ताब्यात घेण्याच्या तयारीत होते.

"चला आबा आता इतर गोष्टी आपण पोलीस स्टेशनला जाऊनच करूयात" देशमुख पुढे होत बोलले.

"तुम्ही असं करू शकत नाहीत इन्स्पेक्टर. आत्ताच आबा म्हणाले ना कि त्यांनी काही केलेलं नाहीये. त्यांनी फक्त ते बर झाल्याचं लपवलं. हा गुन्हा असू शकत नाही" अविनाश कातर आवाजात म्हणाला.

"त्याचं उत्तरं आबाच देतील. ते पण पोलीस स्टेशनमध्ये" देशमुख पुढे होत कडक आवाजात म्हणाले. जणू काही देशमुख आबांना अटक करायला पुढे जात होते.

"मी कशालाही घाबरत नाही. मी कुठेही यायला तयार आहे देशमुखसाहेब. कारण मी काहीही केलेलं नाहीये" शांत स्वरात आबा म्हणाले.

नंदिनी आणि कमलाबाई तर पुरत्या हबकल्याच होत्या. आशुतोष काहीही समजत नसल्यासारखा उभा होता.

"एक मिनिट देशमुख...सत्यवीर खुर्चीवरून उठत म्हणाला. त्याच्या आवाजासरशी सगळेच शांत होऊन सत्यवीरकडे पाहू लागले.

सत्यवीर पुढे होऊन आबांना म्हणाला "त्या ओल्डोमा वनस्पतीच्या बियांचं काय झालं ज्या तुम्हाला कुटीरोवांनी भेट म्हणून दिल्या होत्या"

"त्या माझ्याजवळ नाहीयेत आता" आबा म्हणाले.

"काय... नाहीयेत म्हणजे.." जवळजवळ ओरडतच सत्यवीर म्हणाला.

तसं आबांनी आपल्या बेडवरील गादीखाली एका कोपऱ्यात हात घातला आणि एक छोटीशी कंपासपेटी सारखी दिसणारी एक पेटी बाहेर काढली.

"कुटीरोवांनी दिलेल्या बिया मी प्रवासावरून परतत असतानाच या पेटीत ठेवल्या होत्या हे मला आठवतंय. घरात आल्यावर नीट बऱ झाल्यावर मी त्या बिया शोधण्यासाठी माझी खोली पूर्ण तपासली तेव्हा बेडखाली हि पेटी सापडली. मी पेटी उघडली पण त्यात एकही बि नव्हती" आबांनी पेटी उघडून दाखवली.

सत्यवीरने पेटी तपासून पहिली आतमध्ये काहीही नव्हतं. सत्यवीरची पुरती निराशा झालेली होती.

"या वनस्पतीच्या विषानेच मालतीताई यांचा मृत्यू झालाय आबा. नक्की तुम्ही बिया यामध्येच ठेवल्या होत्या." सत्यवीरने आबांना विचारलं.

"हो नक्की आठवतंय.. म्हणजे मालतीचा मृत्यू नक्की ओल्डोमाच्या या बियामुळेच झाला असल्याचं मला माहित नव्हतं. अपघातानंतर माझं प्रवासी समान घरातच होतं. मला जेव्हा शुद्ध नव्हती तेव्हा त्या बिया कुठे होत्या माहित नाही. शुद्धीत आल्यावर मी खोलीत शोधाशोध केल्यावर मला बेडखाली पेटी

सापडली पण ती रिकामी होती" आबा कपाळावर आठ्यांच जाळ आणत म्हणाले.

रिकामी पेटी हातात घेऊन सत्यवीर खुर्चीवर जाऊन बसला आणि काहीतरी विचार करू लागला. इकडे देशमुखांनी बाहेरच्या हवालदाराला हाक मारली आणि आबांना घेऊन जाण्याची तयारी करू लागले. पेटीत बिया नाहीत हे आबांना माहित नाही यावर देशमुखांचा विश्वास बसला नव्हता. त्यांना वाटत होतं पोलिसी खाक्या दाखवल्यावर आबा कबुल करतील कि खून त्यांचीच केला आहे किंवा पाटलांना करायला सांगितला आहे. अविनाश आणि नंदिनी त्यांना विरोध करत होते. सत्यवीर जागेवरून उठला आणि विचार करताच बाहेर व्हरंड्यात आला.

काही वेळाने बाहेरूनच त्याने देशमुखांना हाक मारली. त्याचा आवाज ऐकून देशमुख कपाळाला आठी पाडतच बाहेर आले.

"काय झालं सत्या.. आबांना आपण पोलीस स्टेशनला न्यायला हवंय. ते अजून काही लपवत आहेत का हे पाहायला हवं" देशमुख सत्यवीरला मनवत म्हणाले.

"त्याची काही एक गरज नाहीये देशमुख. खुनात हत्यार कोणतं वापरलं गेलंय हे समजलंय आपल्याला." सत्यवीर पुढे जात विचार करत म्हणाला.

"हत्यार समजलंय पण सापडलं नाहीये अजून. खूप महत्वाची माहिती त्यांनी पोलिसांपासून लपवली आहे" देशमुख अजीजीने म्हणाले.

बोलत बोलत देशमुख आणि सत्यवीर वाड्याच्या मुख्यदरवाजाजवळ आले.

"सुरुवातीला मलासुद्धा असचं वाटलं होतं कि या सगळ्यामागे आबांचंच षड्यंत्र असावं. पण आत्ता मला वाटतंय आबांनी काही केलेलं नाहीये. त्यांनी जर काही चूक केली असेलच तर ती आजारी असल्याचं दिर्घकाळ केलेलं नाटक. बाकी काही नाही. आपलं आजचं काम झालंय इथलं. तेव्हा आपण निघुयात इथून" एवढ बोलून सत्यवीर दरवाजाबाहेर पडला.

सत्यवीरच्या या पवित्र्यापुढे देशमुखांचा नाईलाज झाला आणि ते सुद्धा त्यांच्या पोलिसी ताफ्याला घेऊन वाड्याच्या बाहेर पडले.

शेवटच्या सुया

आपल्या घराच्या बाहेर कट्ट्यावर सत्यवीर आरामात सिगरेट पीत विचार करत बसला होता. आबांच्या नाटकाचे बिंग बाहेर काढल्यानंतर खरंतर त्याला समाधान वाटायला हवे होते. कारण त्याने खुनात वापरलेल्या हत्याराचा शोध लावलेला होता आणि या प्रकरणात प्रगती केली होती. पण त्याला म्हणावं तसं समाधान लाभलेलं नव्हतं. आबांनी त्यांचा नाटकी खेळ हा फक्त मालतीताईंचे खरं स्वरूप बघण्यासाठी चालवलेला होता. अर्थात मालतीताईंचे लोकांसोबतचे चुकीचे वागणे आणि बाहेरील बेकायदेशीर प्रकरणं वाढली असती तर आबांनी मालतीताईंचा जीव घ्यायला सुद्धा मागेपुढे पहिले नसते. तसं आबांनी स्वतः बोलून दाखवलं होतं. पण आबांनी काही करायच्या आतच दुसऱ्या कोणीतरी मालतीताईंचा काटा काढलेला होता. कुटीरोवांच्या हत्यारानेच मालतीबाईचा बळी गेला असल्याची सत्यवीरला पक्की खात्री होती. आबांच्या खोलीत मिळालेल्या आबांच्या मित्राच्या पुस्तकात त्याला त्या शस्त्राविषयी माहिती मिळाली होती. ओल्डोमा वनस्पतीच्या खोडापासून एक वितभर लांब पोकळ नळी बनवली जाते. ज्यामध्ये इंच-दोन इंचाच्या टोकदार सुया ज्या ओल्डोमा वनस्पतीपासूनच बनवल्या जात. त्या सुयांच्या अग्रभागी ओल्डोमाच्या जहरी पानांपासून काढलेला घट्ट रस लावून ती सुई अलगदपणे लांब नळीत ठेवायची आणि नळी एका उघड्या बाजूने तोंडात धरून जोरात फुंकायची. वाऱ्याच्या वेगाने सुई निश्चित लक्ष्यामधे घुसून काही मिनिटातच काम

तमाम करायची. हत्यार तर समजल होतं पण दुर्दैवाने सापडलेलं नव्हतं. त्यामुळे सत्यवीर काहीसा चिंताक्रांत होता. तरीहि एक प्रश्न त्याला भेडसावत होताच तो असा कि त्या हत्याराचा वापर कोणी केला असेल आणि का?.

सिगरेटच्या धुराची वलय हवेत सोडतच सत्यवीरने सुस्कारा सोडला.

सिगरेट संपवून सत्यवीर आपल्या खोलीत आला. खुर्चीवर बसून त्याने आपले दोन्ही पाय टेबलावर ठेवले आणि विचारात गढून गेला तेवढ्यात टेबलावरचा फोन खणाणला...

विचारांच्या तंद्रीतच सत्यवीरने फोन उचलला.

"हॅलो सत्या.." समोरून इन्स्पेक्टर देशमुख यांचा आवाज आला.

"हॅलो.. देशमुख बोला" आपल्या विचारांची तंद्री भंग न करताच सत्यवीर बोलला.

"सत्या माझं ऐक मी आबांना आणि पाटील डॉक्टरांना चांगलं रिमांडमधे घेऊन चौकशी करतो. नक्कीच ते काहीतरी लपवत आहेत" देशमुख घाईघाईत म्हणाले.

देशमुखांना अजूनही आबांवर आणि पाटील डॉक्टरांवर संशय होता. पण सत्यवीरने याही वेळी देशमुखांना दाद दिली नाही.

"आपल्याला काहीतरी मिळाले आहे हे वरिष्ठांना सांगण्यासाठी का तुम्हाला त्या दोघांना रिमांडमध्ये घ्यायचं आहे." सत्यवीर देशमुखांची नस पकड शांतपणे म्हणाला.

"हे बघ सत्यवीर मला तर वाटतंय कि आपण एकदा त्यांची व्यवस्थित चौकशी करायलाच हवी नक्कीच काहीतरी मिळेल" देशमुख त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत आत्मविश्वासाने म्हणाले.

"देशमुख.. ते दोघेही गुन्हा करण्याइतपत सक्षम नाहीयेत. पाटील डॉक्टर म्हणजे शेळपट शेळी आहे. आबांचं म्हणालं तर ते मालतीताईंना मारण्याच्या तयारीत होते. पण त्यांची ती मनीषा पूर्ण झाली नाही आणि जरी त्यांची ती इच्छा पूर्ण झाली असती तरी त्यांनी स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन केलं असतं. आबा तितके स्वाभिमानी आहेत असं मला तरी वाटतं" सत्यवीर खुर्चीत रेलत म्हणाला.

"कदाचित त्या ओल्डोमा नावाच्या वनस्पतीच्या बिया कुठे आहेत हे त्यांना माहित असेल त्यामुळे जरा कडकपणे चौकशी केली तर त्या बिया कुठे आहेत याचा थांग आपल्याला त्यांच्याकडूनच नक्की मिळेल. डॉक्टर पाटलांना जरा फैलावर घेतल्यावर पोपटासारखे बोलतील बघ ते" देशमुख आग्रह करत बोलले.

"अहो देशमुख त्या बिया काय आत्तापर्यंत तशाच असणार आहेत का? ज्याने त्या घेतल्या असतील त्याने त्यांचं रोप तयार...." एवढ बोलून सत्यवीर बोलायचा थांबला... आणि फोन तसाच कानाला लावून विचारात गढला.

इकडे देशमुखांना वाटलं सत्यवीरने फोन ठेवला कि काय..

"हॅलो.. हॅलो.." असं देशमुख एकसारखं म्हणू लागले.

ओह्ह शीट.. हे मला आधी का नाही सुचले....सत्यवीर मनातच म्हणाला.

"देशमुख मला एक अत्यंत महत्वाच काम आठवलय मी नंतर बोलतो" असं म्हणत देशमुख काय बोलतायत हे न ऐकताच सत्यवीरने फोन ठेवून दिला आणि त्वरेने हालचाल करत पटकन आपल्या घराच्या खाली लावलेल्या दुचाकीपाशी आला. घाईघाईतच त्याने आपली दुचाकी चालू केली आणि शहराच्या बाहेर निघाला.

दुचाकी चालवत असतना तो एका गुढ विचारात असल्यासारखा दिसतं होता. काही वेळाने दुचाकी चालवल्यानंतर तो शहराबाहेर एका कच्च्या रस्त्यालगत असलेल्या नर्सरीजवळ आला. आजूबाजूला लोकांची शेती दिसत होती. जास्त कोणती वर्दळ किंवा दुकाने वगैरे नव्हती. फक्त काही अंतरावर एक छोटंसं टपरीवजा हॉटेल दिसतं होतं. समोरच नर्सरीच छोटसं गेट होतं. सत्यवीरने गेटमधून प्रवेश केला.

आत येताक्षणी त्याला विविध प्रकारची रोपं आजूबाजूला दिसली. प्लास्टिकच्या पिशवीमध्ये माती टाकून गुलाब, मोगरा, प्राजक्त अशा प्रकारची फुलझाड होती. जरा पुढे गेल्यावर बाजूलाच विविध फळझाड असलेली रोपं लावलेली होती. कलमी रोपं आणि औषधी झाडांची रोपंसुद्धा व्यवस्थित ओळीत ठेवलेली दिसत होती. आतमधे येण्यासाठी आजूबाजूला असलेल्या रोपांच्या गर्दीतून सत्यवीरला पुढे यावं लागलं. पुढे आल्यावर आतमध्ये रिकाम्या जागेत एक पस्तिशीचा एक माणूस खाली बसून माती वेगळी करण्याचं काम करत होता.

"या नर्सरीचे मालक कोण आहेत" सत्यवीरने मुद्दाम नवख्या माणसासारखं त्या इसमाला विचारलं.

त्या माणसाने मागे वळून पाहिलं.

"अविनाशसाहेब देसाई आहेत मालक.. तुम्ही कोण आहात?" मातीतून हात बाहेर करत डोळे रोखून त्या इसमाने विचारलं.

"मला त्यांना भेटायचं होतं. काही रोपं घ्यायची होती. कधी येतील ते?" सत्यवीरने इकडे तिकडे पाहत विचारलं.

"येतील थोड्या वेळात...तुम्ही बसा तोवर" एवढ बोलून त्या माणसाने आपले हात परत मातीत घातले आणि काम करू लागला.

"तुम्ही इथे काम करता का?" सत्यवीरने विचारलं.

"हो इथे कामाला आहे मी" मान वर न करता त्या इसमाने उत्तरं दिलं.

"ठीक आहे मी तोवर नर्सरीमधे जरा फेरफटका मारतो" सत्यवीरने असं म्हणाल्यावर त्या माणसाने फक्त मान डोलावली आणि आपल्या कामात गढून गेला.

सत्यवीर मग तिथून पुढे आतमधे नर्सरीच्या मागच्या बाजूला जिथे एक छोटं शेड होतं तिथे गेला. नाही म्हटलं तरी नर्सरीची जागा मोठी होती तसच खूप वेगवेगळ्या प्रकारची रोपं तिथे उपलब्ध होती. शेडजवळ पोहोचल्यावर सत्यवीरला दिसलं कि वर पारदर्शक प्लास्टिकचं छत केलेलं होतं त्यामुळे आतमध्ये उजेड येत होता. शेडमध्ये शेतीसाठी उपयुक्त झाडे ठेवलेली दिसत होती. बाजूलाच एक फावडे आणि छोटीशी कुदळ होती. शेडच्या कोपऱ्यात थोडीशी माती वर आलेली दिसत होती. जणु जमीन खणल्यासारखी दिसतं होती. सत्यवीरने पुढे जाऊन पाहिलं तर कोणतं तरी झाडं उपटून टाकल्यासारखं

वाटत होतं. इतर रोपाप्रमाणे ते प्लास्टिकमधे मातीत नसणार तर जमिनीमध्ये लावलेलं असणार असं दिसतं होतं. जमीन कुदळीच्या सहाय्याने खणुन काढल्यासारखी दिसतं होती. सत्यवीर तिथे खाली झुकून पाहू लागला.

रोप मुळासकट उपटून टाकल्यामुळे तिथे इतर कोणताच मागमूस राहिलेला नव्हता. सत्यवीर आजूबाजूला पाहू लागला. जमिनीवर इतर काही खुणा आहेत का ते त्याला पहायचं होतं. पण तसं काहीच आढळलं नाही. शेडच्या एक बाजूला छोटासा दरवाजा होता त्याच्यामागे मातीचा ढिग होता. रोपांसाठी मातीची व्यवस्था तिथून केली जायची. शेडच्या कोपऱ्याकोपऱ्यात बांबू उभे केले होते जेणेकरून शेडला आधार देता येईल. शेडची उंची जास्त उंच नव्हती. सत्यवीरने हात वर केले असते तरी त्याचे हात शेडच्या छताला टेकले असते. सत्यवीर कोपऱ्यांमध्ये उभ्या केलेल्या बांबूकडे गेला आणि त्या बांबूच निरीक्षण करू लागला. जिथे जमीन खणली गेली होती त्याच्या जवळच्या बांबूवर काहीतरी टोचल्याप्रमाणे बारीक बारीक होल दिसत होत्या. सत्यवीरने जवळ जाऊन निरीक्षण केलं आणि हाताची घडी घालून विचार करू लागला. लांबून काहीतरी टोकदार वस्तू फेकून मारल्याच्या खुणा वाटत होत्या. सत्यवीरने बारकाईने त्या खुणांना न्याहाळल तेव्हा त्याला त्या खुणा नजरेस पडल्या. तिथलं निरीक्षण करून सत्यवीर लगेच अचानक तिथून बाहेर पडला आणि बाहेर काम करत बसलेल्या त्या इसमाजवळ आला.

"साहेब आले नाहीत का अजून" सत्यवीरने विचारलं.

"नाही आले अजून....खरंतर एव्हाना यायला हवे होते." कपाळावर आठ्यांच जाळ आणत तो इसम बोलला.

"इथे नर्सरीत तुमचे मालक एकटेच येतात का कि अजून कोणी येत असत त्यांच्यासोबत?" सत्यवीरने विचारलं. तसं विचित्र चेहरा करून त्या इसमाने सत्यवीरडे पाहिलं. त्याला मुळात प्रश्नच कळला नाही.

"म्हणजे.." अस म्हणत आपला चेहरा तिरकस ठेवत तो म्हणाला.

"म्हणजे नर्सरी खूप मोठी आहे आणि छान ठेवलीय. कोणी मदतीला येतं का तुमच्या मालकांच्या कि तू एकटाच असतो इथे" सत्यवीर सहजपणे म्हणाला.

"मीच असतो इथे देखभालीला. पण साहेबांच्या पत्नी म्हणजे छोट्या बाईसाहेब पण येतात इथे केव्हा केव्हा" एवढ बोलून तो इसम आपलं काम करू लागला.

त्याला इसमाला अजून जास्त काहीही न विचारता सत्यवीर तडक तिथून बाहेर पडला आणि बाहेर लावलेल्या आपल्या दुचाकीजवळ आला. आसपास कुठे फोनबुथ आहे का ते त्याला पहायचं होतं. पण इथे जवळपास हॉटेल किंवा फोन असल्याचं काहीच लक्षण दिसत नव्हतं. सत्यवीर दुचाकीवर बसला आणि समोर काही अंतरावर टपरीसारखं काहीतरी दिसतं होतं तिथे निघाला. त्या टपरीजवळ पोहोचताच त्याला दिसलं कि आतमधे छोटेखानी हॉटेल आहे जिथे नाश्ता, चहा अशा गोष्टी मिळतात. तिथे समोरचं गल्ल्यावर एक इसम बसलेला होता. त्याच्याकडे चौकशी केल्यावर सत्यवीरला समजलं कि आतमधे फोन आहे. आतमधे गेल्यावर एका कोपऱ्यात ठेवलेला टेलिफोन त्याला दिसला आणि सत्यवीर तिथे गेला.

रिसीवर हातात घेऊन त्याने नंबर फिरवून देशमुखांना फोन लावला. पहिल्या दोन रिंगमधेच देशमुखांनी फोन उचलला.

"हा.. इन्स्पेक्टर देशमुख बोलतोय" देशमुखांचा भारदस्त आवाज आला.

"देशमुख, मी सत्यवीर बोलतोय." फोनवर सत्यवीर आहे कळताच त्याला पुढे काहीही बोलू न देता देशमुख म्हणाले

"अरे सत्या कुठे होतास. किती वेळ झालं तुझ्या घरी फोन करत होतो. तू फोन उचलला नाहीस"

"देशमुख मी अविनाशच्या नर्सरीमध्ये छाननी करण्यासाठी आलोय" सत्यवीर म्हणाला.

"त्याची काही एक आवश्यकता नाहीये आता सत्यवीर. आपल्याला गुन्हेगार मिळालाय" देशमुख पुढे काही बोलणार इतक्यात सत्यवीर आश्चर्याने म्हणाला "काय...कोण आहे गुन्हेगार"

"आत्ताच काही वेळापूर्वी अविनाश पोलीस स्टेशनमधे आला होता आणि त्याने कबुल केलंय कि खून त्यानेच केलाय म्हणून" देशमुख म्हणाले.

"काय.. असं म्हणाला तो" सत्यवीर जवळपास ओरडतच म्हणाला.

"होय त्यानेच कबुलीजबाब दिलाय कि त्या संध्याकाळी त्यानेच गुपचूप हॉस्पिटलमधून येऊन मालतीताईंना बेसावध क्षणी गाठून संपवलं. घरी त्याला आणि त्याच्या बायकोला दिलेल्या त्रासाला कंटाळून त्याने हे पाउल उचललं होतं. त्यामुळे मला वाटतंय कि आता खुनी सापडलाय. तुला हेच सांगायला मी फोन करत होतो पण तू घरात नव्हतास" देशमुखांनी एका दमात सांगून टाकलं.

"खून जर अविनाशने केलाय असं त्याचं म्हणण आहे तर मग कुटीरोवांच्या शस्त्राबद्दल त्याने काय सांगितलं." सत्यवीरने प्रश्न केला.

"अ..ते त्याने नष्ट केलंय असं त्याचं म्हणण आहे. पण कोर्टात तो हे सगळं सांगणार आहे" देशमुखांनी माहिती पुरवली आणि तू सुद्धा ताबडतोब पोलीस स्टेशनला ये असं सांगून देशमुखांनी फोन ठेवला.

यावर काहीही न बोलता फोन ठेवून सत्यवीर तेथून विचार करत बाहेर पडला. आपल्या दुचाकीजवळ येऊन तो थांबला. त्याला दोन मिनिट विश्वासच बसत नव्हता कि अविनाशने खुनाची कबुली दिलेली आहे आणि स्वतः पोलिसांच्या स्वाधीन झालाय.

सत्यवीरने मनाशी काहीतरी ठरवलं आणि आपल्या दुचाकीवर बसला.

नर्सरीमध्ये शेडच्या आत जमीन खणल्याच्या खुणा आणि बांबूवरची टोकदार होल कशाची आहेत हे त्याला समजून चुकलं होतं. आपली दुचाकी चालवत तो शहराकडे निघाला. काही वेळानंतर त्याची गाडी देसाई वाड्याजवळ येऊन थांबली. संध्याकाळ होऊ लागलेली होती. अंधुकसा प्रकाश वाड्याभोवती पसरलेला होता.

वाड्याच दार उघडंच होतं त्यामुळे सत्यवीरने आतमध्ये प्रवेश केला. अंगणात येऊन पाहिलं तर त्याला कोणीच दिसलं नाही. सत्यवीरने मग आपला मोर्चा स्वयंपाक घराकडे वळवला. स्वयंपाकघरच्या दाराशी आल्यावर त्याला आतमध्ये नंदिनी काम करताना दिसली. ती पाठमोरी उभी होती. सत्यवीरने यावेळी लक्ष विचलित न होऊ देता दरवाजावर टकटक करून आपल्या

उपस्थितीची जाणीव करून दिली. नंदिनीने मागे वळून पाहिलं. सत्यवीरला पाहून ती काहीच बोलली नाही तशीच मान खाली घालून उभी राहिली.

"मला असं समजलंय कि अविनाशने गुन्हा कबुल केलाय आणि तो स्वतः पोलीसस्टेशन गेलाय" सत्यवीर धारधार नजरेने नंदिनीकडे पाहत म्हणाला.

"हो.." एवढचं बोलून नंदिनी खाली पाहत ओट्यावरच्या भांड्यांशी चाळा करू लागली.

"मी नर्सरीवर जाऊन आलोय मगाशी" एवढ बोलून सत्यवीर नंदिनीच्या हालचालींच निरीक्षण करू लागला.

त्यावर काहीही न बोलता नंदिनी मागे वळली आणि ओट्यावरच्या भांड्यांची आवराआवर करू लागली. तिची अशी शांतता सत्यवीरला रुचली नाही.

"काही बोलणार नाहीस का यावर तू..." सत्यवीर नंदिनीचा एकेरी उल्लेख करत स्पष्टपणे नंदिनीला म्हणाला.

सत्यवीरच्या या एकेरी उल्लेखावर कोणतीही प्रतिक्रिया न देता नंदिनीने आपलं काम चालूच ठेवलं. तिने शेगडीवर भांड ठेवून गॅस पेटवला. काही क्षण शांततेत गेले. नंतर त्या शांततेचा भंग करत नंदिनीच म्हणाली

"तुम्ही एक दिवस माझ्यापर्यंत येणार याबाबत मला खात्री होती. पण एवढ्या लवकर याल असं वाटलं नव्हतं" एवढ बोलून नंदिनी मागे वळली. बाजूच्या लाकडी फळीवरील एक डबा बाहेर काढून ओट्यावर ठेवला

"तुम्ही चहा घेणार ना?" अतिशय स्पष्ट आणि शांत शब्दात नंदिनी म्हणाली.

तिच्या या थंड आणि आत्मविश्वासु वागण्याने सत्यवीर खरंतर अवाकच झालेला होता. पण तरीही तसं चेहऱ्यावर न दाखवता तो स्पष्टच म्हणाला.

"नर्सरीमध्ये कुटीरोवांकडून मिळालेल्या त्या बियां तुचं पेरल्यास. नंतर त्याचं रोप उगवलं. तुझं काम पूर्ण झाल्यावर नंतर तूच ते रोपट उपटून टाकलेस.. मानलं तुला.

ते शस्त्र किंवा त्याबद्दलचा कोणताही मागमूस तुला ठेवायचा नव्हता. पण दुर्दैव तुझं या सत्यवीरच्या नजरेतून गोष्टी सहजासहजी निसटत नाहीत याची तुला कल्पना नसावी" सत्यवीर घारीसारखी नजर रोखत नंदिनीला पाहत म्हणाला.

"जेव्हा तुम्हाला पहिल्यांदा वाड्यात आलेलं पाहिलं तेव्हाच तुम्ही खूप आत्मविश्वासू आहात हे कळलेलं होतं. तुमची चौकशी करण्याची पद्धत, वाड्याच्या आसपास तुम्ही केलेली निरीक्षणे, मुख्य म्हणजे आबांचं नाटक तुम्ही ज्या पद्धतीने बाहेर काढलंत तेव्हाच कळाले होते कि तुमच्या नजरेतून गोष्टी सहजासहजी सुटत नाहीत. खरंच तुमच्या हुशारीची दाद द्यावी वाटते. तुमच्यामुळे खरंतर आम्हाला आबा परत मिळाले असं म्हणायला हरकत नाही" नंदिनी शांतपणे पण खंबीर आवाजात म्हणाली

"तुला एवढं समजलंच असेल माझ्याबद्दल तर हे पण सांग कि तू मालतीताईंचा खून केलेला असताना अविनाशने स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन का केलंय. अर्थात पोलिसांना अविनाशला अटक करून काहीही

मिळणार नाहीये हे मला माहितीये. कारण खुनाच शस्त्रच त्यांना मिळालेलं नाहीये. त्याच्या नुसत्या कोरड्या कबुलीजबाबावर खटला उभारू शकत नाही आणि राहिलाच तर तो टिकूच शकत नाही" हाताची घडी घालत नंदिनीकडे पाहत सत्यवीर म्हणाला.

नंदिनीच्या चेहऱ्यावर या वाक्यांचा काहीही परिणाम झाला नाही जणू काही तिला माहित होतंच कि सत्यवीर हेच बोलणार आहे.

"म्हणूनच तर ते पोलिसांना स्वाधीन झालेत ना" पुन्हा शांतपणे बोलत नंदिनीने फळीवरून काढलेल्या डब्याच झाकण उघडले. तिच्या हावभावातला शालीनपणा जाऊन आता एक कणखरपणा दिसू लागलेला होता. तिने मागे वळून गॅसवरच भांड खाली ठेवलं. फळीवरच्या उघडलेल्या डब्यातून काहीतरी बाहेर काढलं आणि सत्यवीरला दाखवत म्हणाली

"या शेवटच्या दोनच सुया राहिल्यात" असं म्हणत तिने त्या ओल्डोमा वनस्पतीच्या खोडापासून बनवलेल्या सुया शेगडीच्या धगधगत्या आगीवर धरल्या. सत्यवीरला काही कळणार इतक्यात त्या जाळून खाक झाल्या होत्या.

"तुम्ही आमच्या आबांना आमच्यात परत आणलत. त्याच्या बदल्यात कमीत कमीत तुम्ही त्या शस्त्राची हलकीशी झलक बघायचे हकदार नक्कीच आहात म्हणून तुमच्याचसाठी आत्तापर्यंत ठेवलेल्या होत्या" एवढ बोलून नंदिनीने तो डबा बाजूला ठेवून दिला. कुटीरोवांच्या शस्त्राचे अस्तित्व सांगणारे पुरावे सत्यवीरच्या देखत जाळून खाक झालेले होते.

"किती विचित्र खेळ खेळतेयस ना तू...आपल्या सासूला त्याच शस्त्रांनी जिवनिशी मारून तुला जराही खंत वाटत नाहीये. नक्कीच दगड मनाची आहेस तू" सत्यवीर आवेशात म्हणाला.

तसं नंदिनीने स्वयंपाकघराच्या खिडकीबाहेर पाहिलं. संध्याकाळच कोवळ उन खिडकीतून तिच्या अंगावर पडलेलं होतं. तिच्या नजरेत आता एक प्रकारचा दुःखाचा डोंब दिसून आला. मगाचा चेहऱ्यावरचा कणखरपणा जाऊन तिथं आता एक स्त्रीसुलभ नाजुकपणा आलेला होता. तिला तसं पाहताच सत्यवीरचा आवेश जरासा ओसरला.

"एका आईच आईपण हिरावून नेल्यानंतर ती कोमल मनाची राहत नाही सत्यवीर" पहिल्यांदाच नंदिनीने सत्यवीरचं नाव आपल्या तोंडून घेतलेलं होतं.

तिच्या नेत्रातून दोन अश्रूबिंदू तरळले. ती पुढे बोलू लागली. "तुम्हाला हे समजलंच आहे कि माझ्या सासूबाईंचा खून मी केलाय. पण असं करायला मी कशी धजावले हे सुद्धा मला तुम्हाला सांगावं लागेल. कदाचित त्यानंतरच तुम्ही समजू शकाल कि इतकी दगड मनाची मी का झाले."

क्षणभर डोळ्यातले तरळणारे अश्रू नंदिनीने पदराने पुसले आणी बोलू लागली -

"मी एक अनाथ मुलगी होते. लग्नानंतर या घरात आल्यापासून मला माझ्या नवऱ्याने आणि माझ्या सासऱ्यांनी आबांनी कधीच अनाथ असल्याची जाणीव होऊ दिली नाही. नेहमीच माझ्याशी प्रेमाने वागत आले. आशुतोषसुद्धा वहिनी वहिनी करत माझ्याशी मैत्रीपूर्ण बोलायचे. आपलं घर काय असत याची जाणीव

मला या लोकांनी करून दिली. पण सासूबाई अगदी त्या उलट होत्या. मला सारखं टोचून बोलायच्या. मला सुद्धा माहित नसलेल्या माझ्या आईबाबांचा उद्धार करायच्या. पण मी कधी तक्रार केली नाही ना कोणाजवळ काही बोलले. माझ्या इतर प्रेमळ माणसांमध्ये मी असले कि या सगळ्या गोष्टी मी विसरून जायचे.

असेच दिवस पुढे जात होते काही दिवसांनी मला समजले कि मला दिवस गेले आहेत. मी खूप आनंदी झाले आणि हि गोड बातमी मी फक्त अविनाश यांना सांगितली. त्यांचा सुद्धा आनंद गगनात मावेना. पण हि बातमी काही दिवसांनी वाड्यातील सगळ्यांना सांगावी असं आमचं ठरलं. एके दिवशी माझ्या सासूबाईनी मला खूप काम सांगितली. त्यांचे कपडे धुवायचे होते आणि काही कपड्यांना इस्त्री करून द्यायची होती कारण त्यांना बाहेर जायचे होते. मला दिवसभर कामं करून थकायला झालं होतं. म्हणून मी व्हरंड्यातल्या जिन्याच्या पायरीवर बसले होते. तेवढ्यात सासूबाई आल्या आणि मला बसलेलं पाहून खूप शिव्या देऊ लागल्या. काम करायची सोडून बसते काय नुसती म्हणत त्यांनी आरडाओरडा केला. लगेचच कपड्यांना इस्त्री कर म्हणून मागे लागल्या. मी त्यांना सांगितलं कि मी थकलेय जरा बसते मग नंतर करून देते. मी काहीतरी उगाच कारण सांगून काम टाळायला बघतेय असं त्यांना वाटलं. म्हणून त्यांना जास्तच राग आला. माझं काहीही न ऐकता मला दंडाला धरून त्यांनी तिथून उठवलं आणि मला मारू लागल्या. आता मात्र माझा नाईलाज झाला मी त्यांनी सांगितलं कि आई मला दिवस गेले आहेत. मी थोडं आराम करून नंतर कपड्यांना इस्त्री करते. पण मी काहीतरी खोटं बोलतेय असं वाटून त्यांनी मला

रागाने लांब ढकलून दिलं त्यांचा जोर इतका होता कि व्हरंड्यातल्या बाजूच्या खांबावर जाऊन मी आदळले आणि माझ्या पोटाला मार लागला. मला असह्य कळ जाणवली आणि आई ग.. म्हणून मी कळवळले. तरीही माझ्या या अवस्थेकडे दुर्लक्ष करून त्या निघून गेल्या. मला जमिनीवरून उठवल देखील नाही. बराच वेळ मी तशीच कण्हत पडून होते थोड्या वेळाने कमलाबाई आल्या त्यांनी पटकन मला तिथून उचलून नेलं. त्यांना वाटलं मला चक्कर आली होती. मी सुद्धा त्यांना घडलेला प्रकार सांगितला नाही.

रात्री अविनाशना मी घडलेला प्रकार सांगितलं. माझ्या पोटात कळ येतेय हे समजताच लागलीच त्यांनी मला एका हॉस्पीटलला नेलं. तिथे गेल्यावर समजल कि माझ्या पोटाला मार बसल्याने आतमध्ये बाळाला धक्का बसलेला आहे आणि बाळ त्यातच दगावल. हे ऐकून आमच्या तर पायाखालची जमीनच सरकली. डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करायला सांगितली. त्यामुळे माझ्यासुद्धा जीवाला धोका होता तो टळला. पण आमचं बाळ दगावल्याने आम्ही खूप दुःखी झालो. यांनी माझी समजूत घातली कि आपण बाळासाठी परत प्रयत्न करू. पण नंतर प्रयत्न करून देखील मला दिवस राहिना म्हणून परत हॉस्पीटलला जाऊन चेकप करून पाहिलं तर त्यात कळल कि पहिला गर्भपात झाल्याने गर्भाच्या पिशवीला इजा झालीय आणि मला परत आई होता येणार नाही.”

एवढ बोलून नंदिनी ओक्साबोक्स्शी रडू लागली. नंदिनीवर ओढवलेल्या या दुर्दैवी प्रसंगाचं सत्यवीरला सुद्धा खूप वाईट वाटलं. तो फक्त मान खाली घालू उभा राहिला. हे भयंकर दुखः झेलणाऱ्या नंदिनीच सांत्वन कसं करावं हे देखील

त्याला समजेना आणि अशा प्रसंगी कोणते सांत्वनपर शब्द वापरावेत हे देखील त्याला समजले नाही. त्यामुळे सत्यवीर तसाच दुःखी मनाने उभा होता. थोड्या वेळाने नंदिनीने स्वतःला सावरलं आणि ती पुढे सांगू लागली.

"आमच्या दोघांवर दुःखाचा डोंगर कोसळल्यासारखे झाले होते. अविनाश खूप गप्प गप्प राहायचे. रात्रभर मी उशीत तोंड खुपसून रडत दिवस काढले. पण एके दिवशी ठरवलं कि बस्स आता यापुढे सहन करायचं नाही. मी स्वतःवर येणारी कोणतीही वेळ निभावून नेली असती पण माझ्या बाळाला या जगात येऊन श्वास घेण्याआधीच या जगाचा निरोप घ्यायला लावणाऱ्या माझ्या क्रूर सासूचा जीव घ्यायचा. मी हे ठरवलेले कोणालाच सांगितलं नाही आणि कशाप्रकारे सासूबाईना मारता येईल त्याचा विचार करू लागले. दरम्यान आबा फिरायला म्हणून डोंगरदऱ्या आणि धबधबे पाहायला गेले होते. तिथून ते मला पत्र पाठवायचे कि ती ठिकाणं कशी आहेत. तुला आणि अविनाशला मी इथे एकदा तरी फिरायला आणणार अशा अर्थाची पत्र असायची. त्यांनी मला पत्रातून तिथे त्यांना भेटलेल्या कुटीरोवा जमातीबाद्दल आणि त्यांच्या शिकार करण्याच्या पद्धतीबद्दल सांगितलं होतं. कुटीरोवा शस्त्राबद्दलची माहिती घरात फक्त मला आणी आबांनाच होती"

"दुर्दैवाने तिथून येताना आबांना अपघात झाला आणि त्यांना हॉस्पिटलला नेलं. त्याचं सामान मात्र घरी आणल होतं. तेव्हा त्याचं सामान त्यांच्या खोलीत लावत असताना मला एक लोखंडी पेटी सापडली. त्या पेटीत मला त्या ओल्डोमा वनस्पतीच्या काही बिया दिसल्या. तेव्हा माझ्या मनात एक कल्पना आली. अनायसे अविनाश यांची नर्सरी होतीच तेव्हा या बिया तिथे पेरुयात असं

मी ठरवलं. एका मोक्याच्या क्षणी मी त्या वनस्पतीपासून कुटीरोवांच हत्यार बनवणार होते. नर्सरीत काम करणाऱ्या कामगाराला मी या रोपाला हात न लावण्याविषयी सुचवलं होतं. एक छोटं कुंपण त्या रोपाच्या बाजूला बनवलं आणि त्या वनस्पतीची काळजी घेऊ लागले. माझी मेहनत फळाला आली आणि ते रोप उगवून आलं. त्याची एक छोटी फांदी काळजीपूर्वक तोडून त्यापासून पोकळ नळी आणि सुया बनवल्या. मी दर आठवड्याला तिथे जाऊन पाने तोडून त्याचा रस बनवून ठेवायचे आणि तिथल्या बांबूवर एक कागद लावून लांबूनच नळी तोंडाजवळ धरून नळीच्या तोंडाशी फुंकून सुया बरोबर त्या कागदावर मारायचा सराव करायचे. कारण मला हे शस्त्र वापरण्याची संधी जेव्हा कधी मिळेल तेव्हा लगेचच ते चालवावं लागणार होतं. सुदैवाने पानांचा रस जास्तकाळ टिकून राहत असे. सासूबाई कधीकधी संध्याकाळी अंघोळ करून बाहेर जातात हे मला माहित असायचं. त्याचं वेळी सासूबाईंचा काटा काढायचं ठरवलं. अपेक्षितपणे कमला आणि मी स्वयंपाक घरात असताना मला त्यांनी काही कपडे धुवायला दिले आणि आताच्या आत्ता धुवा असं सांगून त्या अंघोळीला निघून गेल्या. मी या संधीचा फायदा घ्यायचं ठरवलं.

माझ्या डोक्यात योजना तयार होती. कमलाबाई त्या दिवशी माझ्यासोबत कपडे धुवू लागल्या त्याचा खरंतर फायदा झाला. कारण त्या सोबत असल्यावर माझ्यावर संशय येणार नव्हता. कमलाबाईंच्या नकळत स्वयंपाकघरातून चाकू घेतला आणि एका कपड्यात बांधून धुण्याच्या बादलीतल्या कपड्यात तो टाकला. कमलाबाई पुढे गेल्या तेव्हा ओट्याच्या खाली कोपऱ्यात ठेवलेली ओल्डोमाच्या रसांची डबी बादलीत वर ठेवली. नळी आणि सुया साडीला

कमरेच्या काच्यात गाठ मारून ठेवल्या. पटकन मागे विहीरिवर गेले. कमलाबाईंना दुसऱ्या बादलीतील कपडे धुवायला दिले.

माझ्या जवळची बादली मी बाजूला ठेवली. सासूबाईंची अंघोळ करायला किती वेळ घेतात हे माहित असल्याने तेवढा वेळ जाऊ दिला. रहाटाने पाणी काढून थोडे कपडे धुतले. नंतर कपड्यात गुंडाळलेला चाकू गुपचूप हातात घेतला. कमलाबाई गप्पा मारत कपडे धूत होत्या. मी रहाटाचा दोर घेऊन कळशी घट्ट करण्याच्या बहाण्याने चाकूने निम्म्याहून अधिक उसवला मग कळशी लावली आणि विहिरीत कळशी सोडली. कळशी भरून वर खेचताना काही झटके दिले त्यामुळे उसवलेला दोर तुटला आणि भरलेली कळशी खाली निसटून विहिरीच्या तळाशी गेली. कमलाबाई दुसरी कळशी आणायला वाड्याच्या अडगळीच्या खोलीत गेल्या. जिथे एका कोपऱ्यात मी जादाच्या कळश्या ठेवलेल्या होत्या पण त्या बादल्या आणि इतर भांड्यांच्या आड होत्या. जेणेकरून कमलाबाईंना कळशी सापडायला वेळ लागणार होता. कमलाबाई कळशी आणायला गेल्यावर मी त्वरेने कमरेला लावलेल्या ओल्डोमा वनस्पतीच्या सुया बाहेर काढल्या आणि बादलीतल्या डबीच झाकण काढून त्याची टोकं बुडवली.

नळीमध्ये सुया घालून पळतच वाड्याच्या मागच्या दारातून वाड्यात आले. वाड्यात कोणीही आलेलं नव्हतं. सासूबाईंची अंघोळ झालेली होती आणि त्यांना त्यांच्या खोलीत जाताना मी पाहिलं. माझं नशीब बलवत्तर होतं. कमलाबाईंना दुसरी कळशी अजून सापडलेली नव्हती कारण वरच्या मजल्यावरून भांड्यांचा आवाज येत होता त्यावरून समजत होते कि त्या अजून

कळशी शोधत होत्या. मी आजूबाजूला कोणी नाही हे पाहून पटकन सासूबाईंच्या खोलीबाहेर आले. सासूबाई समोर आरशात पाहून केस विंचरत होत्या त्यामुळे त्यांना समजलं नाही कि मी मागे आहे. त्यांनी त्यांचे एका बाजूचे केस बाजूला केले होते. मी क्षणाचाही विलंब न लावता हातातल्या नळीला तोंडाजवळ नेले आणि नळी जोरात फुंकली त्यासरशी वेगाने आतील सुया बाहेर पडल्या आणि बरोबर सासूबाईंच्या कानाच्या खाली घुसल्या. त्या घुसताक्षणी सासूबाई तोंडातून हलकासा अस्फुट आवाज करत जमिनीवर कोसळल्या. त्यांचं शरीर पूर्ण आखडल होतं आणि त्यांना कसलीही हालचाल करता येत नव्हती. मी पुढे जाऊन त्यांच्या मानेमागच्या घुसलेल्या सुया पटकन बाहेर काढल्या. पण त्या नादात त्या ओढल्या गेल्या आणि थोडंसं रक्त बाहेर आलं पण मला जास्त विचार करायला वेळ नव्हता. कमलाबाई कधीही खाली आल्या असत्या. मी त्या सुया काढल्या आणि पटकन पळत मागच्या दरवाजाने विहिरीजवळ आले. बादलीतल्या ओल्या कपड्यात नळी आणी सुया एका कापडात बांधून ठेवून दिल्या आणि कपडे धुवायचं नाटक करत कमलाबाईंची वाट पाहत बसले.

थोड्या वेळाने मला कमलाबाईंचा आरडाओरड ऐकू आला. मला समजलं कि कमलाबाईंना सासूबाई त्यांच्या खोलीत आडव्या पडलेल्या दिसल्या असणार. मी पळत आतमध्ये गेले आणि मग पुढे काय झालं हे तुम्हाला माहित आहेच"

एवढ बोलून नंदिनी मान खाली घालून शांत बसली. खिडकीबाहेर बाहेर आता अंधार पडू लागलेला दिसत होता. सत्यवीर शांतपणे हातावर हनुवटीवर टेकून उभा होता.

"खरंतर मला सुरुवातीला डॉक्टर पाटलांवर संशय होता. पण नंतर त्यांच्या घरी आबा गुपचूप येजा करतात. हे समजल्यावर आबांवर संशय बळावला. त्यांच्याकडे ओल्डोमाच्या बिया सुद्धा सापडल्या नाहीत म्हटल्यावर मला माझी तपासाची दिशा बदलावी लागली. बिया गायब झाल्या म्हणजे नक्की कोणाला तरी त्या पेरून त्याचं रोप बनवायचं असणार हे मला समजलं होतंच. त्यामुळे साहजिकच अविनाशवर संशय आला. कारण रोपे लावायला नर्सरीपेक्षा सुरक्षित जागा दुसरी असणार नव्हती. हॉस्पिटलमधून गुपचूप माघारी येऊन त्यानेच मालतीबाईंचा काटा काढला असणार असं वाटत होतं. नर्सरीला भेट दिल्यावर नक्की रोप सापडणार असं वाटून मी तिथे गेलो पण तू आधीच रोपाची विल्हेवाट लावलेली होतीस."

खिडकीबाहेर पाहणाऱ्या नंदिनीकडे पाहत सत्यवीर म्हणाला आणी पुढे बोलु लागला –

शेडमधे आधाराला उभ्या केलेल्या बांबूवरची बारीक होल पाहून समजलंच कि येथे कोणीतरी येऊन सुया मारून लक्षभेद करण्याचा सराव केलेला दिसतोय. अविनाश सोडून नर्सरीत राजरोसपणे कोणी येउजाऊ शकत असेल असं वाटलं.

पण नर्सरीतल्या कामगाराने तू तिथे जात असायचीस हे सांगितलं. नंतर देशमुखांनी सांगितलं कि अविनाशने गुन्हा कबुल केलाय तेव्हा खून त्याने

केलाय हे खरं वाटलं नाही कारण नक्कीच तो कोणाला तरी वाचवत असणार हे स्पष्ट होतं. विचार करता करता माझ्या लक्षात आलं कि तो नक्की कोणाला वाचवतोय.

मालतीताई वाड्यात कोसळल्या. तेव्हा दोनच व्यक्ती वाड्यात होत्या एक कमलाबाई आणी तू. नर्सरीमध्ये रोप तूच लावलेलं असणार हे मला पक्क समजल. मग मी आबांचा रहस्यभेद केल्यावर तुला वाटलंच असेल कि आज न उद्या मी कुटीरोवांच्या शस्त्रापर्यंत पोहोचणार म्हणून मी तिथे पोहोचायच्या आधीच तू ते रोप नष्ट केलंस.''

यावर नंदिनी थोडावेळ शांत बसली. मागे वळून तिने गॅस बंद केला आणि परत सत्यवीरकडे वळत ती म्हणाली

''मला माहित होतं ज्यावेळी तुम्हाला कुटीरोवांच्या शस्त्राबद्दल माहित होणार त्याचं वेळी तुम्ही त्याच्या मागावर जाणार. आबांच्या खोलीत येऊन ज्यावेळी तुम्ही त्यांचं बिंग बाहेर काढलं त्याचवेळी मला समजलं कि तुम्हाला कुटीरोवांच्या शस्त्राबद्दल समजलंय. त्या रात्री मी अविनाश यांना आमच्या झोपायच्या खोलीत सगळ्या गोष्टी सांगितल्या. मीच सासूबाईना मारलंय यावर त्यांचा विश्वास बसला नाही. तसं करण्यामागच कारण काय होतं हे देखील त्यांना सांगितलं. ते सांगताना मला अश्रू अनावर झाले. पण त्यांनी मला समजून घेतलं. त्यांना सुद्धा वाईट वाटलं. तुमची इच्छा असल्यास मी पोलिसांच्या स्वाधीन होते असं मी म्हणाले पण त्यांनी नकार दिला ते म्हणाले कि असं काही करू नकोस. देसाईंच्या सुनेबाबत लोकांनी भलत्यासलत्या गोष्टी बाहेर केलेल्या योग्य होणार नाही. त्याउलट ते म्हणाले कि तुझ्याऐवजी मी गुन्हा केलाय असं सांगतो.

मी सुरुवातीला ओढेवेढे घेतले पण नंतर आमचं ठरलं कि आधी गुन्हा कबूल करायचा पण कोर्टात गेल्यावर तो नाकारायचा. अशाने कोर्टात केस टिकणार नाही. पण मग कुटीरोवांच शस्त्रसुद्धा नष्ट करावं लागणार होतं. कधीतरी तुम्ही नर्सरीवर ओल्डोमा वनस्पतीच्या शोधार्थ येणार हे समजून म्हणून मीच नर्सरीवर जाऊन ते रोप उकरून काढलं आणी नष्ट केलं.”

एवढ बोलून नंदिनी शांत बसली. तिला जेवढं बोलायचं होतं तेवढं बोलून झालं होतं. सत्यवीरने खाली मान घालून उसासा टाकला. बाहेर चांगलाच अंधार पडलेला होता. रातकिड्यांचा आवाज वाड्याच्या बाहेरून येत होता. काहीही न बोलता सत्यवीर स्वयंपाकघरातून बाहेर पडला.

वाड्याबाहेर येऊन हताश होत त्याने दुचाकी चालू केली आणि घराकडे निघाला. त्याला खुनी सापडला होता पण तो गुन्हा सिध्द करू शकत नव्हता कारण खुनाच हत्यार नष्ट झालेलं होतं आणि खुनाचा हेतू सुद्धा गुप्त राहणार होता. सगळ्या गोष्टी समजून पण सत्यवीर हतबल होता. खरंतर असं त्याच्या गुप्तहेरीच्या कार्यकाळात प्रथमच घडत होतं. खरंतर मालतीताई यांना असं मरण येणं अपेक्षितच होतं असं सत्यवीरला वाटून गेलं.

आपल्या घरातल्या सुनेला त्यांनी अत्यंत वाईट प्रकारची वागणूक दिलेली होती. नंदिनी हि कोणी गुन्हेगारी प्रवृत्तीची व्यक्ती नव्हती. एका आईने आपल्या बाळाच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूचा बदला घेतलेला होता. त्यामुळे तिला गुन्हेगार म्हणून साबित करण्याची खटपट सुद्धा सत्यवीरला करू वाटली नाही.

यातच काही दिवस निघून गेले. इन्स्पेक्टर देशमुखांनी अविनाशच्या जबानीनुसार त्याच्यावर खटला भरला होता. प्रकरण कोर्टात गेलं. अविनाशने

कोर्टात आपला शब्द फिरवून गुन्हा केल्याचं नाकबूल केलं अर्थात हे सगळं त्याने आणि नंदिनीने आधीच ठरवलं होतं. सन्माननीय कोर्टाने देखील पुराव्याअभावी अविनाशला निर्दोष ठरवलं. देशमुखांचा तिळपापड झाला. खून अविनाशनेच केलाय असं त्यांना अजूनही वाटतंय. सत्यवीरने देशमुखांना खरा खुनी कोण आहे याबाबत काहीहि सांगितलं नाही आणि सांगून पण काय करणार कारण त्याच्याकडे पुरावेच नव्हते. होते ते फक्त तर्क. तसंही सत्यवीरला नंदिनीने केलेल्या कृत्याबाबत काहीही गैर वाटत नव्हते. वाटत होती ती फक्त एक सहानुभूती. भविष्यात कधीतरी योग्य वेळ आली कि देशमुखांना या प्रकरणाचा खरा खुनी कोण होता हे सांगायचं सत्यवीरने ठरवलं होतं.

संध्याकाळ होत आलेली होती सत्यवीर आपल्याच खोलीत खुर्चीत स्वस्थपणे बसून होता. हातची बोट एकमेकांत गुंफवून आत्तापर्यंत घडलेला सगळ्या घटनांचा क्रम मनाशी घोळवत शांत बसला होता.

तेवढ्यात दारामधून घराच्या समोर काम करणारा पोरगा आतमध्ये आला.

"दादा हे पार्सल आलंय तुझा नावाने" हातामध्ये खाकी पार्सल नाचवत तो पोरगा सत्यवीरजवळ आला.

मला पार्सल कोणी पाठवलं असेल? हा विचार करतच सत्यवीरने ते पार्सल त्या पोराकडून घेतलं आणि खुर्चीतून उठून बाजूच्या खिडकीजवळ गेला. पार्सल जास्त जड नव्हते. समोर काम करणारा पोरगा तिथेच उभा राहून सत्यवीरकडे आशाळभूतपणे पाहत होता. सत्यवीरने काळजीपूर्वक पार्सलचे सील काढले. आतमध्ये पैशाच्या काही नोटा होत्या आणि एक चिठ्ठी. सत्यवीरने नोटा आतमध्ये तशाच ठेवल्या आणि फक्त चिठ्ठी बाहेर काढून तो वाचू लागला –

"मला लिहायला जास्त जमत नाही. पण तरीही प्रयत्न करावा असं वाटलं. तुम्ही खूप कष्टाने आणि प्रामाणिकपणे तपासकाम केलंत. तुम्ही आमची दुःख आणि आमच्यावर आलेली कठीण वेळ समजून घेतली. त्यामुळे आम्ही जे काही केलं ते तुम्हाला समजून पण त्यावर पुढे कोणताही हस्तक्षेप तुमच्याकडून झाला नाही. त्याबद्दल तुमचे खरंच आभार. तुमच्या प्रयत्नांमुळेच खरंतर आमच्या घराला परत घरपण मिळालं. घरातले सगळे मिळून मिसळून राहू लागलोय. कोणालाच कोणता त्रास नाहीये आणि याचं सगळं श्रेय तुम्हालाच जाते. पण एक खंत वाटत होती ती म्हणजे तुम्हाला मात्र यातून काहीही मिळालं नाही. तुम्ही उदरनिर्वाहासाठी हे काम करता मात्र आमच्या प्रकरणात तुम्हाला काही लाभलं नाही. तुमच्या प्रामाणिक प्रयत्नांची आणि कष्टाची परतफेड म्हणून छोटीशी भेट स्वीकाराल हि अपेक्षा आहे म्हणूनच हे पार्सल पत्रासोबत पाठवण्याचा खटाटोप करत आहे. पत्राच्या शेवटी माझं नाव लिहित नाही पण तुम्हाला समजलं असेलच. कारण तुमच्या नजरेतून गोष्टी सहजासहजी सुटत नाहीत.

परत एकदा तुमचे आभार"

पत्रातील मजकूर पूर्ण वाचून सत्यवीर शांतपणे खिडकीबाहेर पाहू लागला. पत्र नंदिनीने लिहिलंय हे समजायला त्याला वेळ लागला नाही. पत्रातील मायना लिहिताना सुद्धा तो पुरावा म्हणून वापरता येऊ नये याची काळजी घेऊन तिने लिहिलेला होता. या तिच्या हुशारीचं सत्यवीरला खरंच कौतुक वाटलं.

खिडकीबाहेर अस्ताला जाणाऱ्या सूर्याकडे पाहत सत्यवीर उभा होता. पत्र वाचून त्याने हात कमरेच्या मागे बांधले आणि त्या नादात सत्यवीरच्या हातातून

पार्सल निसटून खाली जमिनीवर पडलं तसं आतल्या नोटा पार्सलच्या बाहेर आल्या. बाजूलाच उभ्या असलेल्या पोराने त्या नोटा पहिल्या आणि तो पोरगा आनंदाने नाचू लागला.

"हुर्रे..दादाकडे पैसे आले. आता दादा नवीन बुध्दीबळ घेऊन मला शिकवणार.. हुर्रे... दादा आता चहाच्या उधारीचे पैसे चहावाल्याच्या तोंडावर फेकून मारणार...हुर्रे" असं म्हणत मोठमोठ्याने गाण म्हणत तो पोरगा उड्या मारत नाचू लागला.

पण सत्यवीरचं मात्र त्याच्याकडे लक्षच नव्हतं. समोर अस्ताला जाणाऱ्या सूर्याकडे आणि सूर्यकिरणांच्या लालसर पिवळ्या रंगानी फुललेल्या आभाळाकडे पाहत, पाणावलेल्या नेत्रांनी पण तरीही हलकंसं स्मित करत खिडकीबाहेर पाहत तो तसाच उभा होता.

समाप्त...

(ही कादंबरी वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया ७३५०९३३६९० या व्हॉटस्एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक

मंडळी!

अक्षय जाधव यांचं हेही पुस्तक वाचा. फक्त कव्हरवर क्लिक करा. पुस्तक उघडेल.

ई साहित्यची इतर पुस्तक वाचण्यासाठी...

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237 (एक व्हट्सप मेसेज पाठवा. भरपूर पुस्तकं मिळवा)

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.